महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र पोलीस दलाचे मुखपत्र

# दक्षता

सर्वदूर पोहोचलेले वाचकप्रिय मासिक

- कथा
- लेख
- कविता
- ललित लेख

Vol : 52 | Issue : 10 | Mumbai | Marathi Monthly | July 2026 | Pages 84 | RNI No. 21352 | Price : Rs. 30 /-



## महाराष्ट्र पोलीस ॲकॅडमी (सत्र क्र. १२७) दीक्षांत संचलन समारंभ






## गडचिरोलीत ऑपरेशन 'अंतिम प्रहार'ची यशस्वी अंमलबजावणी

महाराष्ट्र राज्य पोलिसांचे मुखपत्र

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# दक्षता

सर्वदूर पोहोचलेले वाचकप्रिय मासिक...

## आता दक्षता पीडीएफ स्वरूपात महाराष्ट्र पोलिसांच्या संकेतस्थळावर मोफत उपलब्ध!

**S.B.Collect**

छापील मासिकाची ऑनलाईन वर्गणी भरण्यासाठी
https://www.mahapolice.gov.in/daksha-pay.php

*अथवा*

खालील क्युआर कोड आपल्या मोबाईलमध्ये स्कॅन करा.



**दक्षता छापील अंकाची नियमित मासिक वर्गणी रु. ३०/-**
**वार्षिक वर्गणी रु. ३००/- फक्त**

**वेबसाईटवर दक्षता मासिक मोफत वाचण्यासाठी : https://www.mahapolice.gov.in/dakshata-magazine/**

अथवा खालील क्युआर कोड आपल्या मोबाईलमध्ये स्कॅन करा

**https://www.mahapolice.gov.in/ dakshata-magazine**

YouTube

MAHARASHTRA POLICE HEADQUARTERS- DAKSHATA अंतर्गत नव्या यु-ट्युब चॅनलवर ऐका दक्षता मासिकातील दर महिन्याची उत्कृष्ट तपासकथा ऑडिओ-व्हिज्युअल स्वरूपात.

पत्रव्यवहारासाठी पत्ता: महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१,
वर्गणीसाठी दूरध्वनी: ०२२-२२०४९७०१, email: mpd.dakshata@mahapolice.gov.in

**पोलीस आणि जनता यांच्यातील जिव्हाळ्याच्या नात्यामध्ये आपणही सहभागी व्हा!**





जुलै २०२६ । वर्ष ५२ वे । अंक १० वा

**मार्गदर्शन**

**सदानंद दाते**
पोलीस महासंचालक
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**रामनाथ ल. पोकळे**
विशेष पोलीस महानिरीक्षक
(नि. व स.)

**मुद्रक/ प्रकाशक/ सरसंपादक**
**सुहास बावचे**
सहायक पोलीस महानिरीक्षक

**सहभाग**
**विजय मनोहर खरात**

**अंकरचना व अंतर्गत व्यवस्थापन**
**सुरेंद्र बनगे**
कार्यालय अधीक्षक

**पत्रव्यवहारासाठी पत्ता**
सरसंपादक दक्षता
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई ४००००१
दूरध्वनी:०२२ २२०४९७०१/२२८३४५११
mpd.dakshata@mahapolice.gov.in

**वितरण व्यवस्था**
वर्गणीसाठी संपर्क
दूरध्वनी : ०२२ २२०४९७०१

**मांडणी, मुद्रण व प्रकाशन**
सुहास बावचे यांनी महाराष्ट्र स्टेट पोलीस वेल्फेअर फंड यांचेकरिता मे. प्रिंट प्लस प्रा. लि. २१२, स्वस्तिक चेंबर्स, एस टी रोड, चेंबूर, मुंबई ४०००७१ येथे मुद्रित करून महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४००००१ येथून प्रसिद्ध केले.

१०२, आर विंग, मोहन पाम्स, चैतन्य विद्यालयाजवळ, शिरगांव, बदलापूर, जि. ठाणे
नागरिकत्व भारतीय

एकूण पृष्ठे ८४


*या अंकातील लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ अथवा महाराष्ट्र राज्य पोलीस दल सहमत असेलच असे नाही.*

# संपादकीय...

दक्षताच्या सर्व वाचकांना सस्नेह नमस्कार. पोलीस दलातील घडामोडींचा लेखाजोखा वाचकांच्या समोर मांडणारा दक्षताचा जुलै महिन्याचा अंक सहर्ष सादर करत आहोत.

गडचिरोली जिल्ह्यात माओवादी चळवळीचा संपूर्णपणे नि:पात करण्यासाठी पोलीस दलातर्फे नुकतेच 'ऑपरेशन अंतिम प्रहार' राबवण्यात आले. याअंतर्गत पोलीस अभिलेखावर असलेल्या आठ जहाल माओवाद्यांना अटक करण्यात आली. त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणावर शस्त्रसाठा, दारूगोळा आणि रोख रक्कम जप्त करण्यात पोलीस यशस्वी झाले. या संपूर्ण ऑपरेशनचा वृत्तांत अंकात प्रकाशित करण्यात आलेला आहे.

दिनांक २३ ते २७ मे २०२६ या काळात हरियाणा (मधुबन) येथे '३ री अखिल भारतीय पोलीस वेटलिफ्टींग क्लस्टर २०२६-२७ स्पर्धा' संपन्न झाली. या स्पर्धेत महाराष्ट्र राज्य पोलीस पॉवरलिफ्टींग (पुरुष व महिला) संघाने सहभाग नोंदवून ३ सुवर्ण, १ रौप्य, ३ कांस्य (वैयक्तिक) पदके व उपविजेतेपदाची ट्रॉफी संपादन केली आहे. या अभिनंदनीय कामगिरीचा वृत्तांत अंकात समाविष्ट केलेला आहे.

वर्धा जिल्ह्यातील आर्वी पोलीस ठाणे अंतर्गत डायल ११२ प्रणालीचा वापर करून एका अल्पवयीन मुलाला मनोरुग्ण व्यक्तीकडून होत असलेली मारहाण रोखण्यात पोलिसांना यश आले. यायोगे इतर काही लोकांचा जीव वाचवणे पोलिसांना शक्य झाले. त्याची यशोगाथाही या अंकात प्रसिद्ध करत आहोत.

महाराष्ट्र पोलीस ॲकॅडमी, नाशिक येथे दिनांक ११ जून २०२६ रोजी प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक सत्र क्र. १२७ चा दीक्षांत संचलन सोहळा उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचा अहवालही अंकात प्रसिद्ध केलेला आहे.

याखेरीज श्री. सुरेश वांदिले, श्री. एस. वाय. संदे, डॉ. अनिल शर्मा, श्री. उत्तम सदाकाळ, श्री. सुधाकर कुलकर्णी, श्री. संजीव देवकर, श्रीमती संजीवनी भिंगारे, श्रीमती कविता पेन्शनवार यांचे आशयसंपन्न लेख अंकाची उपयुक्तता आणि मनोरंजनात्मक मूल्य वाढवतील याची खात्री आहे. त्याखेरीज अंकात तपासकथा, पाककृती, शब्दकोडे ही नेहमीची सदरे अंतर्भूत आहेतच. वाचकवर्ग अंकाचे स्वागत करेल ही अपेक्षा.

आपला स्नेहांकित,

(सुहास बावचे)
**सहायक पोलीस महानिरीक्षक,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

## पोलीस महासंचालकांचा संवाद

# गडचिरोली पोलीस दलाचे यश



गेली चार दशके हिंसा आणि दहशतीचे सावट अनुभवलेल्या गडचिरोली जिल्ह्यात 'ऑपरेशन अंतिम प्रहार' या विशेष मोहिमेद्वारे पोलीस अभिलेखावरील आठ जहाल माओवाद्यांना अटक करण्यात आली. त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणावर शस्त्रसाठा, दारूगोळा आणि रोख रक्कम जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.

सस्नेह नमस्कार. गेली चार दशके हिंसा आणि दहशतीचे सावट अनुभवलेल्या गडचिरोली जिल्ह्यात 'ऑपरेशन अंतिम प्रहार' या विशेष मोहिमेद्वारे पोलीस अभिलेखावरील आठ जहाल माओवाद्यांना अटक करण्यात आली. त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणावर शस्त्रसाठा, दारूगोळा आणि रोख रक्कम जप्त करण्यात पोलिसांना यश आले. याखेरीज महाराष्ट्र–छत्तीसगड सीमेलगतच्या जंगलांमधील माओवाद्यांचे गुप्त शस्त्रनिर्मिती कारखाने उद्ध्वस्त करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे माओवादी संघटनांची नेतृत्व संरचना आणि युद्धसामग्री नष्ट झाली असून त्यांच्या हिंसक कारवायांना आधार देणारी यंत्रणा खिळखिळी झाली आहे. 'ऑपरेशन अंतिम प्रहार' मोहिमेदरम्यान विविध राज्यांमधील सुरक्षा यंत्रणाशी समन्वय साधून तसेच पूर्वी आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांच्या माध्यमातून सुरुवातीला फरार माओवाद्यांना आत्मसमर्पणाचे आवाहन करण्यात आले होते. तसेच त्यांच्या शोधार्थ शोधमोहीम राबवण्यात आली. यादरम्यान तेलंगणामधील रुकमापूर रेल्वे स्थानकावरून चार माओवाद्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, भामरागड तालुक्यातील फोदेवाडा जंगल परिसरात माओवाद्यांनी लपवलेला शस्त्रसाठा आणि माओवादी साहित्य जप्त करण्यात आले. त्याचप्रमाणे कुमनार येथे नव्याने स्थापन झालेल्या पोलीस मदत केंद्रावर हल्ला करण्याच्या तयारीत असलेल्या दोन सशस्त्र माओवाद्यांना कोणताही गोळीबार न करता जेरबंद करून शस्त्रास्त्रे आणि अन्य साहित्य जप्त करण्यात आले. त्यांनी दिलेल्या माहितीवरून, जंगल परिसरात लपवून ठेवलेला मोठा शस्त्रसाठा आणि ६३ लाख ८४ हजार रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात पोलिसांना यश आले. तसेच नैताळा येथून पोलिसांनी दोन माओवाद्यांना ताब्यात घेत नैताळा जंगल परिसरात लपवून ठेवलेला मोठा शस्त्रसाठा हस्तगत करण्यात यश मिळवले. गडचिरोली पोलीस दलाने सातत्यपूर्ण कारवाया, अचूक गुप्त माहिती संकलन, प्रभावी नियोजन, आणि स्थानिक जनतेचे सहकार्य या चतु:सूत्रीच्या आधारे माओवादी चळवळीची पाळेमुळे उखडून काढून ऐतिहासिक यश संपादन केले आहे. त्यासाठी गडचिरोली पोलिसांचे अभिनंदन.

महाराष्ट्र पोलीस ॲकॅडमी, नाशिक येथे दिनांक ११ जून २०२६ रोजी प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक सत्र क्र. १२७ चा दीक्षांत संचलन सोहळा उत्साहात संपन्न झाला. या प्रशिक्षणानंतर ४२० पुरुष व १६३ महिला अशा एकूण ५८३ प्रशिक्षणार्थींनी १२ महिन्यांचे मूलभूत प्रशिक्षण पूर्ण करून महाराष्ट्र पोलीस दलात प्रवेश केला. यावेळी प्रशिक्षणादरम्यान उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रशिक्षणार्थींना मानाच्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. सर्व यशस्वितांचे हार्दिक अभिनंदन.



**महाराष्ट्र पोलीस ॲकॅडमी, नाशिक येथे प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक सत्र क्र. १२७ च्या दीक्षांत समारंभात प्रशिक्षणार्थींना संबोधित करताना श्री. सदानंद दाते, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

सर्व नवप्रविष्ट पोलीस उपनिरीक्षक बदलत्या आव्हानांना सामोरे जाण्यास तांत्रिकदृष्ट्या सुसज्ज राहतील, सेवाकाळात येणाऱ्या सर्व प्रकारच्या समस्या सोडविण्यास सक्षम असतील, तसेच सदाचार, संवेदनशीलता आणि समर्पण या त्रिसूत्रीचे पालन करत जनतेच्या मनात पोलिसांबद्दल विश्वास निर्माण करतील, असा विश्वास वाटतो.

नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत पोलिसांची त्वरित मदत उपलब्ध व्हावी हा हेतू डोळ्यांसमोर ठेवून 'महाराष्ट्र आपत्कालीन प्रतिसाद प्रणाली – डायल ११२' प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. आपद्ग्रस्त नागरिकांना यामुळे एकाच टोल फ्री क्रमांकावर पोलिसांची मदत उपलब्ध होत आहे. राज्यभरातील ४४ पोलीस घटक समस्याग्रस्तांना प्रतिसाद देण्यास २४×७ सुसज्ज आहेत. सदर प्रणाली आजमितीला राज्यातील नागरिकांसाठी आपत्तीनिवारक ठरत असल्याचा प्रत्यय राज्यात अनेक ठिकाणी येताना दिसत आहे. वर्धा जिल्ह्यातील आर्वी पोलीस ठाणे अंतर्गत डायल ११२ प्रणालीअंतर्गत केल्या गेलेल्या एका कॉलमुळे केवळ ०४ मिनिटे ०२ सेकंद इतक्या अल्प कालावधीत एका अल्पवयीन मुलाला मनोरुग्ण व्यक्तीकडून होत असलेली मारहाण रोखण्यात पोलिसांना यश आले. खुनाची पार्श्वभूमी असलेल्या सदर व्यक्तीला पोलिसांनी वेळीच रोखल्याने इतर लोकांचे प्राण वाचू शकले. सदर प्रसंगी, पोलिसांच्या तत्पर प्रतिसादामुळे अनेक आयुष्ये उद्ध्वस्त होण्यापासून वाचली आहेत. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे डायल ११२ प्रणालीच्या प्रतिसाद कालावधीमध्ये लक्षणीय घट झाली आहे.

एप्रिल २०२६ करिता सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी पारितोषिकासाठी ठाणे शहर पोलीस घटकातील बदलापूर (पश्चिम) पोलीस ठाणे येथील गु. रजि. नंबर ४०९/२०२५ या गुन्हेतपासाची निवड करण्यात आली. या गुन्हे तपासादरम्यान ७ दिवसाच्या स्त्री जातीच्या बालकाची पैशाच्या मोबदल्यात अवैध विक्री करू पाहणाऱ्या गुन्हेगारांच्या टोळीला पकडण्याचे काम बदलापूर पोलीस ठाण्याच्या तपासपथकाने उत्तम प्रकारे पार पाडले. या गुन्हेतपासाचे तपासी अधिकारी व अंमलदार यांचा प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. या सर्वांचे हार्दिक अभिनंदन.

दिनांक २३ ते २७ मे २०२६ या काळात हरियाणा (मधुबन) येथे '३ री अखिल भारतीय पोलीस वेटलिफ्टींग क्लस्टर २०२६–२७ स्पर्धा' संपन्न झाली. सदर स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्य पोलीस पॉवरलिफ्टींग (पुरुष व महिला) संघाने सहभाग नोंदवून ३ सुवर्ण, १ रौप्य, ३ कांस्य (वैयक्तिक) पदके प्राप्त करून उपविजेतेपदाची ट्रॉफी संपादन केली आहे. सर्व खेळाडूंचे अभिनंदन.

दिनांक २५ जुलै २०२६ रोजी राज्यात सर्वत्र आषाढी एकादशी साजरी होत आहे. वारीचा सोहळा निर्विघ्न पार पडावा यासाठी महाराष्ट्र पोलीस दलातर्फे आवश्यक ते सर्व नियोजन केले जात आहे. त्याला जनतेकडूनही संपूर्ण सहकार्य लाभेल अशी अपेक्षा आहे. आषाढी एकादशीच्या सर्वांना शुभेच्छा.

जयहिंद!

**आपला स्नेहांकित,**

**सदानंद दाते**
**पोलीस महासंचालक,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

# अंतरंग

## जुलै २०२६


### पोलीस विशेष




०७. ऑपरेशन अंतिम प्रहार : माओवादाच्या अस्ताचा निर्णायक अध्याय – **एम. रमेश, पोलीस अधीक्षक, गडचिरोली**




१४. महाराष्ट्र पोलीस ॲकॅडमी, नाशिक येथे प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक सत्र क्र. १२७ चा दीक्षांत संचलन सोहळा उत्साहात संपन्न

३९. पोलीस ठाणे आर्वी हद्दीतील नेताजी वार्ड नेहरू वार्ड या ठिकाणी लहान मुलाना मारणाऱ्या २२ वर्षीय मनोरुग्णास डायल ११२ ने कारवाई करत पकडले

५९. मुंबई रेल्वे पोलिसांची संवेदनशीलता व दक्षता हरवलेल्या बालकांच्या भवितव्यास देई सुरक्षितता

### छायाचित्र दालन




१३. सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी – पोलीस सन्मान सोहळा

### पोलीस क्रीडाविशेष

३७. ३ री अखिल भारतीय पोलीस वेटलिफ्टींग क्लस्टर – २०२६-२७ हरियाणा (मधुबन) महाराष्ट्र पोलीस दलाची उल्लेखनीय कामगिरी (वैयक्तिक / सांघिक मध्ये ३ सुवर्ण, १ रौप्य, ३ कांस्य पदक)

### आरोग्य




३४. मृत्यू टाळणे आपल्याच हाती – **डॉ. अनिल शर्मा**

### कविता

३८. फोर्स वन – **गजानन लोकडे**

४७. अवतीर्ण – **दिनेश बारी**

५५. आला पाऊस आला – **दत्तात्रय जोशी**

### लेख




२१. एमपीएससी अधिकारी बनण्याचा राजमार्ग – **एस. वाय. संदे**

२८. मनाचा समतोल-तणावावर मात करण्याची अंतर्मुख साधना – **संजीवनी भिंगारे**

४५. डिजिलॉकर – **सुधाकर कुलकर्णी**

४८. ये रे घना येरे घना न्हाऊ घाल माझ्या मना... – **संजीव देवकर**

६६. मूल्याधिष्ठित शिक्षण – मानवतेच्या पुनर्निर्मितीची अत्यावश्यक दिशा – **कविता पेन्शनवार**

### नवी दिशा... नवीन संधी




२३. डिजिटल ज्ञानसंपदा! – **सुरेश वांदिले**

### कथा

५२. वाटणी – **उत्तम सदाकाळ**

### तपासकथा




१७. सौदा – **वैशाली गोरडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, बदलापूर (प) पोलीस ठाणे.ठाणे शहर**

३१. सोक्षमोक्ष – **सुनील हूड, पोलीस निरीक्षक, मंगरूळपीर पोलीस ठाणे, वाशिम**

४०. आकस – **सुदर्शन गायकवाड, पोलीस निरीक्षक, माणगाव पोलीस ठाणे, रायगड**

५६. चापल्य – **श्रद्धा गंधास, सहा.पोलीस निरीक्षक, घोटी पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण**

७१. संशयात्मा – **सर्जेराव सानप, पोलीस उप निरीक्षक, सातारा पोलीस ठाणे, छत्रपति संभाजीनगर**




### ७६. सोशल मुशाफिरी

### ७९. पाककृती

### ८१. शब्दकोडे



एम रमेश
पोलीस अधीक्षक
गडचिरोली

# ऑपरेशन अंतिम प्रहार: माओवादाच्या अस्ताचा निर्णायक अध्याय




गडचिरोली जिल्ह्याने गेली चार दशके माओवादी हिंसा, घातपात आणि दहशतीचे सावट अनुभवले. जंगलांच्या आडून कार्यरत असलेल्या माओवादी संघटनांनी शस्त्रसाठे, स्फोटके आणि गुप्त शस्त्रनिर्मिती कारखान्यांच्या माध्यमातून सुरक्षादलांवर हल्ले घडवून आणत विकास प्रक्रियेला अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मात्र गडचिरोली पोलीस दलाने सातत्यपूर्ण माओवादीविरोधी कारवाया, अचूक गुप्त माहिती संकलन, प्रभावी नियोजन आणि स्थानिक जनतेच्या सहकार्याच्या बळावर या हिंसक चळवळीची मुळे उखडून टाकण्यात ऐतिहासिक यश संपादन केले.'ऑपरेशन अंतिम प्रहार' या विशेष मोहिमेद्वारे पोलीस अभिलेखावरील उर्वरित आठ जहाल माओवाद्यांना अटक करण्यात आली. यामध्ये मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा, दारुगोळा आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली. तसेच महाराष्ट्र–छत्तीसगड सीमावर्ती जंगलांमध्ये कार्यरत असलेले माओवाद्यांचे गुप्त शस्त्रनिर्मिती

कारखाने उद्ध्वस्त करण्यात आले. या कारवाईमुळे केवळ माओवादी संघटनांची नेतृत्व संरचना आणि युद्धसामग्रीच नष्ट झाली नाही, तर त्यांच्या हिंसक कारवायांना आधार देणारी संपूर्ण यंत्रणाच खिळखिळी झाली.

गडचिरोली पोलीस दलाने राबविलेली ही मोहीम केवळ कायदा व सुव्यवस्था राखण्यापुरती मर्यादित नसून, हिंसा आणि दहशतीच्या सावटाखाली जगणाऱ्या जिल्ह्याला शांतता, विकास आणि विश्वासाच्या नव्या युगात घेऊन जाणारा ऐतिहासिक टप्पा ठरली आहे. 'ऑपरेशन अंतिम प्रहार' हे माओवादाविरुद्धच्या संघर्षातील अंतिम विजयाचे प्रतीक असून गडचिरोलीच्या इतिहासातील सुवर्णाक्षरांनी लिहिला जाणारा एक अभिमानास्पद अध्याय आहे.

### ऑपरेशन अंतिम प्रहार: गडचिरोलीतील माओवादाचा अखेरचा अध्याय

एकेकाळी घनदाट अरण्ये, विपुल नैसर्गिक संपत्ती आणि शांतताप्रिय आदिवासी संस्कृतीने नटलेला गडचिरोली जिल्हा १९८० च्या दशकात दंडकारण्य परिसरात रुजलेल्या माओवादी विचारसरणीच्या प्रभावाखाली येऊ लागला. सामाजिक न्याय आणि लालक्रांतीच्या नावाखाली सुरू झालेल्या या सशस्त्र चळवळीने पुढे हिंसा, भीती आणि विध्वंसाचे स्वरूप धारण केले. परिणामी, जिल्ह्याच्या सामाजिक, आर्थिक आणि विकासात्मक प्रक्रियांना मोठा फटका बसला. अनेक दशके माओवादी संघटनांच्या विघातक कारवायांमुळे गडचिरोली जिल्हा दहशतीच्या सावटाखाली राहिला. मात्र, गडचिरोली पोलीस दलाने सातत्यपूर्ण, धाडसी आणि नियोजनबद्ध अशा माओवादीविरोधी मोहिमा राबवत या आव्हानाचा प्रभावी मुकाबला केला. विशेष अभियान पथक (सी-६०), केंद्रीय सुरक्षा दलांचे सहकार्य, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि स्थानिक नागरिकांचा वाढता विश्वास या सर्वांच्या बळावर जिल्ह्यातील माओवादी चळवळीची मुळे उखडून काढण्यात पोलीस दलाला यश आले. मार्च २०२६ च्या अखेरीस गडचिरोली जिल्ह्यातील माओवादी हालचाली जवळपास पूर्णपणे संपुष्टात आल्या होत्या. तथापि, पोलीस अभिलेखावरील काही सक्रिय माओवादी अद्याप फरार होते.

**गडचिरोली पोलीस दलाने राबविलेली ही मोहीम केवळ कायदा व सुव्यवस्था राखण्यापुरती मर्यादित नसून, हिंसा आणि दहशतीच्या सावटाखाली जगणाऱ्या जिल्ह्याला शांतता, विकास आणि विश्वासाच्या नव्या युगात घेऊन जाणारा ऐतिहासिक टप्पा ठरली आहे. 'ऑपरेशन अंतिम प्रहार' हे माओवादाविरुद्धच्या संघर्षातील अंतिम विजयाचे प्रतीक असून गडचिरोलीच्या इतिहासातील सुवर्णाक्षरांनी लिहिला जाणारा एक अभिमानास्पद अध्याय आहे.**



या उर्वरित माओवाद्यांचा शोध घेण्यासाठी आणि जिल्ह्याला माओवादमुक्त करण्याच्या अंतिम उद्दिष्टपूर्तीसाठी गडचिरोली पोलीस दलाने 'ऑपरेशन अंतिम प्रहार'ही विशेष मोहीम सुरू केली. या मोहिमेअंतर्गत विविध राज्यांमधील सुरक्षा यंत्रणांशी समन्वय साधण्यात आला. पूर्वी आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांच्या माध्यमातून, तसेच विविध संपर्क साधनांचा





वापर करून फरार माओवाद्यांना आत्मसमर्पणाचे आवाहन करण्यात आले. मात्र, काही माओवादी लपून राहण्याचा प्रयत्न करत असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर त्यांच्या शोधासाठी विशेष गुप्त माहिती संकलन आणि शोधमोहीम राबविण्यात आली.

### तेलंगणातील रुकमापूर रेल्वे स्थानकावरून चार माओवाद्यांना अटक

विश्वसनीय गुप्त माहितीच्या आधारे १२ मे २०२६ रोजी विशेष अभियान पथक प्राणहिता येथील पोलीस पथक तेलंगणा राज्यातील विकाराबाद जिल्ह्यातील रुकमापूर रेल्वे स्थानक परिसरात रवाना झाले. १३ मे रोजी स्थानक परिसरात चारजण संशयास्पद हालचाली करताना दिसून आले. पोलीस पथक पाहताच त्यांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला; मात्र पोलिसांनी अत्यंत कौशल्याने त्यांना ताब्यात घेतले. सखोल चौकशीत हे चारहीजण पोलीस अभिलेखावरील सक्रिय माओवादी असल्याचे निष्पन्न झाले. त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार भामरागड तालुक्यातील फोदेवाडा जंगल परिसरात माओवाद्यांनी शस्त्रसाठा जमिनीखाली लपवून ठेवल्याची माहिती मिळाली. त्यानूसार सदर परिसरात शोधमोहीम राबविली असता या कारवाईत एक ३०३ रायफल, दोन बारा बोअर रायफल, जिवंत काडतुसे आणि मोठ्या प्रमाणावर माओवादी साहित्य जप्त करण्यात आले.

### कुमनार येथे दोन जहाल माओवादी जेरबंद

१४ मे २०२६ रोजी पोलीस ठाणे लाहेरी हद्दीतील मौजा कुमनार येथे काही सशस्त्र माओवादी नव्याने स्थापन झालेल्या पोलीस मदत केंद्रावर हल्ल्याच्या तयारीत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. अपर पोलीस अधीक्षक (अभियान) श्री. कार्तिक मधिरा यांच्या नेतृत्वाखाली गडचिरोली पोलीस आणि सीआरपीएफच्या संयुक्त पथकाने शोधमोहीम

**१४ मे २०२६ रोजी पोलीस ठाणे लाहेरी हद्दीतील मौजा कुमनार येथे काही सशस्त्र माओवादी नव्याने स्थापन झालेल्या पोलीस मदत केंद्रावर हल्ल्याच्या तयारीत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. अपर पोलीस अधीक्षक (अभियान) श्री. कार्तिक मधिरा यांच्या नेतृत्वाखाली गडचिरोली पोलीस आणि सीआरपीएफच्या संयुक्त पथकाने शोधमोहीम राबविली.**

राबविली. यावेळी पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन माओवाद्यांना कोणताही गोळीबार न करता जेरबंद करण्यात आले. त्यांच्या ताब्यातून एके–४७ रायफल, .३०३ रायफल, बारा बोअर रायफल आणि अन्य साहित्य जप्त करण्यात आले.

अधिकच्या चौकशीत ते राजू उर्फ मंगडू वेको (डीव्हीसीएम) आणि जनी उर्फ नगी उंगाल येमला (पीपीसीएम) असल्याचे स्पष्ट झाले. त्यांच्या माहितीवरून गुंडेनूर जंगल परिसरात लपवून ठेवलेला मोठा शस्त्रसाठा आणि ६३ लाख ८४ हजार रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली. या कारवाईत एसएलआर एलएमजी, इन्सास एलएमजी, एके–४७, एसएलआर, इन्सास रायफल, ३०३ रायफल, देशी बनावटी हत्यार, बीजीएल लॉंचर, मॅग्झिन आणि शेकडो जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली.

### नैताळा येथे आणखी दोन माओवादी अटकेत

याच कालावधीत अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) श्री. गोकुल राज जी. यांच्या नेतृत्वाखाली गर्देवाडा हद्दीतील नैताळा गावात विशेष शोधमोहीम राबविण्यात आली. गावातील घरांचा आडोसा घेऊन लपलेल्या माओवाद्यांनी पोलिसांची चाहूल लागताच जंगलाच्या दिशेने पळण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलीस पथकाने अत्यंत धाडसाने पाठलाग करून दोन माओवाद्यांना एसएलआर रायफल, एक बारा बोअर रायफल, एक सिंगल शॉट रायफल शस्त्रांसह ताब्यात घेतले. सदर आरोपी ज्योती उर्फ अकिला उर्फ समिता पोटावी (डीव्हीसीएम) आणि आमती उर्फ आयती उर्फ संध्या इडमा पोडीयाम (सदस्य, कंपनी

क्र.१०) असल्याचे निष्पन्न झाले. त्यांच्या चौकशीतून माओवाद्यांनी नैताळा जंगल परिसरात लपवून ठेवलेला मोठा शस्त्रसाठा उघडकीस आला. या ठिकाणावरून इन्सास रायफल, ३०३ रायफल, बारा बोर रायफल, डेटोनेटर, मॅग्झिन, बीजीएल लाँचर, बीजीएल लाँचर सेल, जिवंत काडतुसे आणि मोठ्या प्रमाणावर दारूगोळा व ०१ लाख ५० हजार रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली.

### माओवादी संघटनेचा अखेरचा पडदा

'ऑपरेशन अंतिम प्रहार' अंतर्गत राबविण्यात आलेल्या या सलग कारवायांमुळे गडचिरोली जिल्ह्यातील माओवादी चळवळीला निर्णायक धक्का बसला. पोलीस अभिलेखावरील सहा सक्रिय माओवाद्यांपैकी पाच जणांना अटक करण्यात आली, तर मोनी मडावी या महिला माओवादीने छत्तीसगड राज्यातील बीजापूर येथे आत्मसमर्पण केले. परिणामी, गडचिरोली पोलीस अभिलेखावरील एकही सक्रिय माओवादी शिल्लक राहिला नाही. या मोहिमेदरम्यान अटक करण्यात आलेल्या आठ माओवाद्यांवर महाराष्ट्र शासनाने एकूण ६४ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. या कारवाईत दोन डीव्हीसीएम, दोन पीपीसीएम आणि चार सदस्य दर्जाच्या



माओवाद्यांना अटक करण्यात आली. त्यांच्या ताब्यातून आणि त्यांच्या माहितीवरून एकूण ५१ अग्निशस्त्रे, मोठ्या प्रमाणावर दारूगोळा तसेच सुमारे ६५ लाख ३४ हजार रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली.

### माओवाद्यांचा शस्त्रनिर्मिती

**'ऑपरेशन अंतिम प्रहार' अंतर्गत राबविण्यात आलेल्या या सलग कारवायांमुळे गडचिरोली जिल्ह्यातील माओवादी चळवळीला निर्णायक धक्का बसला. पोलीस अभिलेखावरील सहा सक्रिय म ाओवाद्यांपैकी पाच जणांना अटक करण्यात आली, तर मोनी मडावी या महिला माओवादीने छत्तीसगड राज्यातील बीजापूर येथे आत्मसम र्पण केले. परिणामी, गडचिरोली पोलीस अभिलेखावरील एकही सक्रिय माओवादी शिल्लक राहिला नाही.**

### कारखाना उद्ध्वस्त : ऑपरेशन अंतिम प्रहारचा निर्णायक टप्पा

गडचिरोली जिल्ह्यात अनेक दशकांपासून माओवादी संघटनांनी हिंसा, दहशत आणि घातपाती कारवायांच्या माध्यमातून विकास प्रक्रियेला खीळ घालण्याचा प्रयत्न केला. सुरक्षा दलांवर हल्ले घडवून आणणे, शासकीय यंत्रणांना लक्ष्य करणे आणि दुर्गम भागातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निम ाण करणे, हे त्यांच्या कार्यपद्धतीचे प्रमुख वैशिष्ट्य होते. या हिंसक कारवायांसाठी आवश्यक असलेली शस्त्रे, दारूगोळा, आयईडी स्फोटके आणि इतर साहित्य माओवादी संघटनांकडून जंगल परिसरात अत्यंत गोपनीय पद्धतीने लपवून ठेवण्यात येत असे. नक्षल सप्ताह, निवडणुका अथवा सुरक्षा दलांच्या हालचालींच्या काळात या साहित्याचा वापर घातपात घडवून आणण्यासाठी केला जात होता. मात्र, गडचिरोली पोलीस दलाने सातत्यपूर्ण आणि आक्रमक माओवादीविरोधी कारवायांद्वारे जिल्ह्यातील माओवादी चळवळीची कंबर मोडली. मार्च २०२६ पर्यंत गडचिरोली

जिल्ह्यातील माओवादी हालचाली जवळपास पूर्णपणे संपुष्टात आल्या. त्यानंतर 'ऑपरेशन अंतिम प्रहार' अंतर्गत माओवाद्यांनी जंगलात लपवून ठेवलेले शस्त्रसाठे, स्फोटके आणि शस्त्रनिर्मितीची साधने शोधून नष्ट करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेच्या दरम्यान आत्मसमर्पित तसेच अटक करण्यात आलेल्या माओवाद्यांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस मदत केंद्र बिनागुंडा हद्दीतील जंगल परिसरात माओवादी शस्त्रनिर्मिती केंद्र अस्तित्वात असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार २१ मे २०२६ रोजी विशेष अभियान पथक, प्राणहिता येथील संयुक्त सहा तुकड्या आणि बॉम्ब शोधक व नाशक पथकाच्या दोन तुकड्यांना शोधमोहिमेवर रवाना करण्यात आले. दिनांक २२ मे २०२६ या दिवशी बिनागुंडा परिसरातील जंगलात सखोल तपासणी केली असता माओवादी शस्त्रनिर्मिती केंद्राचा मोठा साठा उघडकीस आला. यामध्ये लेथ मशीन, बीजीएल पाईप्स, १२ बोअर पाईप्स, इन्व्हर्टर, जनरेटर, बॅटऱ्या, ग्राइंडिंग व ड्रिलिंग मशीन, जिग सॉ मशीन, प्रेशर पंप, सोलर पॅनल, फुटबॉल पाईप (२० फूट) तसेच इतर तांत्रिक साहित्याचा समावेश होता. हे साहित्य शस्त्रांची निर्मिती व दुरुस्तीसाठी वापरले जात असल्याचे स्पष्ट झाले. सुरक्षा आणि



सार्वजनिक हित लक्षात घेऊन हे सर्व साहित्य घटनास्थळीच नष्ट करण्यात आले.

### आंतरराज्यीय अभियानात उध्वस्त झाला माओवाद्यांचा गुप्त कारखाना

माओवादी चळवळीचे सर्वात मोठे बळ म्हणजे त्यांच्याकडे उपलब्ध असलेला शस्त्रसाठा आणि स्फोटक साहित्य. एकेकाळी पारंपरिक शस्त्रांवर अवलंबून असलेली ही संघटना कालांतराने ए.के.-४७, एसएलआर, इन्सास रायफल, १२ बोअर रायफल, ३०३ रायफल यांसारख्या आधुनिक शस्त्रांनी सज्ज झाली. यातील अनेक शस्त्रे सुरक्षा दलांवरील हल्ल्यांदरम्यान लुटण्यात आलेली होती. याशिवाय आयईडी, क्लेमोर माईन्स, डेटोनेटर आणि बीजीएल सेल यांसारख्या घातक साहित्याचा वापर करून सुरक्षा दलांवर जीवघेणे हल्ले करण्यात येत होते.

गेल्या संपूर्ण वर्षभरात आत्मसमर्पित माओवाद्यांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे महाराष्ट्र-छत्तीसगड या सीमेलगत नारायणपूर जिल्ह्यातील काकूर परिसरात माओवादी शस्त्रनिर्मिती केंद्र कार्यरत असल्याचे समोर आले. या माहितीची पडताळणी करून गडचिरोली पोलीस आणि नारायणपूर पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने २६ मे २०२६ रोजी विशेष आंतरराज्यीय मोहीम राबविण्यात आली. या अभियानात विशेष अभियान पथक प्राणहिता, डीआरजी नारायणपूर आणि बॉम्ब शोधक व नाशक पथकांच्या संयुक्त तुकड्यांनी जंगल परिसरात व्यापक शोधमोहीम हाती घेतली. २७ मे २०२६ रोजी काकूर परिसरातील जंगलात तपासणीच्या दरम्यान माओवाद्यांचा मोठा शस्त्रनिर्मिती कारखाना उघडकीस आला. या कारवाईत एक इन्सास रायफल, दोन सिंगल शॉट रायफल, दोन १२ बोअर रायफल, विविध प्रकारची जिवंत काडतुसे, २५ किलो आयईडी स्फोटक, दोन क्लेमोर, ११० डेटोनेटर, कॉर्टेक्स वायर, ५०० हून अधिक बीजीएल सेल व त्यांचे निर्मिती साहित्य, सात बीजीएल



लाँचर, तीन ट्युब लाँचर, लोखंडी सळ्या तसेच शस्त्रनिर्मितीसाठी वापरली जाणारी दोन लेथ मशीन, मोटारी, ग्राइंडर मशीन, इन्व्हर्टर, बॅट्या, सोलर प्लेट्स आणि इतर साहित्य मोठ्या प्रमाणात जप्त करण्यात आले. ही कारवाई केवळ शस्त्रसाठा जप्त करण्यापुरती मर्यादित नव्हती; तर माओवादी संघटनांच्या हिंसक कारवायांना आधार देणारी उत्पादन यंत्रणाच उद्धवस्त करणारी ठरली. हस्तगत करण्यात आलेले सर्व साहित्य बॉम्ब शोधक व नाशक पथकाच्या साहाय्याने घटनास्थळीच नष्ट करण्यात आले.

### हिंसेवर शांततेचा विजय

माओवादी विचारसरणीने अनेक वर्षे शस्त्रांच्या बळावर भीतीचे साम्राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मात्र इतिहास साक्षी आहे, की हिंसा आणि दहशत कधीही समाजाचे कल्याण करू शकत नाही. भगवान गौतम बुद्धांनी जगाला करुणा, सहिष्णुता आणि शांततेचा संदेश दिला, तर राष्ट्रपिता महात्मा गांधींनी अहिंसेच्या माध्यमातून परिवर्तनाचा मार्ग दाखविला.

गडचिरोली जिल्ह्यात आज शस्त्रांच्या आवाजाऐवजी विकासाची भाषा बोलली जात आहे. एकेकाळी घातपाताचे नियोजन करणाऱ्या जंगलांमध्ये आता रस्ते, शाळा, आरोग्य सुविधा आणि विकासाची नवी स्वप्ने आकार घेत आहेत. 'ऑपरेशन अंतिम प्रहार' अंतर्गत शस्त्रनिर्मिती कारखान्यांचे उच्चाटन ही केवळ सुरक्षा विषयक कारवाई नसून, हिंसेवर शांततेचा आणि विकासाचा विध्वंसावर मिळालेला ऐतिहासिक विजय आहे. गडचिरोली पोलीस दल, केंद्रीय सुरक्षा दल आणि स्थानिक नागरिक यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे आज जिल्हा माओवादमुक्ततेच्या दिशेने निर्णायक वाटचाल करीत आहे. या कारवाया भावी पिढ्यांसाठी सुरक्षित, शांततामय आणि प्रगत गडचिरोली घडविण्याच्या दिशेने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे.

**गडचिरोली पोलीस दल, केंद्रीय सुरक्षा दल आणि स्थानिक नागरिक यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे आज जिल्हा माओवादमुक्ततेच्या दिशेने निर्णायक वाटचाल करीत आहे. या कारवाया भावी पिढ्यांसाठी सुरक्षित, शांततामय आणि प्रगत गडचिरोली घडविण्याच्या दिशेने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे.**

सदरची कारवाई विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान), नागपूर श्री. संदिप पाटील, पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र श्री. योगेश कुमार, उपमहानिरीक्षक (अभियान) सीआरपीएफ श्री. अजय कुमार शर्मा, अपर पोलीस अधीक्षक (अभियान) श्री. कार्तिक मधिरा, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) श्री. गोकुल राज जी., पोलीस उपअधीक्षक (अभियान) श्री. विशाल नागरगोजे, पोलीस उपअधीक्षक नारायणपूर (छत्तीसगड पोलीस) श्री. मनोज मंडावी, यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस अधीक्षक विकाराबाद, तेलंगणा राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष अभियान पथक, प्राणहिता, विशेष अभियान पथक, गडचिरोली, बीडीडीएस पथक गडचिरोली व प्राणहिता व डीआरजी बिजापूर पथकातील जवानांनी यशस्वीरित्या पार पाडली. ■

# छायाचित्र दालन

एप्रिल २०२६ करिता सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी बक्षिसाकरिता खालील गुन्हेतपासाची निवड करण्यात आली. या गुन्हेतपासाचे तपासी अधिकारी व अंमलदार यांचा राज्याचे पोलीस महासंचालक मा. श्री. सदानंद दाते यांच्या हस्ते प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. यामध्ये सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी बक्षीस हे ठाणे शहर घटकातील बदलापूर (पश्चिम) पोलीस स्टेशन गु. रजि. नंबर ४०९/२०२५ या गुन्ह्याला जाहीर झाले असून वपोनि वैशाली गोरडे, सपोनि स्नेहल शिंदे, सपोउनि विजय पाटील व पोलीस अंमलदार राजेश सुवारे व हर्षदा थोरात यांना गौरविण्यात आले. **सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी जुलै महिन्याच्या सदर अंकात पृष्ठ क्रमांक १७ वर प्रसिद्ध करण्यात आली आहे.** ■








# महाराष्ट्र पोलीस ॲकॅडमी, नाशिक येथे
## प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक सत्र क्र. १२७ चा
## दीक्षांत संचलन सोहळा उत्साहात संपन्न




जून ०९, २०२६ रोजी महाराष्ट्र पोलीस ॲकॅडमी, नाशिक येथे सकाळी ७.०० ते ८.१५ या वेळेत प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक सत्र क्र. १२७ चा दीक्षांत संचलन सोहळा अत्यंत उत्साहात आणि दिमाखदारपणे संपन्न झाला. या शानदार सोहळ्यातून ४२० पुरुष (गोवा राज्यातील एक प्रशिक्षणार्थीसह) व १६३ महिला असे एकूण ५८३ प्रशिक्षणार्थी आपले १२ महिन्यांचे खडतर मूलभूत प्रशिक्षण पूर्ण करून महाराष्ट्र पोलीस दलात दाखल झाले आहेत. या अभिमानास्पद क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी प्रशिक्षणार्थींचे ३००० हून अधिक नातेवाईक उपस्थित होते, तर युट्युब लाईव्हच्या माध्यमातून २०,००० पेक्षा जास्त नागरिकांनी या सोहळ्याचा आनंद घेतला.

या सोहळ्यास राज्याचे पोलीस महासंचालक श्री. सदानंद दाते हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी










प्रशिक्षणार्थींकडून मानवंदना स्वीकारली, तर अकॅडमीचे संचालक श्री. नवल बजाज यांनी नवप्रविष्ट अधिकाऱ्यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली.

नवप्रविष्ट पोलीस उपनिरीक्षकांना मार्गदर्शन करताना पोलीस महासंचालक श्री. सदानंद दाते यांनी अत्यंत मार्मिक आणि प्रेरणादायी विचार मांडले.

### आधुनिक आव्हानांसाठी सज्जता:

दिवसेंदिवस गुन्हेगारीचे स्वरूप बदलत असून सायबर आणि आर्थिक गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी पोलिसांनी तांत्रिकदृष्ट्या अधिक सक्षम असणे ही काळाची गरज आहे. तसेच, शालेय स्तरावर वाढणारा अमली पदार्थांचा विळखा ही चिंतेची बाब असून, युवा अधिकाऱ्यांनी यावर कठोर कारवाई करावी अशी अपेक्षा श्री. दाते यांनी व्यक्त केली.

### 'वॉर मोड' कडून 'सर्व्हिस मोड' कडेः

गडचिरोलीसारख्या नक्षलग्रस्त भागात पोलिसांनी मोठे यश मिळवले असून, आता तेथील जनतेच्या मनात सुरक्षेसोबतच सेवेची भावना रुजवण्याचे महत्त्वपूर्ण परिवर्तन घडवून आणायचे आहे.

### समस्या सोडवण्याचे कौशल्यः

सन १९९९ मधील तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री श्री. लालकृष्ण अडवाणी यांच्या मुंबई दौऱ्यातील एक अनुभव सांगत त्यांनी स्पष्ट केले, की अनेकदा कठीण प्रसंगात प्रत्यक्ष काम करणाऱ्या कनिष्ठ कर्मचाऱ्याचे प्रसंगावधान आणि समस्या सोडवण्याची क्षमता ही पदापेक्षा अधिक महत्त्वाची ठरते. त्यामुळे अधिकाऱ्यांनी संघभावना ठेवून सर्वांना सोबत घेऊन काम करावे.

### जनतेचा विश्वास हीच खरी ताकदः

पोलीस दलाची खरी ताकद लाठीकाठीत नसून ती जनतेच्या पोलिसांवरील विश्वासामध्ये असते. नागरिक पोलीस ठाण्यात केवळ कायदेशीर मदत नव्हे, तर न्याय आणि सुरक्षितता शोधत येतात; त्यामुळे अधिकाऱ्यांनी कायद्याचे रक्षक आणि समाजाचे संवेदनशील सेवक बनावे. प्रत्येक पोलीस हा गणवेशातील नागरिक असून नागरिक हा गणवेश नसलेला पोलीस आहे, ही भावना रुजवावी.

### यशाचा त्रिसूत्री मंत्रः

अधिकाऱ्यांनी 'सदाचार, संवेदनशीलता आणि समर्पण' ही त्रिसूत्री अंगीकारावी. सदाचार योग्य मार्ग दाखवतो, संवेदनशीलता जनतेच्या मनापर्यंत पोहोचवते आणि समर्पण एक उत्कृष्ट अधिकारी घडवते. संत कबीरांच्या दोह्याचा दाखला देत त्यांनी प्रशिक्षकांच्या कुंभारासारख्या भूमिकेचे विशेष कौतुक केले.

### पारितोषिक विजेते गुणवंत प्रशिक्षणार्थीः

प्रशिक्षणाच्यादरम्यान उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रशिक्षणार्थींना या सोहळ्यात मानाच्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

### रिव्हॉल्व्हर ऑफ ऑनरः

प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक उत्कर्षा उज्ज्वला जाधव यांना या सत्रातील सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच त्यांना 'Late Yashwantrao Chavan Gold Cup' (Best Allround Cadet ) 3 'Ahilyabai Holkar Cup' (Best Allround Women Cadet) हे पुरस्कार देखील प्रदान करण्यात आले.

द्वितीय सर्वोत्कृष्ट प्रशिक्षणार्थी (Second Best Trainee & Best Cadet in Outdoor): प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक मोहन चमाबाई मच्छिंद्र पालमपल्ली.

कायदा विषयात सर्वोत्कृष्ट (Dr. B. R. Ambedkar Cup): प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक अमृता माया सुभाष जाधव. नेमबाजीतील सर्वोत्कृष्ट (N. M. Kamate Gold Cup): प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक राजू जया दत्तात्रय जाधव. कवायतीतील सर्वोत्कृष्ट (Best Cadet in Drill): प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक बळीराम धोंडुबाई मानेजी बुडसे. अभ्यासातील सर्वोत्कृष्ट (Best Cadet in Studies - Silver Baton) : प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक वैशाली सविता अर्जुन शेळके.

### उपस्थित मान्यवरः

या सोहळ्यास महाराष्ट्र पोलीस अकॅडमीचे संचालक श्री. नवल बजाज, पोलीस आयुक्त नाशिक शहर श्री. संदीप कर्णिक, विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परीक्षेत्र श्री. संजय येनपुरे, पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण डॉ. डी. एस. स्वामी, तसेच प्रतिष्ठित नागरिक व प्रतिनिधी यांची प्रमुख उपस्थिती होती, सदरचा सोहळा सहसंचालक श्री. नंदकुमार ठाकूर, उपसंचालक (बाह्यवर्ग) श्री. प्रशांत खैरे, उपसंचालक (प्रशिक्षण) श्रीमती गीता चव्हाण, उपसंचालक (सेवांतर्गत प्रशिक्षण) श्री. महेश चिमटे, उपसंचालक (आय. टी. व सुरक्षा) श्रीमती पद्मजा चव्हाण-बढे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अकॅडमीचे सर्व अधिकारी, कर्मचारी व प्रशिक्षक यांच्या उपस्थितीत पार पडला. ■



वैशाली गोरडे
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
अनैतिक मानवी वाहतूक
प्रतिबंधक कक्ष,
बदलापूर (प) पोलीस ठाणे.
ठाणे शहर

# सौदा

**कुठलाही सौदा म्हणजे कुणाचातरी फायदा. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर कुणाचा तरी तोटा किंवा त्याग. एका ठिकाणी भराव दिसतो तेव्हा दुसऱ्या ठिकाणी खड्डा पडलेला असतो, हाच तर सृष्टीचा नियम आहे. इथेपण एक सौदा होऊ घातला होता. त्यातून अनेकांना फायदा होणार होता. मात्र इथे त्या बदल्यात एका कोवळ्या जिवाचे अस्तित्व पणाला लागले होते...**





आई आणि बाळ... एक अनोखे नाते. असे नाते जे चिरंतन असते. बाळ जन्माला आल्यावर नाळ कापली गेली तरी आई आणि बाळ यांच्यातला मायेचा चिवट बंध मात्र कायम राहतो. नवा जीव ज्या क्षणी जन्म घेतो त्या क्षणापासून मातेसाठी तो सर्वस्व बनतो.

चांदबीचे मात्र तसे नव्हते. तिला आपल्या पोटच्या गोळ्यापासून सुटका हवी होती. अवघी पाच दिवसाची तिची पोर तिला डोईजड झाल्यासारखी वाटत होती. डोळे नीट उघडून अजून जगही न पाहिलेल्या



स्नेहल शिंदे
सहा. पोलीस निरीक्षक
अनैतिक मानवी वाहतूक
प्रतिबंधक कक्ष,
बदलापूर (प) पोलीस ठाणे.
ठाणे शहर



विजय पाटील
सहा. पोलीस उपनिरीक्षक
अनैतिक मानवी वाहतूक
प्रतिबंधक कक्ष,
बदलापूर (प) पोलीस ठाणे.
ठाणे शहर



राजेश सुवारे
पोलीस अंमलदार
अनैतिक मानवी वाहतूक
प्रतिबंधक कक्ष,
बदलापूर (प) पोलीस ठाणे.
ठाणे शहर



हर्षदा थोरात
पोलीस अंमलदार
अनैतिक मानवी वाहतूक
प्रतिबंधक कक्ष,
बदलापूर (प) पोलीस ठाणे.
ठाणे शहर

त्या लहानगीबद्दल तिच्या मनात कुठल्याही मातृसुलभ भावना नव्हत्या. उलट ही पोर म्हणजे पायीची बेडी होती. तिच्यापासून जेवढे लवकर वेगळे होता येईल तेवढे चांगलेच असणार होते.

सुदैवाने तिच्यासाठी एक सौदा चालून आला होता. सौदा तिच्या फायद्याचाच होता. मध्यस्थ होता कुणी एक दास नावाचा मनुष्य. तेही त्याचे खरे नाव होते की नाही देव जाणे! पण तो चांदबीची या जोखडापासून सुटका करायला तयार होता. आपली पोटची पोरगी त्याच्या हवाली करायची आणि तो देईल ती रक्कम घ्यायची इतके सरळ गणित होते. चांदबी या व्यवहारासाठी तयार, नव्हे उत्सुक, होती. दास तिला उद्या फोन करून कुठे आणि किती वाजता यायचे ते सांगणार होता. सुटका काही तासांवर येऊन ठेपली होती. चांदबी मनोमन हरखून गेली होती.

***

बदलापूर (प) पोलीस ठाणे. पोलीस ठाण्याच्या इमारतीतच एका बाजूला असलेल्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष होता. या कक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैशाली गोरडे यांनी आपल्या दैनंदिन कामकाजाला



**सुदैवाने तिच्यासाठी एक सौदा चालून आला होता. सौदा तिच्या फायद्याचाच होता. मध्यस्थ होता कुणी एक दास नावाचा मनुष्य. तेही त्याचे खरे नाव होते की नाही देव जाणे! पण तो चांदबीची या जोखडापासून सुटका करायला तयार होता.**

सुरुवात केलीच होती, तोच त्यांच्या फोनची रिंग वाजली.

''हॅलोऽऽ'' करत त्यांनी फोन कानाला लावला. पलीकडून बोलणाऱ्या व्यक्तीचे म्हणणे ऐकत असताना त्यांच्या चेहऱ्यावरील भाव झरझर बदलले. काहीतरी गंभीर प्रकरण घडले असावे, असे त्यांच्या चेहऱ्याकडे बघून वाटत होते.

''अस्सं? ठीक आहे... बघते मी काय करता येईल ते,'' असे म्हणून त्यांनी फोन ठेवला.

त्यानंतर त्यांनी त्वरित आपल्या सहकाऱ्यांना बोलावले.

''एक माहिती मिळाली आहे,'' त्यांनी बोलायला सुरुवात केली. ''इन्स्टाग्रामवर लहान मुलांना दत्तक देण्यासंदर्भातले काही व्हिडिओ फिरत आहेत. त्याबरोबर एक मोबाईल नंबरही आहे. ज्या कोणाला मूल दत्तक घ्यायचं असेल त्यांनी त्या नंबरवर कॉन्टॅक्ट करायचा, त्यानंतर पुढे डील होईल. आपल्याला काहीतरी क्विक ॲक्शन घ्यायला हवी. बघायला हवं... आपल्याकडे अडॉप्शनसाठी 'कारा' ही एकच सेंट्रल एजन्सी असताना हा उद्योग कोण करतंय?''

''येस मॅडम... बाकी काही लीड्स?''

''फार नाहीत अजून. पण आपलं नशीब चांगलं की आपल्याकडे डायरेक्ट त्या लोकांचा नंबरच आलाय. परफेक्ट ट्रॅप लावता येईल.''

सर्वांनी एकमताने माना डोलावल्या. एका महत्त्वाच्या पण गंभीर गुन्ह्याची उकल करून गुन्हेगारांना ताब्यात घ्यायला ते

सर्व सज्ज झाले होते.

***

लालाचा फोन वाजला तसे तो आजूबाजूला असलेल्या लोकांच्या गर्दीपासून काही अंतर दूर गेला आणि त्याने फोन कानाला लावला. पलीकडून एक माणूस घोगऱ्या आवाजात बोलत होता.

''तुमची जाहिरात पाहिली. आम्हाला मूल हवंय... अगदी कसंही करून. होईल का आमचं काम?'' तो अजिजीला येऊन विचारत होता.

''होईल की! त्यात काय!! फक्त बाकी फॉरमॅलिटी पुरी करावी लागेल. आणि ज्यांचं ते बाळ आहे त्यांना कृतज्ञता म्हणून छोटीशी मदत.''

''कसली मदत?'' त्या माणसाने विचारले.

प्रश्न अनपेक्षित होता. झटक्यात आलेल्या त्या प्रश्नाने लाला क्षणभर चपापला. मात्र त्याने ताबडतोब स्वत:ला सावरले आणि पुढे म्हणाला,

''असं बघा... कुणालाबी आपला पोटचा गोळा प्याराच असतो. पैशाची नड म्हणा किंवा बाकी काही, ते आपल्या रक्तामांसाचा तुकडा तुमच्या हवाली करणार. त्याबद्दल फूल ना फुलाची पाकळी... असं द्यायचं कायतरी.''

''किती द्यावे लागतील?'' समोरच्याने थेटच विचारले.

''आधी एक सांगा, तुम्हाला मुलगा हवाय की मुलगी?''

''का? रेट्स वेगळे आहेत दोघांसाठी?''

''हां... मुलगा पायजे असेल तर ७ लाख आणि मुलीसाठी ५ लाख.''

''भले शाब्बाश... इथेपण भेदभाव होय? असू देत. आम्हाला मुलगी हवी आहे. पण जरा लवकर. मिळेल का? थोडी अर्जन्सी आहे म्हणा हवं तर...''



**लालाचा फोन वाजला तसे तो आजूबाजूला असलेल्या लोकांच्या गर्दीपासून काही अंतर दूर गेला आणि त्याने फोन कानाला लावला. पलीकडून एक माणूस घोगऱ्या आवाजात बोलत होता.**

''तुम्ही बोलताय तर उद्याच! माल रेडी आहे. फक्त २० हजार ॲडव्हान्स पेमेंट करायला लागेल. मी सांगतो त्या गुगल पे नंबरवर तेवढी अमाऊंट ट्रान्सफर करा. मग तुम्हाला एक ॲड्रेस पाठवतो तिथे उद्या या आणि उरलेले पैशे देऊन पोरगी घेऊन जा.''

बाकी पुढची बोलणी झाली. हे 'डील' पूर्ण करण्यासाठी काय कोणकोणत्या गोष्टींची पूर्तता करावी लागेल याच्या सूचना देऊन झाल्या आणि दोघांकडूनही आपापले फोन बंद झाले.

''मॅडम, या पत्त्यावर उद्या बाळाला घेऊन येणारेत ते लोकं. त्यासाठी मला त्याने २० हजार रुपये ॲडव्हान्स पेमेंट ट्रान्सफर करायला सांगितलंय,'' अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षात कार्यरत असलेल्या एका सहकारी अंमलदारांनी गोरडे यांना माहिती दिली.

''गुड! आपण टार्गेटच्या बरेच जवळ पोहोचलोय आता. फक्त आजची रात्र, बस्स!!!'' मॅडम पत्ता वाचतावाचता बोलल्या तेव्हा त्यांचा चेहरा आनंदाने उजळून निघाला होता.

***

शहराच्या मध्यवस्तीपासून काहीसे दूर असलेल्या श्रद्धानंद हॉटेलचा परिसर. बहुधा गर्दीच्या जवळ नसल्याने त्या माणसांनी मुद्दाम त्या भागाची निवड केली असावी.

पोलीस पथक सुसज्ज होते. त्यांनी आपल्याजवळच्या एका बॅगेत मागितलेल्या रकमेनुसार काही नोटा ठेवल्या होत्या. आता

प्रतीक्षा होती फक्त त्या बाळाच्या येण्याची... आणि त्या गुन्हेगारांना रंगेहाथ पकडायची.

थोडा वेळ गेला. समोरून एक गाडी आली. त्यातून पाचसहा जण उतरले. त्यात एक महिला होती. तिच्या कडेवर एक तान्हे बाळ होते. बाळ शांतपणे झोपलेले होते. त्याला आपल्या अवतीभवती घडत असलेल्या या प्रकाराची काहीही जाणीव नव्हती.

पोलिसांच्या पथकातील एका अंमलदारांनी त्या लोकांकडे पाहून हात उंचावला तसे ते चालत त्यांच्या दिशेने आले.

ते पुरेसे जवळ येताच त्या महिलेच्या कडेवरील बाळाला स्वत: मॅडमनी चपळाईने ताब्यात घेतले. काहीतरी गडबड असल्याचे त्या लोकांच्या लक्षात आले. पण आता त्यांना कुठल्याही हालचाली करणे अशक्य होते. पोलिसांनी त्यांना चहूबाजूने घेरले होते. काही सेकंदांच्या कालावधीत त्यांचा खेळ खल्लास झाला होता.

***

एकूण चार पुरुष आणि एक स्त्री असे पाचजण पोलिसांच्या ताब्यात आले होते.

''बोला, अजून कोणकोण आहेत तुमच्याबरोबर? हे बाळ कुणाचं आहे?'' पोलिसांनी दरडावून विचारले.

त्यांनी आपल्या टोळीतील इतर साथीदारांची नावे सांगितली. बाळाची आई मात्र नक्की कोण हे त्यांना माहिती नव्हते. सुरजाबानो नावाच्या महिलेकडून आपल्याकडे हे बाळ आल्याचे त्या महिलेने पोलिसांना सांगितले.

''तुम्ही एकमेकांच्या संपर्कात असालच ना? तुमच्या साथीदारांना कळलंच असेल तुम्ही आता सरकारी पाहुणचार घेताय ते!''



**थोडा वेळ गेला. समोरून एक गाडी आली. त्यातून पाचसहा जण उतरले. त्यात एक महिला होती. तिच्या कडेवर एक तान्हे बाळ होते. बाळ शांतपणे झोपलेले होते. त्याला आपल्या अवतीभवती घडत असलेल्या या प्रकाराची काहीही जाणीव नव्हती.**

त्यांनी फक्त माना डोलावल्या.

''तिचा नंबर बोल.''

''कुणाचा?''

''तीच ती. सुरजाबानो.''

''लालाकडे आहे.''

लालाकडून पोलिसांनी सुरजाबानो हिचा नंबर मिळवला. ती त्याच्या सतत संपर्कात होती. मात्र पोलिसांनी तिचा नंबर फिरवून पाहिला तेव्हा तो बंद असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. अखेरीस तांत्रिक पुराव्यान्वये पोलिसांनी त्या नंबरच्या आधारे तिचे लोकेशन मिळवून तिला त्या ठिकाणावरून ताब्यात घेतले.

गुन्ह्याचा तपास पूर्ण करून सर्व आरोपींच्या विरोधात मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

सदर प्रकरणाचा तपास बदलापूर (पश्चिम) पोलीस ठाणे येथे ठाणे गुन्हे शाखेच्या अंतर्गत असलेल्या अनैतिक मानवी वाहतूक कक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैशाली गोरडे, सहायक पोलीस निरीक्षक स्नेहल शिंदे, सहायक पोलीस उपनिरीक्षक विजय पाटील आणि पोलीस अंमलदार राजेश सुवारे, तसेच महिला पोलीस अंमलदार हर्षदा थोरात यांनी उत्कृष्ट प्रकारे पूर्ण केला आहे. ■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***



एस वाय संदे
छत्रपती संभाजीनगर

# एमपीएससी अधिकारी बनण्याचा राजमार्ग

## एमपीएससी पूर्व परीक्षा यशाची पहिली पायरी:

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची पूर्व परीक्षा ही राज्यसेवेत अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण करण्याची पहिली पायरी आहे. पदवीच्या स्तरावर शिकणाऱ्या विद्यार्थ्याने जर योग्य नियोजन केले, तर पदवी शिक्षणासोबतच राज्यसेवा परीक्षेची तयारीही प्रभावीपणे करता येते. यासाठी सातत्य, योग्य दिशा आणि शिस्तबद्ध अभ्यास पद्धती आवश्यक असते.

## अभ्यासक्रम नीट समजून घेणे:

राज्यसेवा पूर्व परीक्षेची तयारी सुरू करण्यापूर्वी सर्वात महत्त्वाची पायरी म्हणजे अभ्यासक्रम पूर्णपणे समजून घेणे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग ज्या अधिकृत अधिसूचना आणि अभ्यासक्रम जाहीर करतो, त्याचे बारकाईने वाचन करणे आवश्यक आहे. अनेक विद्यार्थी थेट पुस्तके वाचायला सुरुवात करतात; परंतु अभ्यासक्रम न समजल्यामुळे अभ्यासाची दिशा चुकू शकते. अभ्यासक्रम वाचताना प्रत्येक घटकाचे उपघटक वेगळे लिहून काढावेत. उदाहरणार्थ, राज्यशास्त्रात मूलभूत अधिकार आणि राज्य धोरणाची तत्त्वे हे स्वतंत्र मुद्दे म्हणून नोंदवावेत.

## पूर्व परीक्षा मागील प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण:

राज्यसेवा पूर्व परीक्षेतील मागील प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण म्हणजे फक्त प्रश्न सोडवणे नाही, तर त्यातून परीक्षेची धार, वारंवार विचारलेले टॉपिक, विचारलेली संकल्पना आणि तयारीचे खाचखळगे समजून घेणे हे खरोखर महत्त्वाचे आहे. योग्य विश्लेषण केल्यास तुमच्या अभ्यासाला दिशा मिळते आणि वेळेचा योग्य प्रकारे वापर शक्य होतो. ही परीक्षाभिमुख तयारीसाठी अत्यंत महत्त्वाची पायरी. प्रकरण निहाय विश्लेषण केले तर कोणते टॉपिक महत्त्वाचे आणि कोणते कमी महत्त्वाचे असे वर्गीकरण करता येते. त्यासोबत वेळेची बचत होते. एखाद्या विषयातील महत्त्वाची उप-घटके कळतात. प्रश्नांची धार, काठिण्य पातळी समजते. कोणत्या विषयावर वारंवार प्रश्न येतात हे दिसते.

मागील दहा वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण विद्यार्थ्यांनी करावे.

## राज्यसेवा पूर्व परीक्षा बेसिक तयारी कशी करावी?

महाराष्ट्र लोकसेवा आयोग आयोजित राज्यसेवा पूर्व परीक्षेची तयारी करताना सर्वात महत्त्वाची पायरी म्हणजे भक्कम बेसिक (मूलभूत) तयारी होय. अनेक विद्यार्थी थेट अवघड संदर्भ पुस्तके किंवा क्लास नोट्सकडे वळतात; परंतु पायाभूत संकल्पना मजबूत नसतील तर पुढील अभ्यास परिणाकारक होत नाही. बेसिक तयारीची सुरुवात अधिकृत अभ्यासक्रम व परीक्षा पद्धती समजून घेण्यापासून करावी.

महाराष्ट्र राज्य मंडळाची पुस्तके यामध्ये इतिहास, भूगोल, सायन्स, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र या विषयांची सहावी ते बारावी पर्यंतची पुस्तके वाचावी. त्यातील संकल्पना नीट समजून घेऊन त्याच्या नोट्स काढून ठेवाव्या. नोट्स आपल्या हस्ताक्षरात काढाव्यात म्हणजे लिखाणाची प्रॅक्टिस तसेच हस्ताक्षर सुधारणा या दोन्ही गोष्टी साध्य होतील. बेसिक तयारी करताना सर्व विषय एकाच वेळी सुरू करू नयेत. एक विषय पूर्णपणे समजून घेतल्यावर पुढे जा. यामुळे गोंधळ कमी होतो. बेसिक तयारीच्या काळातच नोट्स तयार करण्याची सवय लावा. हस्तलिखित नोट्स स्मरणशक्तीसाठी उपयुक्त असतात. नंतरच्या पुनरावृत्तीत या नोट्स फार मदत करतात.

अनेक विद्यार्थी बेसिक तयारीत फक्त जीएस वर लक्ष केंद्रित करतात. परंतु सीसॅट साठी कोणतीही बेसिक तयारी करत नाहीत. ज्या मुलांचे गणित आणि बुद्धिमापन कच्चे आहे त्यांनी विशेषकरून याच काळात या विषयावर पकड मिळवणे गरजेचे आहे. सीसॅट केवळ पात्र विषय असला तरी एमपीएससीच्या इतर परीक्षेत याचे महत्त्व अधोरेखित होते. तेव्हा या विषयाकडे दुर्लक्ष करू नये.

महाराष्ट्र राज्य मंडळाची पुस्तके यामध्ये इतिहास, भूगोल, सायन्स, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र या विषयांची सहावी ते बारावी पर्यंतची पुस्तके वाचावी. त्यातील संकल्पना नीट समजून घेऊन त्याच्या नोट्स काढून ठेवाव्या. नोट्स आपल्या हस्ताक्षरात काढाव्यात म्हणजे लिखाणाची प्रॅक्टिस तसेच हस्ताक्षर सुधारणा या दोन्ही गोष्टी साध्य होतील.

## संदर्भग्रंथ वाचनाचे महत्त्व:

महाराष्ट्र लोकसेवा आयोग आयोजित राज्यसेवा पूर्व परीक्षेची तयारी करताना संदर्भ ग्रंथ वाचन ही अत्यंत महत्त्वाची पायरी आहे. बेसिक तयारी (राज्य मंडळ) पूर्ण झाल्यानंतरच संदर्भ पुस्तकांकडे वळावे. थेट अवघड पुस्तके वाचण्यापेक्षा संकल्पना स्पष्ट झाल्यानंतर केलेले वाचन अधिक परिणामकारक ठरते. विषयाची सखोल समज विकसित होते. तथ्ये व विश्लेषणात्मक दृष्टिकोन मिळतो. वस्तुनिष्ठ प्रश्नांसाठी अचूक माहिती मिळते. पुनरावृत्ती करताना संकल्पना अधिक स्पष्ट होतात.

पूर्व परीक्षेतील प्रश्न अनेकदा थेट पुस्तकातील संकल्पनांवर आधारित असतात. त्यामुळे दर्जेदार व विश्वासार्ह पुस्तके निवडणे गरजेचे आहे.

## नोट्स मेकिंग:

परीक्षेत यश मिळवण्यासाठी नोट्स मेकिंग ही अत्यंत महत्त्वाची सवय आहे. अभ्यास कितीही केला तरी योग्य नोट्स नसतील, तर पुनरावृत्तीच्या वेळी अडचण येते. चांगल्या नोट्स म्हणजे संपूर्ण अभ्यासाचा सारांश असतो.

नोट्स म्हणजे पुस्तकाची नक्कल नव्हे, तर स्वतःच्या शब्दांत मांडलेला सारांश. यामुळे मोठ्या अभ्यासक्रमाचे संक्षिप्त रूप तयार होते. पुनरावृत्ती जलद व प्रभावी होते. महत्त्वाचे मुद्दे लक्षात राहतात. परीक्षेपूर्वी शेवटच्या दिवसांत फक्त नोट्स वाचणे शक्य होते. पहिल्याच वाचनात सविस्तर नोट्स बनवू नयेत. दुसऱ्या वाचनात महत्त्वाचे मुद्दे अधोरेखित करा. तिसऱ्या वाचनात संक्षिप्त नोट्स तयार करा. ▪



सुरेश वांदिले
मुंबई

# डिजिटल ज्ञानसंपदा!

**‘डिजिटल इंडिया’ अभियानाअंतर्गत सरकारने अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी विविध डिजिटल व्यासपीठे उपलब्ध करून दिलेली आहेत. या व्यासपीठांवर जागतिक दर्जाचे शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. यापैकी बहुतांश अभ्यासक्रम विनामूल्य असून, विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनाचा मार्ग मोकळा झाला आहे. या व्यासपीठांचा मागोवा घेणारा लेख.**



भारत सरकारने ‘डिजिटल इंडिया’ अभियानाअंतर्गत अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी अनेक डिजिटल व्यासपीठे उपलब्ध करून दिलेली आहेत. यांवर जागतिक दर्जाचे शैक्षणिक साहित्य उपलब्ध आहे. यातील बहुतांश अभ्यासक्रम विनामूल्य असून, स्वयंअध्ययनासाठी ही व्यासपीठे उपयुक्त ठरत आहेत.

## नॅशनल प्रोग्रॅम ऑन टेक्नॉलॉजी एनहान्स्ड लर्निंग (एनपीटीईएल)

हे व्यासपीठ आयआयटी मुंबई, दिल्ली, कानपूर, खरगपूर, मद्रास, गुवाहाटी, रुरकी, इंदौर आणि गांधीनगर यांसारख्या आयआयटीजच्या सहकार्याने चालवले जाते. ज्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष आयआयटीमध्ये प्रवेश मिळू शकत नाही, त्यांच्यासाठी ही एक 'व्हर्च्युअल आयआयटी'च आहे. येथे एक हजाराहून अधिक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. आयआयटीमधील ज्येष्ठ प्राध्यापकांचे व्हिडिओ व व्याख्याने येथे विनामूल्य पाहता येतात. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर अत्यल्प शुल्क भरून परीक्षा देता येते. परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर आयआयटीचे प्रमाणपत्र मिळते. हे प्रमाणपत्र वेगवेगळ्या क्षेत्रांत रोजगार मिळवताना उपयोगी पडते. २०२६ मध्ये एनपीटीईएलने 'डिसिप्लिन स्टार्स' आणि विशिष्ट विषयांतील 'डोमेन सर्टिफिकेट्स' सुरू केल्यामुळे उद्योगांना हवे असणारे विशेष कौशल्य मिळवणे सोपे झाले आहे.

### १. डिसिप्लिन स्टार्स

हे एक प्रकारचे विशेष गौरव पदक असून ते विद्यार्थ्याची सातत्यपूर्ण कामगिरी लक्षात घेऊन दिले जाते. विद्यार्थ्यांनी मूळ विद्याशाखेतील (उदा. कॉम्प्युटर सायन्स) अभ्यासाशिवाय इतर अभ्यासक्रमांत उत्कृष्ट गुण मिळवल्यास त्यांना 'डिसिप्लिन स्टार' म्हणून ओळखले जाते. पदवीसोबतच तुम्ही एखाद्या विशिष्ट विषयात तज्ज्ञ आहात हे सिद्ध करण्यासाठी या प्रमाणपत्रांचा उपयोग होतो. डिसिप्लिन स्टार्समुळे विद्यार्थ्याची शिकण्याची चिकाटी अधोरेखित होते.

### २. डोमेन सर्टिफिकेट्स

> स्वयम हे केंद्रीय शिक्षण मंत्रालयामार्फत चालवले जाणारे 'मॅसिव्ह ओपन ऑनलाईन कोर्सेस' व्यासपीठ आहे. अभियांत्रिकी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एनपीटीईएलचे अभ्यासक्रम येथे उपलब्ध होतात.

जेव्हा एखादा विद्यार्थी एका विशिष्ट विषयाच्या क्षेत्रात (उदा. आर्टिफिशिअल इंटेलिजन्स) प्रभुत्व मिळवू इच्छितो, तेव्हा त्याला डोमेन सर्टिफिकेशनचा पर्याय दिला जातो. हे सर्टिफिकेट मिळवल्याने त्यातील सर्व मूलभूत आणि प्रगत पैलूंचा सखोल अभ्यास केल्याचे सिद्ध होते. हे प्रमाणपत्र औद्योगिक क्षेत्रामध्ये नोकरी मिळवण्यासाठी उपयोगी ठरते.

**संकेतस्थळ**

https://nptel.ac.in/

### ३. स्वयम (SWAYAM – स्टडी वेब्ज ऑफ ॲक्टिव्ह लर्निंग फॉर ॲस्पायरिंग माईंड्स)

हे केंद्रीय शिक्षण मंत्रालयामार्फत चालवले जाणारे 'मॅसिव्ह ओपन ऑनलाईन कोर्सेस' (MOOCs) व्यासपीठ आहे. अभियांत्रिकी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एनपीटीईएलचे अभ्यासक्रम या व्यासपीठावर उपलब्ध होतात. २०२६ मधील 'नॅशनल क्रेडिट फ्रेमवर्क' (एनसीआरएफ– राष्ट्रीय श्रेयांक आराखडा/रचना) मुळे विद्यार्थी आता पदवीसाठी लागणाऱ्या एकूण क्रेडिट्स (श्रेयांक) पैकी ४० टक्क्यांपर्यंत क्रेडिट्स 'स्वयम'वरील ऑनलाईन अभ्यासक्रमांमधून मिळवून आपल्या विद्यापीठाच्या निकालात जोडू शकतात.

**संकेतस्थळ**

https://swayam.gov.in/

### ४. व्हर्च्युअल लॅब्ज

हे व्यासपीठ केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि विविध आयआयटीज यांच्या साहाय्याने चालवले जाते. अभियांत्रिकीमध्ये प्रत्यक्ष प्रयोगांना खूप महत्त्व असते. अनेक महाविद्यालयांमध्ये अत्याधुनिक उपकरणांची कमतरता असते. त्यामुळे 'व्हर्च्युअल लॅब' चा उपयोग करून प्रात्यक्षिकाचे




**केंद्रीय शिक्षण मंत्रालयामार्फत चालवले जाणारे दीक्षा हे व्यासपीठ केवळ शालेय शिक्षणासाठीच नव्हे तर 'पूर्व-अभियांत्रिकी' (प्री इंजिनीअरिंग) तयारीसाठीचा उत्तम स्रोत आहे.**

ज्ञान प्राप्त करता येते. २०२६ मध्ये या लॅब्ज 'ऑगमेंटेड रिॲलिटी' (एआर) आणि 'व्हर्च्युअल रिॲलिटी' (व्हीआर) तंत्रज्ञानाशी जोडल्या गेल्या आहेत. रिमोटद्वारे विद्यार्थी संगणकावर किंवा मोबाईलवर विविध प्रयोग करू शकतात. यामध्ये मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, सिव्हिल आणि कॉम्प्युटर सायन्सच्या शेकडो प्रयोगांचे सिम्युलेशन (एखादी प्रत्यक्ष प्रक्रिया, यंत्रणा किंवा परिस्थिती यांचा संगणकीय प्रणाली किंवा प्रारूपाच्या (मॉडेल) साहाय्याने केलेला हुबेहूब सराव किंवा आभासी अनुभव) उपलब्ध आहे.

**संकेतस्थळ**

https://www.vlab.co.in/

### ५. दीक्षा (DIKSHA – डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर फॉर नॉलेज शेअरिंग)

हे व्यासपीठ केंद्रीय शिक्षण मंत्रालयामार्फत चालवले जाते. हे व्यासपीठ शालेय शिक्षणासाठी असले तरी, 'पूर्व–अभियांत्रिकी' (प्री इंजिनीअरिंग) तयारीसाठीचा उत्तम स्रोत आहे. १२ वी विज्ञानशाखेचा पाया

> शालेय स्तरावर अभियांत्रिकीपूर्व तयारीसाठी दीक्षा हे व्यासपीठ उपयुक्त ठरते. गणित, विज्ञान, संगणकशास्त्र यांसारख्या विषयांचे डिजिटल स्वरूपातील विपुल साहित्य या ठिकाणी उपलब्ध आहे.

पक्का करण्यासाठी, एनसीईआरटी (नॅशनल काऊन्सिल ऑफ एज्युकेशन, रीसर्च ॲण्ड ट्रेंनिग–राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद), सीबीएसई(सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन–केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ) पाठ्यपुस्तके आणि जेईई (जॉईंट एन्ट्रन्स एक्झामिनेशन) सारख्या परीक्षांच्या मूलभूत तयारीसाठी येथे क्यूआर कोडवर आधारीत डिजिटल सामग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे. अभियांत्रिकीच्या पहिल्या वर्षाला लागणाऱ्या मूलभूत संकल्पना स्पष्ट करण्यासाठी हे पोर्टल उपयुक्त ठरते.

शालेय शिक्षणासाठी डिजिटल पाठ्यपुस्तके, व्हिडिओ, क्विझ, इंटरॲक्टिव्ह कॉन्टेंटचा मोठा साठा येथे उपलब्ध आहे. हे साहित्य मराठीसह ३६ भारतीय भाषांमध्ये दिलेले आहे.

**शिक्षकांसाठी–** धड्याचे नियोजन (लेसन प्लॅन), वर्कशीट्स, डिजिटल मूल्यांकन साधने,

**विद्यार्थ्यांसाठी–** सराव प्रश्न, स्व–अभ्यासाच्या सोयीसुविधा, इंटरॲक्टिव्ह व्हिडिओ,

**आणि पालकांसाठी–** मुलांच्या अभ्यासक्रमाशी निगडीत डिजिटल सामग्री व मार्गदर्शन यावर उपलब्ध आहे.

शालेय स्तरावर अभियांत्रिकीपूर्व तयारीसाठी हे व्यासपीठ उपयुक्त ठरते. गणित, विज्ञान, संगणकशास्त्र यांसारख्या




**कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयामार्फत चालवले जाणारे स्किल इंडिया डिजिटल हब हे व्यासपीठ उद्योगांना लागणारी कौशल्ये आत्मसात करण्यासाठी उपयुक्त आहे.**

विषयांचे डिजिटल स्वरूपातील विपुल साहित्य या ठिकाणी उपलब्ध आहे.

**संकेतस्थळ**

https://diksha.gov.in/

## ६. स्किल इंडिया डिजिटल हब

हे व्यासपीठ कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयमार्फत चालवले जाते. पदवी शिक्षणासोबतच उद्योगांना लागणारी कौशल्ये आत्मसात करण्यासाठी हे व्यासपीठ उपयुक्त ठरते. एआय, कोडिंग, डेटा सायन्स आणि सायबर सिक्युरिटी यांसारख्या आधुनिक क्षेत्रांमधील अभ्यासक्रमासाठीचे साहित्य इथे उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी आणि 'ॲप्रेंटिसशिप' मिळवून देण्यासाठी हे पोर्टल साहाय्य

> अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना पदवी अभ्यासक्रमाच्या कालावधीत उद्योगांसाठी आवश्यक असणारी (इंडस्ट्री-रेडी) कौशल्ये मिळवण्यासाठी स्किल इंडिया डिजिटल हब हे पोर्टल उपयुक्त ठरते.

करते. विद्यार्थ्यांना एआय, मशीन लर्निंग, डिजिटल मार्केटिंग, कोडिंग यांसारख्या आधुनिक कौशल्यांमध्ये प्रशिक्षित होता येते. या व्यासपीठावर इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोटिव्ह, आयटी, हेल्थकेअर इत्यादी क्षेत्रांमधील अभ्यासक्रम विनामूल्य व सशुल्क उपलब्ध आहेत. नोकरी व ॲप्रेंटिसशिप संधी मिळवून देण्यासाठी, नॅशनल करिअर सर्व्हिस पोर्टलशी हे पोर्टल जोडलेले आहे. विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारीत डिजिटल सीव्ही तयार करण्यासही साहाय्य केले जाते. या सीव्हीने विद्यार्थ्यांचे कौशल्य प्रमाणित होते. रोजगार मिळण्यासाठी याचा उपयोग होतो. प्रत्यक्ष प्रशिक्षण सत्रे (लाइव्ह ट्रेनिंग सेशन्स) आयोजित केली जातात. यामध्ये उद्योगतज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाते. हे अभ्यासक्रम मराठीसह अनेक भाषांमध्ये उपलब्ध आहेत. यंदा 'ग्रीन स्किल्स' (शाश्वत ऊर्जा) आणि नॅनो-तंत्रज्ञान यावर विशेष अभ्यासक्रम समाविष्ट करण्यात आले आहेत. अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना पदवी अभ्यासक्रमाच्या कालावधीत उद्योगांसाठी आवश्यक असणारी (इंडस्ट्री-रेडी) कौशल्ये मिळवण्यासाठी हे पोर्टल उपयुक्त ठरते.

**संकेतस्थळ**

www.skillindiadigital.gov.in/

### ७. नॅशनल डिजिटल लायब्ररी ऑफ इंडिया (एनडीएलआय)

हे व्यासपीठ आयआयटी खरगपूर चालवते. हे भारताचे सर्वात मोठे डिजिटल वाचनालय आहे. पुस्तके, शोधनिबंध, व्हिडिओ लेक्चर्स आणि जुन्या प्रश्नपत्रिका अशा विपुल शैक्षणिक साहित्याचा संग्रह येथे आहे. हे साहित्य अनेक भारतीय भाषांमध्ये उपलब्ध आहे.

**संकेतस्थळ**

https://ndl.iitkgp.ac.in/

### ८. ई-यंत्र (e-Yantra)

या व्यासपीठाची जबाबदारी आयआयटी मुंबईवर आहे. रोबोटिक्स आणि ऑटोमेशनमध्ये रस असलेल्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त प्रकल्प या ठिकाणी ठेवण्यात आले आहेत. प्रकल्प-आधारीत शिक्षणाद्वारे विद्यार्थी क्लिष्ट तांत्रिक समस्या सोडवायला शिकतात. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांद्वारे विद्यार्थ्यांना स्वत:चे कौशल्य सिद्ध करण्याची संधी मिळते.

**संकेतस्थळ**

https://www.e-yantra.org/

### ९. एआयसीटीई (ऑल इंडिया काउन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन-अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद) इंटर्नशिप पोर्टल

कामाचा प्रत्यक्ष अनुभव मिळवून देण्यासाठीचे हे पोर्टल विद्यार्थ्यांना विविध सरकारी आणि खासगी कंपन्यांशी जोडते. स्मार्ट सिटी प्रकल्प वा नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये विद्यार्थी आपल्या आवडीनुसार इंटर्नशिप शोधून नोंदणी करू शकतात.

**संकेतस्थळ**

> कामाचा प्रत्यक्ष अनुभव मिळवून देण्यासाठीचे एआयसीटीई इंटर्नशिप पोर्टल हे पोर्टल विद्यार्थ्यांना विविध सरकारी आणि खासगी कंपन्यांशी जोडते.

https://internship.aicte-india.org/

### १०. नीएट (नॅशनल एज्युकेशनल अलायन्स फॉर टेक्नॉलॉजी-तंत्रज्ञानासाठी राष्ट्रीय शैक्षणिक आघाडी)

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे हे पोर्टल एआय तंत्रज्ञानाचा वापर करून वैयक्तिक शिकण्याच्या गरजा पूर्ण करते. येथे जगभरातील सर्वोत्तम शैक्षणिक कंपन्यांचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना हे अभ्यासक्रम मोफत मिळण्याची तरतूद आहे.

**संकेतस्थळ**

https://neat.aicte-india.org/

### ११. स्पोकन ट्युटोरियल

आयआयटी मुंबईचे हे 'सेल्फ-लर्निंग' पोर्टल, सॉफ्टवेअर प्रोग्रॅमिंग शिकण्यासाठी सर्वोत्तम आहे. पायथन, जावा, सी++ यांसारख्या भाषा मराठीतून ऑडिओ-व्हिडिओ स्वरूपात येथे शिकता येतात. यासाठी इंटरनेटची गती कमी असली तरी चालू शकते.

**संकेतस्थळ**

https://spoken-tutorial.org/

### १२. समर्थ ई-गव्ह (सीमलेस ॲडमिनिस्ट्रेटिव्ह मॅनेजमेंट ॲण्ड रिसोर्स ट्रॅकिंग फॉर हायर एज्युकेशन

हे पोर्टल जरी विद्यापीठांच्या व्यवस्थापनासाठी असले, तरी त्यात विद्यार्थ्यांसाठी अनेक सुविधा आहेत. त्याच्या प्रवेशापासून निकालापर्यंतची सर्व माहिती आणि डिजिटल सेवा एकाच लॉगिनमध्ये या ठिकाणी उपलब्ध होते.

**मुख्य पोर्टल**

https://samarth.edu.in ■



संजीवनी भिंगारे
कोल्हापूर

# मानसिक समतोल
# तणावावर मात करण्याचा मंत्र




मानवी जीवनाच्या प्रवाहात 'तणाव' हा केवळ एक प्रसंगापुरता राहीला नसून तो आधुनिक काळाचा जणू अविभाज्य घटक बनला आहे. वेगवान जीवनशैली, स्पर्धेची धग, अपेक्षांचे ओझे आणि सतत बदलणारी सामाजिक-सांस्कृतिक परिस्थिती या सर्वांचा परिणाम म्हणून मनावर एक अदृश्य ताण साचत जातो. परंतु तणाव ही केवळ नकारात्मक शक्ती नाही; तो योग्य पद्धतीने हाताळला तर व्यक्तिमत्त्व घडविण्याचे साधनही ठरू शकतो. प्रश्न तणावाचा नसून त्याच्या व्यवस्थापनाचा आहे.

तणाव व्यवस्थापन म्हणजे केवळ तणाव कमी करणे नव्हे, तर मन, बुद्धी आणि भावना यांचा संतुलित संवाद साधणे होय. ही एक अंतर्मुख साधना आहे; ज्यातून माणूस स्वतःला अधिक खोलवर ओळखतो.

### आत्मजागरूकता : तणावाचा मूळ शोध

तणावाचा सामना करण्याची

पहिली पायरी म्हणजे त्याच्या मूळ कारणांची जाणीव. अनेकदा आपण बाह्य परिस्थितीला दोष देतो, परंतु खरे कारण आपल्या विचारसरणीत, अपेक्षांमध्ये किंवा अपूर्णतेच्या भावनेत दडलेले असते. आत्मपरीक्षणाची सवय – रोज काही मिनिटे शांत बसून स्वतःच्या भावनांचे निरीक्षण मनाला स्थैर्य देते. 'मला नेमका कशाचा ताण आहे?' हा प्रश्न विचारणे म्हणजे समस्येच्या मुळाशी जाण्याची सुरुवात.

## श्वास आणि शरीर यांचा संवाद- ध्यान व प्राणायाम

मानवी शरीरात श्वास हा मनाचा दुवा आहे. जेव्हा तणाव वाढतो, तेव्हा श्वास वेगवान आणि अस्थिर होतो. याउलट, संथ आणि सखोल श्वास मनाला शांत करतो. प्राणायाम, ध्यान आणि योग या भारतीय परंपरेतील साधना मनातील गोंधळ शांत करतात. रोज काही मिनिटे 'दीर्घ श्वसन' किंवा 'अनुलोम–विलोम' केल्यास मनावरचे ओझे हलके होते.

## वैचारिक शक्तीची पुनर्रचना व सकारात्मक दृष्टिकोन

तणावाचे एक प्रमुख कारण म्हणजे नकारात्मक विचारसरणी. 'मी हे करू शकत नाही', 'माझ्याकडून चूक होईल' अशा विचारांमुळे मन स्वतःच स्वतःवर बंधने घालते.

सकारात्मक विचारसरणी म्हणजे केवळ आंधळा आशावाद नव्हे, तर वास्तववादी दृष्टिकोन ठेवून परिस्थितीचा स्वीकार करून त्यात संधी शोधणे. अपयशाला शिकवण म्हणून पाहणे आणि प्रत्येक अडचणीतून काहीतरी शिकण्याचा दृष्टिकोन विकसित करणे हे तणाव कमी करण्याचे प्रभावी साधन आहे.

## वेळ व्यवस्थापन

तणावाचा एक मोठा स्रोत म्हणजे वेळेचा अभाव आणि कामांचा ढीग. योग्यप्रकारे नियोजन केल्यास अनेक ताणतणाव आपोआप कमी होतात. त्यासाठी प्राधान्यक्रम निश्चित करणे, कामांचे छोटे–छोटे भाग करणे आणि ते पूर्णत्वास नेणे, विश्रांतीसाठी वेळ राखून ठेवणे या गोष्टीही करणे आवश्यक असते. ही अगदी साधी दिसणारी पण महत्त्वाची तत्त्वे आयुष्य अधिक सुकर बनवतात. वेळेचे व्यवस्थापन म्हणजे जीवनाचे व्यवस्थापन होय. हे लक्षात घेतल्यास आपण ठरवलेली ध्येये पूर्ण करण्याच्या दृष्टीने तणावमुक्त वातावरणात वाटचाल करू लागतो.

## भावनिक संवाद- मन मोकळे करण्याची कला

तणाव मनात साठवून ठेवणे म्हणजे जणू बंद भांड्यात वाफ साठवणे. एक दिवस ते फुटणारच. त्यामुळे भावनांना व्यक्त करणे आवश्यक आहे.

विश्वासू मित्र, कुटुंबीय किंवा सल्लागार यांच्याशी संवाद साधणे मनाला हलके करते. तसेच लेखन ही अजून एक प्रभावी पद्धत आहे, ज्यातून आपण स्वतःशी संवाद साधतो.

## शारीरिक हालचाल- शरीरातच मनाचा निवास

नियमित व्यायाम, चालणे, योग किंवा कोणतीही शारीरिक क्रिया शरीरात 'एंडॉर्फिन्स' स्रवण्यास साहाय्यभूत असतात, जे नैसर्गिक तणावनाशक आहे.

शरीर आणि मन यांचा अतूट संबंध आहे. शरीर निरोगी असेल तर मन अधिक स्थिर राहते. म्हणूनच सुदृढ आरोग्य ही तणाव व्यवस्थापनाची मूलभूत अट आहे.

## आध्यात्मिकता हाच खरा अंत:शांतीचा स्रोत

तणावाच्या परिस्थितीतून निर्माण होणाऱ्या गोंधळात माणूस अनेकदा स्वतःपासून दूर जातो. अशा वेळी आध्यात्मिकता अथवा प्रार्थना, ध्यान किंवा कोणत्याही श्रद्धेचा आधार हा मनाला दिशा देणारा ठरू शकतो. ही केवळ धार्मिक कृती नसून, 'स्वतः च्या अस्तित्वाशी' संवाद साधण्याची प्रक्रिया आहे. यातून जीवनाचा व्यापक अर्थ समजतो आणि तणावाचे स्वरूप लहान वाटू लागते.

## तणावातून समत्वाकडे

तणाव हा आयुष्याचा शत्रू नाही; तो एक संकेत आहे. आपल्या जीवनात काहीतरी बदलाची गरज आहे. त्या बदलाला टाळण्याऐवजी समजून घेणे आणि योग्य पद्धतीने हाताळणे हेच खरे तणाव व्यवस्थापन आहे.

मनाचा समतोल साधणे ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. त्यातून माणूस अधिक सजग,

अधिक संवेदनशील आणि अधिक सक्षम बनतो.

शेवटी तणावावर मात करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे; स्वतःशी प्रामाणिक राहणे, वर्तमान क्षणाचा स्वीकार करणे आणि आयुष्याकडे एक व्यापक, शांत आणि सकारात्मक दृष्टीने पाहणे. 'मन शांत असेल, तर जगातील कोणताही वादळ आपल्याला ढवळून काढू शकत नाही.'

## तणाव-मनाच्या मशागतीतून मुक्ततेचा प्रवास

तणाव हा आधुनिक युगाचा अपरिहार्य भाग असला तरी तो आपल्या अस्तित्वाचा शत्रू नाही, तर तो आपल्या जीवनशैलीत बदल करणारी एक सूचना आहे. तणाव व्यवस्थापन म्हणजे आपल्या अंतर्मनाला अधिक लवचिक आणि शांत बनवणे होय. या विषयावर काही सखोल आणि साहित्यात्मक विचार खालीलप्रमाणे मांडता येतील

## स्व-संवादाची संजीवनी

तणावाचा उगम परिस्थितीपेक्षा आपल्या प्रतिसादात अधिक असतो. जेव्हा आपण स्वतःला 'मी हे करू शकणार नाही' असे सांगतो, तेव्हा तणाव वाढतो. त्याऐवजी, स्वतःशी सकारात्मक आणि वास्तववादी संवाद साधणे ही तणावमुक्तीची पहिली पायरी आहे. आपल्या मनाशी असलेले नाते जेवढे मैत्रीपूर्ण असेल, तेवढा तणावाचा प्रभाव कमी होतो.

## 'वर्तमान' या क्षणाचे माहात्म्य

तणाव हा बहुधा भूतकाळातील पश्चात्ताप किंवा भविष्यातील भीतीतून जन्माला येतो. आजच्या क्षणात जगणे हा त्यावरचा अमोघ उपाय आहे. ज्या गोष्टी आपल्या नियंत्रणात नाहीत, त्यांची चिंता सोडून 'आज' आणि 'आता' आपण काय सर्वोत्तम करू शकतो, यावर लक्ष केंद्रित करणे म्हणजे तणावाचा निचरा करणे होय.

## स्वीकृतीचे सामर्थ्य

आयुष्यातील प्रत्येक गोष्ट आपल्या मनाप्रमाणे घडणार नाही, हे सत्य स्वीकारणे म्हणजेच मानसिक शांतीच्या दिशेने पडलेले पहिले पाऊल. ज्या गोष्टी आपण बदलू शकत नाही, त्या स्वीकारणे आणि ज्या बदलू शकतो, तिथे प्रयत्न करणे, यांच्यातील फरक ओळखून त्याप्रमाणे आपले वागणे ठेवणे म्हणजे उच्च दर्जाचे तणाव व्यवस्थापन आहे.

## निसर्ग आणि एकांताचा सहवास

माणूस हा निसर्गाचा अंश आहे. जेव्हा आपण निसर्गाच्या सान्निध्यात जातो, तेव्हा आपली मानसिक लय निसर्गाच्या शांत गतीशी जुळते. दिवसातील काही वेळ स्वतःसाठी राखून ठेवणे, मौन पाळणे किंवा निव्वळ शांत बसणे यामुळे मेंदूला विश्रांती मिळते आणि नवीन ऊर्जा प्राप्त होते.

## शरीर आणि मनाचे अद्वैत-

मनावरचा ताण शरीरावर दिसतो आणि शरीराचा थकवा मनावर परिणाम करतो. नियमित व्यायाम, सकस आहार आणि पुरेशी झोप या त्रिसूत्रीमुळे शरीर सक्षम बनते. शरीर साथ देऊ लागले, की मनही कठीण प्रसंगांना सामोरे जाण्यासाठी अधिक सज्ज होते.

## प्राधान्यक्रमाची आखणी

अनेकदा कामाचा डोंगर पाहून आपण हबकून जातो. वेळेचे नियोजन आणि कामाचा प्राधान्यक्रम ठरवणे हे केवळ व्यवस्थापन कौशल्य नसून ती एक मानसिक गरज आहे. 'सगळेच महत्त्वाचे' म्हणण्यापेक्षा 'काय सर्वात महत्त्वाचे' हे ठरवणे तणाव निम्म्याने कमी करते.

कलात्मक अभिव्यक्ती

कधीकधी शब्द जे सांगू शकत नाहीत, ते एखादी कला सांगून जाते. चित्रकला, संगीत, लेखन किंवा बागकाम यांसारख्या छंदांमध्ये मन रमले, की तणावाची तीव्रता ओसरते. कला ही मनाला साचलेल्या भावनांपासून मोकळे करण्याची एक खिडकी आहे.

थोडक्यात सांगायचे तर तणाव हा समुद्राच्या लाटांसारखा आहे. आपण लाटा थांबवू शकत नाही, पण त्यावर स्वार होणे नक्कीच शिकू शकतो. स्वतःच्या मर्यादांचा आदर करणे आणि स्वतःवर प्रेम करणे हीच तणावमुक्तीची खरी गुरूकिल्ली आहे. ▪




सुनील हूड
पोलीस निरीक्षक
मंगरूळपीर पोलीस
ठाणे, वाशिम


# सोक्षमोक्ष

संपत्तीवरून कुटुंबांमध्ये होणारे वाद आपल्या समाजात नवे नाहीत. अशाच एका वादाने एक मन बंड करून उठले. या वादाचा सोक्षमोक्ष लावण्याच्या नादात त्याने दोन जिवांचा बळी घेतला. काय होती ही घटना? कोण होता तो नराधम?



कामावरून महेश घरी आला तेव्हा त्याचा चेहरा चांगलाच वैतागलेला दिसत होता. त्याचे काहीतरी बिनसले आहे हे त्याच्या बायकोने, सरलाने, ताबडतोब ओळखले. तिने स्वयंपाकघरात जाऊन आधी चहाचे आधण ठेवले.

त्याच्या हातात चहाचा कप देऊन ती त्याच्या शेजारी बसली.

''काय झालं? तुमचा चेहरा का असा उतरल्यावाणी झालाय? तब्येत बरी नाही का?'' तिने विचारले.


मंजुषा मोरे
सहा. पोलीस निरीक्षक,
मंगरूळपीर पोलीस
ठाणे, वाशिम


संदीप खडसे
पोलीस अंमलदार,
मंगरूळपीर पोलीस ठाणे,
वाशिम


सुनील गंडाईत
पोलीस अंमलदार,
मंगरूळपीर पोलीस ठाणे,
वाशिम

''तब्येतीला काय धाड भरलीय माझ्या? फक्त मनाची शांतता नाहीये. तेवढी मिळू दे फक्त, पन ते नाही..'' तो कुरकुरला.

''होऽऽ, पन झालं काय तेवढं तर बोलाल?''

''काय होणार अजून? तुझ्या इंदूताईचा फोन आला होता.''

''तुम्हाले?''

''हां... ती आन तुझी आई दोघीपन इतक्यात वाटणी करायला नाही म्हनतात.''

''ठीके ना! नाही तर नाही. आपल्याले तर मिळून ऱ्हायलं ना दो वक्ताला खायालेप्याले? मंग झालं तर...'' सरला अगदी सहज बोलली. महेशने तिच्याकडे एकवार रोखून पाहिले. पण तिचे त्याकडे लक्ष नव्हते. ती हातातल्या मोबाईलवर काहीतरी पाहात होती.

रागारागाने दोन घोटात महेशने चहा आपल्या घशात ओतला आणि कप रिकामा करून विडीचे पाकीट आणायला तो घराबाहेर पडला.

विड्यांचे चार झुरके मारूनही त्याला शांत वाटेना. दुपारी सरलाची थोरली बहीण इंदू हिच्याशी झालेल्या संभाषणाचा शब्द न शब्द त्याला आठवत होता. त्या शब्दांनी त्याच्या झटपट श्रीमंत होण्याच्या स्वप्नांवर पाणी फिरवले होते. आपल्या बायकोच्या हक्काचाच वाटा होता तोही त्याला नाकारण्यात आला होता. आपली सासू आणि थोरली



**शेवटी त्याने ठरवले, बदला घ्यायचा. तोही लवकरात लवकर. त्या दिशेने त्याच्या मनात एक योजना आकार घेऊ लागली. त्यावर पुरेसा विचार करून तो घरी आला. त्यानंतर मात्र त्याला शांत झोप लागली.**

मेहुणी या दोघींना त्याने मनोमन शिव्यांची लाखोली वाहिली होती. तरीही अजून त्याचा जीव तळमळत होता.

शेवटी त्याने ठरवले, बदला घ्यायचा. तोही लवकरात लवकर. त्या दिशेने त्याच्या मनात एक योजना आकार घेऊ लागली. त्यावर पुरेसा विचार करून तो घरी आला. त्यानंतर मात्र त्याला शांत झोप लागली.

***

दुसऱ्या दिवशीच त्याने काम आहे असे घरी सांगून संध्याकाळच्या सुमारास घर सोडले. मजल दरमजल करत तो सकाळीच सासुरवाडीच्या गावी हजर झाला.

भल्या सकाळी महेशला एकट्याला आलेले पाहून त्याची सासू सुशीलाबाई हिला नवल वाटले. पण त्याच्या डोक्यात काय शिजत आहे याची तिला यत्किंचितही कल्पना आली नाही.

''जावईबापू? तुम्ही? अन एवढ्या सकाळी? समदं बरं हाय ना?'' तिने आश्चर्यचकित होत विचारले.

''काय पन बरं नाय.. म्हणून तर एवढं लांब यावं लागलं ना!'' म्हणत त्याने खिशातून चाकू बाहेर काढला.

म्हातारी त्याचा आवेश पाहून घाबरली. तिने आरडाओरडा करायला सुरुवात केली. ते ऐकून बाजूच्या खोलीत असलेली इंदूबाईपण तिथे आली. तीही ओरडू लागली. सर्वत्र एकच गोंधळ माजला. आजूबाजूच्या घरातली माणसेही जागी झाली. मात्र त्या दोघींच्या आरड्याओरड्याला

काही वेळातच पूर्णविराम मिळाला. महेशने आपल्याबरोबर आणलेल्या चाकूचे सपासप वार करत दोघींनाही संपवले. दोघी जमिनीवर रक्ताच्या थारोळ्यात पडल्या मात्र जाताजाता साऱ्या गल्लीला त्यांच्या ओरडण्याने, विव्हळण्याने जागे करून गेल्या.

त्याचवेळी नजीकच्या चौकात कर्तव्यावर असलेल्या एका पोलीस अंमलदारांच्या कानावर या भांडणाची बातमी गेली. तेही त्वरेने घटनास्थळाकडे गेले.

घटनास्थळी पोहोचताच त्यांना समोर हातात चाकू धरलेला महेश दिसला. त्यांनी सर्वात आधी त्याला पकडले आणि त्वरित मंगरूळपीर पोलीस ठाण्याचा नंबर फिरवला.

मंगरूळपीर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनील हूड हे घटनेची माहिती मिळाल्याबरोबर आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी रवाना झाले. घटनास्थळी एव्हाना चांगलीच गर्दी जमली होती. आरोपित महेश याला काहीजणांनी पकडून ठेवले होते. समोर जमिनीवर दोन्ही मायलेकींचे मृतदेह पडलेले होते. पोलिसांनी सर्वप्रथम दोन्ही मृतदेहांचा इनक्वेस्ट पंचनामा करून दोन्ही मयतांचे रक्त, त्यांनी परिधान केलेले कपडे व इतर आवश्यक पुरावे जप्त केले. त्यानंतर त्यांनी दोन्ही मृतदेह शवविच्छेदनाकरिता पाठवून दिले. तसेच गुन्ह्याच्या घटनास्थळाचा दोन पंचांच्या समक्ष सविस्तर पंचनामा केला. गुन्हेगाराला अटक करून त्याच्याकडून त्याने गुन्हा करण्यासाठी वापरलेला चाकू हस्तगत केला. त्याच्या अंगावरचे कपडे जप्त करण्यात आले. त्याच्या रक्ताचे नमुने घेण्याचीही तरतूद केली. दरम्यान पोलिसांनी महत्त्वाच्या साक्षीदारांचे जबाबही नोंदवले. वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून दोन्ही मयतांचे ॲडव्हान्स डेथ



**म्हातारी त्याचा आवेश पाहून घाबरली. तिने आरडाओरडा करायला सुरुवात केली. ते ऐकून बाजूच्या खोलीत असलेली इंदूबाईपण तिथे आली. तीही ओरडू लागली. सर्वत्र एकच गोंधळ माजला.**

सर्टिफिकेट व पीएम नोट्स प्राप्त केले. तसेच जप्त हत्याराचे परीक्षण करून क्युरी अहवाल प्राप्त करण्यात आला. गुन्ह्याच्या तपासकामी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल आणि पोस्टमॉर्टेमवेळी वैद्यकीय अधिकारी यांनी राखून ठेवलेले नमुने तपासणीकरिता न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांच्याकडे पाठवण्यात आले. तपासणीकरिता पाठवलेल्या मुद्देमालाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर तो गुन्ह्यात समाविष्ट केला गेला. गुन्ह्याचा तपास पूर्ण करून मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवून त्याला भादंवि कलम ३०२ अन्वये आजन्म सश्रम कारावास व १० हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणाचा तपास मंगरूळपीर पोलीस ठाणे येथील पोलीस निरीक्षक सुनील हूड, पोलीस अंमलदार सुनील गंडाईत, आणि राम नागुलकर यांनी उत्कृष्ट प्रकारे पूर्ण केला आहे. ■

***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***

**दक्षता मासिक ऑनलाइन वाचण्यासाठी भेट द्या: https://www.mahapolice.gov.in/dakshata-magazine/**
अथवा खालील क्युआर कोड आपल्या मोबाईलमध्ये स्कॅन करा



डॉ. अनिल शर्मा
बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई

# मृत्यू टाळणे आपल्याच हाती



अचानक हृदयक्रिया बंद पडल्याने होणारा मृत्यू (सडन कार्डिॲक डेथ) ही एक गंभीर वैद्यकीय आणीबाणीची परिस्थिती आहे, ज्यामध्ये हृदयाचे कार्य अचानक थांबते. त्वरित उपचार न मिळाल्यास काही मिनिटांतच मृत्यू ओढवू शकतो. अनेक लोक याला हृदयविकाराचा झटका (हार्ट ॲटॅक) समजण्याची चूक करतात, परंतु या दोन्ही गोष्टी भिन्न आहेत. हृदयविकाराचा झटका हा हृदयाच्या रक्तवाहिन्यांमध्ये अडथळा निर्माण झाल्यामुळे येतो, तर सडन कार्डिॲक डेथचे मुख्य कारण म्हणजे हृदयाच्या ठोक्यांमधील

धोकादायक अनियमितता. याला वैद्यकीय भाषेत ॲरिदमिया असेही म्हटले जाते.

सडन कार्डिॲक डेथ (हृदयक्रिया अचानक थांबल्यामुळे होणारा मृत्यू) हे जगभरातील मृत्यूच्या प्रमुख कारणांपैकी एक आहे. हे केवळ वृद्ध व्यक्तींमध्येच नाही, तर तरुण, खेळाडू आणि पूर्णपणे निरोगी वाटणाऱ्या व्यक्तींमध्येही घडू शकते. त्यामुळे, याविषयी जनजागृती करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

प्रौढांमध्ये याचे सर्वात सामान्य कारण म्हणजे कोरोनरी आर्टरी डिसीज हा विकार होय. यामध्ये हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्यांमध्ये अडथळा निर्माण होतो. याव्यतिरिक्त, पूर्वी आलेला हृदयविकाराचा झटका, हृदयाची कमी झालेली कार्यक्षमता, उच्च रक्तदाब, मधुमेह, धूम्रपान, लठ्ठपणा आणि कोलेस्टेरॉलची वाढलेली पातळी यांसारखे घटकही याचा धोका वाढवतात.

याखेरीज, काही अनुवांशिक हृदयविकारांमुळेदेखील तरुणांमध्ये अचानक हृदय बंद पडून मृत्यू ओढवू शकतो. यामध्ये हृदयाच्या स्नायूंची जाडी प्रमाणाबाहेर वाढणे, हृदयाच्या विद्युत प्रणालीतील दोष किंवा जन्मजात हृदयविकार यांचा समावेश होतो. अनेकदा, अशा प्रकरणांमध्ये तरुण वयात अचानक मृत्यू झाल्याचा कौटुंबिक इतिहासही दिसून येतो.

जरी अचानक हृदयविकाराचा मृत्यू (सडन कार्डिॲक डेथ) हा प्रकार अनेकदा कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय उद्भवू शकत असला, तरी त्याची काही लक्षणे आधी दिसून येऊ शकतात.

**उदाहरणार्थ,**

– छातीत वेदना किंवा दाब जाणवणे

– हृदयाचे ठोके अचानक वेगाने पडणे

– चक्कर येणे किंवा भोवळ येणे

– श्वास घेण्यास त्रास होणे

– अचानक कोसळून पडणे

– बेशुद्ध पडणे, विशेषतः



व्यायाम करताना

या लक्षणांकडे कधीही दुर्लक्ष करू नये. वेळेवर घेतलेला वैद्यकीय सल्ला भविष्यातला गंभीर धोका टाळण्यास मदत करू शकतो.

अचानक हृदयविकाराने मृत्यू होण्याच्या घटनेत व्यक्ती अनपेक्षितपणे कोसळते, प्रतिसाद देत नाही आणि तिला श्वास घेण्यास अडथळा येतो. अशा परिस्थितीत, प्रत्येक सेकंद महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे शक्य तितक्या त्वरेने रुग्णवाहिका किंवा आपत्कालीन वैद्यकीय सेवा यांना पाचारण करावे.

रुग्णाला त्वरित सीपीआर दिल्यास त्यांचे प्राण वाचू शकतात. सीपीआरमुळे काही काळासाठी मेंदू आणि शरीरातील महत्त्वाच्या अवयवांकडे रक्तप्रवाह चालू राहतो. जवळच ऑटोमेटेड एक्सटर्नल डिफिब्रिलेटर उपलब्ध असेल, तर त्याचा त्वरित वापर केला पाहिजे. हे उपकरण हृदयाचे धोकादायक ठोके ओळखते आणि आवश्यक असल्यास विजेचा झटका देऊन हृदयाची लय पूर्ववत करण्यास मदत करते.

आजकाल विमानतळ, रेल्वे स्थानके, मॉल्स, शाळा आणि व्यायामशाळा यांसारख्या अनेक सार्वजनिक ठिकाणी ऑटोमेटेड एक्सटर्नल डिफिब्रिलेटर उपलब्ध करून दिले जात आहेत. त्याचबरोबर, सामान्य नागरिकांना



**सीपीआर : एक जीवनरक्षक प्रणाली**

(सीपीआर) चे प्रशिक्षण देण्यावरही भर दिला जात आहे.

प्रतिबंध हाच सर्वोत्तम उपाय आहे. नियमित व्यायाम, संतुलित आहार, धूम्रपान व तंबाखूचे सेवन टाळणे, रक्तदाब व मधुमेहावर नियंत्रण ठेवणे, निरोगी वजन राखणे आणि नियमित आरोग्य तपासणी करून घेणे यांमुळे हृदयविकार आणि अचानक होणाऱ्या हृदयविकाराच्या मृत्यूचा धोका लक्षणीयरीत्या कमी होतो.

ज्यांना आधीपासून हृदयविकार आहे, त्यांनी डॉक्टरांच्या सल्ल्याने आपली औषधे नियमितपणे घ्यावीत आणि वेळोवेळी आरोग्य तपासणी करून घ्यावी. काही उच्च–जोखीम असलेल्या रुग्णांसाठी, डॉक्टर इम्प्लांटेबल कार्डिओव्हर्टर डिफिब्रिलेटर बसवण्याचा सल्ला देतात. हे एक विशेष उपकरण आहे जे हृदयाच्या ठोक्यांवर सतत लक्ष ठेवते आणि हृदयाच्या लयीत काही धोकादायक बदल आढळल्यास त्वरित उपचार करते.

अचानक हृदयक्रिया बंद पडून होणारा मृत्यू ही जरी धक्कादायक बाब असली, तरीदेखील योग्य तेवढी जागरूकता, वेळेवर मिळालेले उपचार, सीपीआरचे ज्ञान आणि आरोग्यदायी जीवनशैली यांच्या आधारावर अनेकजणांचे जीव वाचवले जाऊ शकतात.

यामुळे सावध व सजग राहणे अत्यंत आवश्यक आहे. पुरेशी खबरदारी घेऊन योग्य वेळी उचललेले एक पाऊल एक जीव तर निश्चितच वाचवू शकते. ■

### ३ री अखिल भारतीय पोलीस वेटलिफ्टींग क्लस्टर - २०२६-२७

# महाराष्ट्र पोलीस दलाची उल्लेखनीय कामगिरी

## (वैयक्तिक / सांघिक मध्ये ३ सुवर्ण, १ रौप्य, ३ कांस्य पदक)

२३-२७ मे २०२६ या काळात हरियाणा येथील मधुबन या ठिकाणी ३ री राष्ट्रीय स्तरावरची वेटलिफ्टिंग क्लस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेत महाराष्ट्र पोलिसांनी वैयक्तिक व सांघिक स्वरूपात ३ सुवर्ण, ३ कांस्य व १ रौप्य पदक पटकावले. त्याबद्धलचा वृत्तांत.

मे २३ ते २७, २०२६ या कालावधीमध्ये हरियाणा (मधुबन) येथे ३ री अखिल भारतीय पोलीस वेटलिफ्टींग क्लस्टर २०२६-२७ संपन्न झाली. सदर स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्य पोलीस पॉवरलिफ्टींग (पुरुष व महिला) संघाने सहभाग नोंदवून खालीलप्रमाणे ३ सुवर्ण, १ रौप्य, ३ कांस्य (वैयक्तिक) पदकांची लयलूट करून उपविजेतेपदाची ट्रॉफी संपादन केली. ट्रॉफी संपादन केलेल्या खेळाडूंची नावांची यादी.

| अ.क्र. | स्पर्धकाचे नाव | नेमणूक | प्रकार | कामगिरी |
|---|---|---|---|---|
| १ | सहा. पोलीस उपनिरीक्षक मनोज मोरे | मुंबई शहर | पॉवर लिफ्टिंग | सुवर्ण पदक (वैयक्तिक) |
| २ | पोलीस अंमलदार रितेश यादव | मुंबई शहर | | सुवर्ण पदक (वैयक्तिक) |
| ३ | महिला पोलीस अंमलदार अश्विनी बोसले | नाशिक शहर | | सुवर्ण पदक (वैयक्तिक) |
| ४ | पोलीस अंमलदार राजेश दळवी | मुंबई शहर | | रौप्य पदक (वैयक्तिक) |
| ५ | पोलीस अंमलदार संतोष पवार | मि.भा.व.वि. | | कांस्य पदक (वैयक्तिक) |
| ६ | महिला पोलीस अंमलदार विनया घोलप | लोहमार्ग मुंबई | | कांस्य पदक (वैयक्तिक) |
| ७ | महिला पोलीस अंमलदार संगिता ढोले | वाशिम | | कांस्य पदक (वैयक्तिक) |



सदर स्पर्धेच्या सरावशिबिरामध्ये खेळाडूंकडून दिलेल्या वेळेत सातत्याने सराव करून घेतल्याने खेळाडूंनी अतिशय उत्कृष्ठ कामगिरी केली आहे. प्रशिक्षक व खेळाडू म्हणून सहा. पोलीस उपनिरीक्षक मनोज मोरे, मुंबई शहर पोलीस अंमलदार वैभव पाटील, SPU मुंबई, (प्रशिक्षक) व पोलीस निरीक्षक मनोज प्रजापती, मुंबई शहर (प्रशिक्षक) यांनी खेळाडूंना उत्तम मार्गदर्शन करून त्यांच्याकडून उत्कृष्ट प्रकारे सराव व स्पर्धेदरम्यान उत्कृष्ट कामगिरी करून घेतला. तसेच वेळोवेळी त्यांना प्रोत्साहन दिले. महाराष्ट्र पोलीस पॉवरलिफ्टींग संघातील खेळाडू व प्रशिक्षक यांना मा. श्री. सदानंद दाते, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, श्री. मधुकर पाण्डेय, अपर पोलीस महासंचालक, (प्रशासन) म. रा. मुंबई, श्री. अभिषेक त्रिमुखे, विशेष पोलीस महानिरीक्षक, (प्रशासन), म.रा.,मुंबई, सहा. क्रीडा अधिकारी श्री. संतोष कांबळे यांनी वेळोवेळी त्यांना प्रोत्साहन देवून मार्गदर्शन केले. त्याचबरोबर त्यांच्यामधील उणिवा दूर करून खेळातील कार्यक्षमता व मानसिक संतुलन उच्चतम राहील असे वातावरण तयार केले. अशा केलेल्या प्रयत्नामुळे व मार्गदर्शनामुळे महाराष्ट्र राज्य पोलीस दलामधील खेळाडूंनी राष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या अखिल भारतीय पोलीस क्रीडा स्पर्धेमध्ये महाराष्ट्र पोलीस दलाचे नाव उज्ज्वल करून उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. ■

## फोर्स वन

**‘यतो शौर्य, ततो जय’ हेच आमचे ब्रीद, देशसेवेसाठी कमांडो घडवीतो हीच आमची जिद्द!**
**मुश्किल वक्त कमांडो सख्त या वाक्याला आम्ही खरे उतरू, कठीण समयी देशाचे रक्षण आम्ही करू!**
**इथला प्रत्येक प्रशिक्षक शिस्तीला देतो महत्त्व, शिस्त हेच फोर्स वनचं मूळ तत्त्व**
**इथे सामान्याला बनवलं जातं असामान्य, आणि घडवलं जातं एक वेगळं व्यक्तिमत्त्व**
**देशसेवेच्या जाणिवेचं!**
**इथे घडले हजारो जवान राष्ट्रीय स्तरावर, ज्यांनी फोर्स वनची उंचावली मान**
**राष्ट्रीय नव्हे तर जागतिक स्तरावर, आज आहे फोर्स वनचं नांव!**
**जनतेचे इथल्या आम्ही करून रक्षण, शत्रुंचा फडशा पाडुन त्यांचे करू भक्षण!**
**मायभूमी भारतमातेची आम्हाला आण, तिरंगा आहे आमुची शान...**
**जगभर उंचावेल देशाची मान, हाच आमच्या मनी ध्यास!**
**शारीरिक आणि मानसिकदृष्टया आम्ही आहोत खंबीर,**
**देशावरचा धोका परतवून लावू गंभीर!**
**भीती न आम्हा शत्रूची न पर्वा आमच्या जिवाची,**
**आम्ही पेलली आहे जबाबदारी मायभूमीच्या रक्षणाची!**
**आम्ही आहोत फोर्स वनचे जवान, मानणार नाही कधीच हार!**
**क्षमता आमच्याएवढी, की शत्रूचा परतवून लावू प्रत्येक वार! जगात भारी फोर्स वन हमारी !**



**गजानन लोकडे**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**अमरावती शहर**

### पोलीस ठाणे आर्वी हद्दीतील नेताजी वॉर्ड नेहरू वॉर्ड येथे

## लहान मुलांना मारणारा मनोरुग्ण ताब्यात

# डायल ११२ ची यशस्वी कारवाई

दिनांक २१ जानेवारी २०२६ या दिवशी आपत्कालीन प्रतिसाद प्रणाली डायल ११२ नियंत्रण कक्ष, वर्धा या ठिकाणी आकाश पवार यांनी डायल ११२ ला कॉल केला. सदर कॉल हा कॉल नियंत्रण कक्ष, वर्धा येथे प्राप्त झाला. आर्वी या ठिकाणी एक वेडा हातात लाठी घेऊन काही लोकांना मारहाण करत असल्याचे त्यांनी सांगितले. कॉल प्राप्त झाल्यानंतर तातडीने सदरचा कॉल हा विनाविलंब केवळ १४ सेकंदांमध्ये आर्वी पोलीस ठाण्यात डिस्पॅच करण्यात आला. आर्वी पोलीस ठाण्यानेसुद्धा सदर कॉलची तत्काळ दखल घेतली. सदरचे घटनास्थळ हे शहरातील असल्याने ठाण्यातील पोलीस ०४ मिनीटे ०२ सेकंदांमध्ये घटनास्थळावर पोहोचले व कार्यवाही सुरू केली. त्यानंतर सदर घटनेबाबतची माहिती ठाणेदार व एसडीपीओ यांना डायल ११२ नियंत्रण कक्षा मार्फत देण्यात आली. याबाबत आर्वी स्टाफ डि.ओ.ए.पि.आय. निलम बाबर, पोलीस अंमलदार आकाश चोरपगार असे घटनास्थळी पोहोचले व त्यांनी मनोरुग्ण असलेल्या इसमास ताब्यात घेऊन अप क्र ४८/२६ कलम १०३(१) बीएनएस अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचे गांभीर्य एवढे होते, की पोलिसांना कॉल प्राप्त व्हायच्या आधी त्या वेड्या इसमाने आर्वी शहरातील दोन लोकांना ठार मारले होते व पोलीस त्या ठिकाणी पोहोचले नसते, तर इतर लोकांनाही त्याने शिकार बनवले असते. यातील मनोरुग्ण आरोपीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस ठाणे, आर्वी यांनी केला. यातील मनोरुग्ण आरोपीस मध्यवर्ती कारागृह, वर्धा येथे दाखल केले.

डायल ११२ ला प्राप्त झालेल्या कॉलवर तत्परतेने कार्यवाही केल्याने इतर लोकांचे जीव वाचले. सहा. पोलीस निरीक्षक निलम बाबर व पोलीस अंमलदार आकाश चोरपगार आर्वी पोलीस ठाणे यांचा गुन्हे आढावा बैठकीदरम्यान प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. सहा. पोलीस निरीक्षक संदिप को, महिला पोलीस अंमलदार प्रियंका उडे, प्रेमा रिछारीया – डायल ११२ नियत्रंण कक्ष वर्धा तसेच सहा. पोलीस निरीक्षक निलम बाबर व पोलीस अंमलदार आकाश चोरपगार पोलीस ठाणे आर्वी यांनी सदर कामगिरी यशस्वीपणे पूर्ण केली. ■



संदिप कापडे
सहा. पोलीस निरीक्षक
पोलीस नियंत्रण कक्ष
डायल ११२, वर्धा



निलम बाबर
सहा. पोलीस निरीक्षक
आर्वी पोलीस ठाणे
जिल्हा वर्धा



प्रियंका उंडे
महिला पोलीस अंमलदार
पोलीस नियंत्रण कक्ष
डायल ११२, वर्धा



प्रेमा रिछारिया
महिला पोलीस अंमलदार
पोलीस नियंत्रण कक्ष
डायल ११२, वर्धा



आकाश चोरपगार
पोलीस अंमलदार
आर्वी पोलीस ठाणे
जिल्हा वर्धा

तपासकथा



सुदर्शन गायकवाड
पोलीस निरीक्षक
माणगाव पोलीस ठाणे
रायगड

# आकस

एखाद्या व्यक्तीच्या मनातला दुसऱ्या व्यक्तीबद्दलचा आकस हा किती रौद्र रूप धारण करतो याचे वर्णन करणे ही अशक्यप्राय गोष्ट. रायगड जिल्ह्यातील माणगावमध्ये १८ ऑगस्टच्या रात्री थंड वारा खायला घराबाहेर पडलेला संतोष परत आलाच नाही. बाहेर जाणारा आपला मुलगा आता परत येणार नाही याची कल्पना संतोषच्या घरच्यांना होती का? कोणाच्या मनातल्या आकसाचा परिणाम इतका भयानक होता?



माणगावमधील १८ ऑगस्टच्या रात्री आकाशात काळ्याकुट्ट ढगांची गर्दी झाली होती. नेहमीप्रमाणेच आजही जोरदार पाऊस पडणार असे वाटत होते. रात्री जेवण झाले, की गार वारा अंगावर घ्यायला पंचविशीचा संतोष बाहेर पडत असे. त्या रात्रीदेखील तो लवकर जेवण करून असाच गार वारा अंगावर घ्यायला त्याच्या नेहमीच्या ठिकाणी जायला निघाला.

''अरे असं काय? आज जायलाच पाहिजे का?''

''हो तर.. त्याशिवाय रात्रीची झोप लागायची



**सविता गर्जे**
उपविभागीय पोलीस अधिकारी
रायगड



**निवृत्ती बोऱ्हाडे**
पोलीस निरीक्षक
माणगाव पोलीस ठाणे
रायगड



**दत्ताराम कासार**
सहा.पोलीस उपनिरीक्षक
कोर्ट पैरवी
रायगड



**सुनिल गोळे**
पोलीस अंमलदार
कोर्ट पैरवी
रायगड



**सतिश पाटील**
पोलीस अंमलदार
कोर्ट पैरवी
रायगड



**धोंडिबा गिते**
पोलीस अंमलदार
माणगाव पोलीस ठाणे
रायगड

नाही मला.''

आईच्या प्रश्नावर त्याने घाईघाईने उत्तर दिले.

''हा.. असा काही नियम आहे काय? गार वारं घेतलं नाही तर झोप लागणारच नाही म्हणून?''

''पण मी कुठे काय म्हणतोय असं?''

''म्हणत नाही काही, पण ऐकतोय थोडंच माझं.'' मानेला झटका देत मानसी म्हणाली. आईच्या त्या बोलण्याकडे सपशेल दुर्लक्ष करत त्याने बाईक सुरू करण्यासाठीचे बटन दाबले.

''हे जे सुरू आहे ना तुझं त्याचबद्दल बोलत होते मी. नुसतं आपलं गाड्या उडवायच्या. आई करतीये वटवट, तिच्या बोलण्याला उडवून लावायचं. ते काही नाही. आज घरी थांबायचं. आज नाही जायचं कुठे.''

पण तोवर मानसीच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत तो तिच्या नजरेआड झाला होता. त्याची बाईक गल्लीच्या टोकाशी आल्यावर गार वाऱ्याची हवीहवीशी वाटणारी मंद झुळूक त्याच्या शरीराला स्पर्श करून गेली. या स्पर्शाने



> **त्याने बाईकचा स्पीड वाढवला. रस्त्यावरही फारशी गर्दी नव्हती. थोड्याच वेळात तो संत निरंकारी हॉलच्या समोरच्या रस्त्यावर येऊन पोहोचला. त्या रस्त्यावरही काही लोक छोटेछोटे गट करून गप्पा मारत होते.संतोष तिथे अनेकदा मोकळा वारा मिळावा म्हणून येत असे.**

तो सुखावला. त्याच्या चेहऱ्यावर आनंदी हास्याची लकेर उमटली. अजून गार वारा घेता यावा म्हणून त्याने बाईकचा स्पीड वाढवला. रस्त्यावरही फारशी गर्दी नव्हती. थोड्याच वेळात तो संत निरंकारी हॉलच्या समोरच्या रस्त्यावर येऊन पोहोचला. त्या रस्त्यावरही काही लोक छोटेछोटे गट करून गप्पा मारत होते. संतोष तिथे अनेकदा मोकळा वारा मिळावा म्हणून येत असे.

थोड्या वेळापूर्वी निरभ्र असलेले आभाळ आता हळूहळू ढगांनी आच्छादायला सुरुवात झाली होती.

''अरे वा! तू आत्ता इथे? हवा खायला आला वाटतं?''

संतोषकडे हस्तांदोलनासाठी हात पुढे करत सौरभने विचारले. तो संतोषचा मित्र होता. त्याच्या त्या प्रश्नाने स्वत:च्या विचारात गर्क झालेला संतोष भानावर आला.

''अरे हो रे! घरात नुसती उकडहंडी झाली माझी. वैताग साला. मी म्हटलं आईला जरा मोकळ्यात जाऊन गार वारा खाऊन येतो. ती मला नको म्हणत होती. पण मला मात्र उकाड्यात थांबणं शक्यच नव्हतं. म्हणून मी निघालो. इथे कसं छान गार वारा आला की बरं वाटतं. तुझं बोल. झाली जेवणं एवढ्या लवकर तुमची?''

''अरे यार! काही विचारू

नकोस. आज घरी डोक्याचं पार भरीत करून टाकलं मनिषानी माझ्या.''

''मनिषानी तुझ्या डोक्याचं भरीत केलं? अरे एवढी चांगली बहीण मिळालीये तुला नशिबानी आणि तू असं बोलतोस होय तिच्याबद्दल? काय तर म्हणे, मनिषानी डोक्याचं भरीत केलं. अरे डोक्याचं भरीत करायला आधी ते असावं लागतं... आणि इथे सगळा आनंदच आहे.''

''काय म्हणायचंय तुला? मला डोकं नाही??''

''तुला नाही रे बाबा... मनिषाबद्दल बोलतोय मी.''

''हे बघ, मनिषाबद्दल काहीही वेडंवाकडं बोललेलं चालायचं नाही मला. माझी बहीण आहे ती.''

''आपल्याकडे एक समज आहे.. दिसायला सुंदर असलेल्या मुलींचा वर जरा प्रॉब्लेमच असतो. पण काहीही म्हण तुझी बहीण दिसते अगदी एखाद्या अप्सरेसारखी. मजा आहे लेका तुझी.''

''काय बोलतोय तुझं तुला तरी कळतंय का?'' हे विचारताना सौरभच्या कपाळावर आठ्यांचे जाळे निर्माण झाले. त्याची सुरुवात मनिषाच्या विषय निघाल्यावरच झाली होती. शब्दाने शब्द वाढायला लागला. दोघांच्या बोलाचालीचे पर्यवसान हळूहळू बाचाबाचीत झाले. दोघांच्याही चेहऱ्यावरचे भाव बदलले. थोडा वेळ गेला आणि एक आर्त किंकाळी सारा आसमंत भेदून गेली. आजूबाजूला असलेले लोक आवाजाच्या दिशेने येऊ लागले. पण त्याआधीच अंधाराचा फायदा घेत सौरभ तिथून लांब निघून गेला होता.

***



**तेवढ्यात तिच्या फोनची रिंग वाजली. घाईघाईने तिने फोन उचलला. समोर बोलणाऱ्या व्यक्तीने तिला जी गोष्ट सांगितली ती ऐकून तिच्या हातातून फोन खालती पडला. तिच्या पायाखालची जमीन सरकली. त्या व्यक्तीने सांगितलेल्या ठिकाणी मानसी आपल्या पतीसह गेली. ती जागा म्हणजे माणगावचे रुग्णालय होते.**

मानसी एकसारखे भिंतीवरच्या घड्याळाकडे बघत होती. घड्याळाचे काटे जसजसे पुढे सरकत होते तसतशी ती अधिकच अस्वस्थ होत होती. जेवण झाल्यावर गार वारं घेण्यासाठी बाहेर पडलेला तिचा संतोष अजून घरी आला नव्हता. ती एकसारखी घराच्या आतबाहेर करत होती. तिला असे अस्वस्थपणे येरझाऱ्या घालताना बघून घरातले इतर लोक धीर देण्याचा प्रयत्न करत होते. तेवढ्यात तिच्या फोनची रिंग वाजली. घाईघाईने तिने फोन उचलला.

''हॅलो, कोण बोलतंय?''

''संतोषचा फोन आहे का?''

''मी संतोषची आई. तुम्ही कोण बोलताय? माझा संतु कुठाय?''

समोर बोलणाऱ्या व्यक्तीने तिला जी गोष्ट सांगितली ती ऐकून तिच्या हातातून फोन खालती पडला. तिच्या पायाखालची जमीन सरकली. त्या व्यक्तीने सांगितलेल्या ठिकाणी मानसी आपल्या पतीसह गेली. ती जागा म्हणजे माणगावचे रुग्णालय होते.

''आमच्या संतुला आणलंय इथं? कुठे आहे तो?'' समोर रिसेप्शनला असलेल्या कर्मचाऱ्याला तिने विचारले. पण मानसीच्या बोलण्याचा अर्थ त्याला कळला नाही.

''कोण संतु?''

''आमचा मुलगा, संतोष. हिला फोन आला होता आत्ता थोड्या वेळापूर्वी.'' मानसीच्या नवऱ्याने त्या कर्मचाऱ्याकडे खुलासा केला. हे सगळे सुरू असेपर्यंत माणगाव पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत असणारे सुदर्शन गायकवाड तेथे आले. त्यांना

बघताच संतोषच्या आई–वडिलांनी आपला होरा गायकवाड साहेबांकडे वळवला.

‘‘काय झालं साहेब आमच्या मुलाला? तुम्ही फोनवर सांगितलं की त्याला इथे आणलंय. मला बघायचंय संतोषला कुठे तो?’’

‘‘मॅडम, तुमच्या मुलाला मारलंय. त्याला इथे आणेपर्यंतच तो ऑफ झाला होता.’’

‘‘नाहीऽऽऽ असं नाही होऊ शकत. तुम्ही खोटं सांगताय. आमचा संतु आम्हाला सोडून नाही जाऊ शकत.’’ डोळ्यांवाटे बाहेर पडणाऱ्या आसवांना मोकळी वाट करून देत मानसी म्हणाली.

‘‘हे बघा, मी समजू शकतो हे सगळं बोलण्याची ही वेळ नाही. पण तुम्हाला काही प्रश्नांची उत्तरं द्यावी लागतील. आम्हाला सांगा, तो नेमका कुठे जातोय? कशासाठी जातोय? हे त्याने जाताना काही सांगितलं होतं?’’

‘‘नाही ओ... तो उकाडा होता म्हणून गार हवा खायची म्हणून बाहेर पडला होता. मी म्हटलं पण होतं त्याला, नको जाऊस म्हणून. पण तो कुठला ऐकतो! आम्हाला काय माहीत हे असं काहीतरी घडेल म्हणून? तो घरी येण्याऐवजी त्याची बॉडीच...’’

‘‘त्याचं कोणाशी भांडण, वाद किंवा तो कुठल्या काळजीत वगैरे होता का?’’

‘‘नाही ओ साहेब. आमचा मुलगा सगळ्यांशी मिळूनमिसळून वागणारा होता. कोणी केलं असेल?’’



**नाही ओ... तो उकाडा होता म्हणून गार हवा खायची म्हणून बाहेर पडला होता. मी म्हटलं पण होतं त्याला, नको जाऊस म्हणून. पण तो कुठला ऐकतो! आम्हाला काय माहीत हे असं काहीतरी घडेल म्हणून? तो घरी येण्याऐवजी त्याची बॉडीच...**

संतोषच्या वडिलांनी दिलेल्या माहितीने व त्यांच्या प्रश्नाने साहेब थोडेसे बुचकळ्यात पडले. पण त्यांनी संतोषला न्याय मिळवून देण्याचे वचन संतोषच्या आईवडिलांना दिले.

साहेबांनी एकीकडे संतोषच्या मृतदेहाचा इन्क्वेस्ट पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. त्याआधी पोलिसांनी संतोषने त्यावेळी परिधान केलेले कपडे हस्तगत केले. त्याचा शवविच्छेदन अहवाल प्राप्त केला. त्यातून त्याच्या छातीत डाव्या बाजूला चाकू भोसकल्यामुळे खोलवर जखम झालेली होती हे समोर आले. शिवाय वैद्यकीय तज्ज्ञांकडून झालेल्या जखमांविषयीचे मत पोलिसांनी नोंदवून घेतले. या गोष्टी सुरू असताना पोलिसांनी घटनास्थळाचाही दोन पंचांसमक्ष पंचनामा करून घेतला. घटनास्थळावरून पोलिसांनी साधी माती व रक्तमिश्रित माती यांचे नमुने संकलित केले. तसेच अन्य महत्त्वाच्या जैविक बाबीही हस्तगत केल्या. तसेच सीआरपीसी ६४ अन्वये प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब पोलिसांनी नोंदवून घेतले.

आता पोलिसांपुढे पुढचे मोठे आव्हान होते, ते म्हणजे संतोषच्या मारेकऱ्यास त्याच्या योग्य ठिकाणी पोहोचवणे. तपासात पोलिसांना त्या संशयिताचे नाव सौरभ असल्याचे काही लोकांनी सांगितले. त्यानुसार सौरभचा शोध अतिशय तत्परतेने घेतला जात होता. या घटनेचा तपास करत असताना साहेबांचा फोन वाजला. फोनच्या स्क्रीनवर आलेले नाव वाचून त्यांनी तत्परतेने फोन उचलला.

‘‘नमस्ते साहेब, एक ढासू खबर आहे. तुमची शिकार आहे ना ती कुठल्या बिळात लपलीय ते समजलंय मला. तुम्हाला पाठवतो मी त्याचा पत्ता.’’

‘‘लगेच पाठव.’’

साहेबांच्या फोनवर लगेचच पत्ता आला. साहेब तत्परतेने कारवाई

करत माहिती मिळालेल्या ठिकाणी आले. मोठ्या शिताफीने पोलिसांनी सौरभला ताब्यात घेतले. त्याला घेऊन तपासपथक माणगाव पोलीस ठाण्यात दाखल झाले.

''सौरभ नाव ना तुझं? मित्र ना तू त्या संतोषचा?... बोल! का मारलं तू तुझ्याच मित्राला?''

''मी? मी नाही मारलं संतोषला.''

''तू नाही तर कोण मग? हे बघ, तुला हे सगळं करताना बघणारी माणसं आहेत. त्यामुळे थापा मारायच्या नाहीत. बऱ्याबोलानं सांग... का मारलं तू?''

''मग काय करणार? तो... भुसनळ्या... माझी बहीण मनिषावरून मला सारखा चिडवायचा. म्हणायचा मजा आहे लेका तुझी. इतकी सुंदर बहीण मिळाली तुला. पण त्या वाक्यामागचा अर्थ फक्त मलाच समजायचा. त्याचं प्रेम होतं म्हणे तिच्यावर. पण मनिषा मात्र खरंच प्रेमात होती त्याच्या. तिला लग्न करायचं होतं त्याच्याशी. पण त्याचं काय? त्याची ती वाक्यं या सगळ्याचं काय? शेवटी ठरवलं याचा लवकरात लवकर सोक्षमोक्ष लावायचा. माझ्या बहिणीची हेटाळणी सहन करणं अशक्य झालं होतं मला. त्या दिवशी त्याला भेटायचं म्हणून बाहेर पडलो. तो भेटला. मग आमच्यात गप्पा सुरू झाल्या. विषय हळूहळू मनिषाकडे वळाला. त्याची चिडवाचिडवी सुरू झाली. मी त्याला समजावलं, पण तरीही त्यानं सुरूच ठेवलं. मग काय... काढला चाकू बाहेर आणि खुपसला त्याच्या छातीत! तो जोरात ओरडला. त्यामुळे बाकीचे



**तो भेटला. मग आमच्यात गप्पा सुरू झाल्या. विषय हळूहळू मनिषाकडे वळाला. त्याची चिडवाचिडवी सुरू झाली. मी त्याला समजावलं, पण तरीही त्यानं सुरूच ठेवलं. मग काय... काढला चाकू बाहेर आणि खुपसला त्याच्या छातीत!**

लोक तिथे यायला लागले ते बघून मी तिथून पळालो. पण तुम्ही मला धरलंच शेवटी.''

''तू वापरलेला चाकू कुठे लपवालाय?''

आरोपित असलेल्या सौरभच्या निवेदनानुसार त्याने सांगितलेल्या ठिकाणावरून पोलिसांनी निवेदन पंचनाम्याने गुन्ह्यात वापरलेला चाकू हस्तगत केला. तसेच पोलिसांनी घटनेच्या वेळी सौरभने परिधान केलेले कपडेही हस्तगत केले. सर्व संकलित केलेल्या गोष्टी पोलिसांनी वैद्यकीय तपासणीकरिता न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे पाठवून दिल्या. त्यानंतर पोलिसांनी मा. न्यायालयात त्याच्या विरोधात दोषारोपपत्र दाखल केले.

समोर आलेले सर्व साक्षीपुरावे ग्राह्य धरत मा. न्यायालयाने सौरभला दोषी ठरवत भादंवि कलम ३०२ अन्वये आजन्म सश्रम कारावास आणि तीन हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणाचा तपास माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुदर्शन गायकवाड, सहा. फौजदार शशिकांत कासार(कोर्ट पैरवी), पोलीस अंमलदार धोंडिबा गिते यांनी अत्यंत शिताफीने आणि कौशल्याने पूर्ण केला आहे. ■

***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***

**दक्षता मासिक ऑनलाइन वाचण्यासाठी भेट द्या: https://www.mahapolice.gov.in/dakshata-magazine/**
अथवा खालील क्युआर कोड आपल्या मोबाईलमध्ये स्कॅन करा

लेख




सुधाकर कुलकर्णी
पुणे


# डिजीलॉकर




आज देशात डिजिलॉकरचा वापर दिवसागणिक वाढताना आढळून येतो. हे भारत सरकारमार्फत सुरू करण्यात आलेले एक क्लाउड आहे. यात आपण आपली सर्व महत्त्वाची कागदपत्रे साठवून ठेऊ शकतो. परिणामी बाहेरगावी जाताना आपल्याला पॅन कार्ड, आधार कार्ड बरोबर घेण्याची गरज नाही आणि बरोबर नसल्याने ते गहाळ होण्याची शक्यताही नाही. पण हे डिजिलॉकर वापरायचे कसे? ते वापरल्याने होणारे फायदे याची माहिती सदर लेखात देण्यात आली आहे.

आजकाल आपल्याला पॅन कार्ड, आधार कार्ड, ड्रायव्हींग लायसंस, गाडीची विमा पॉलिसी, आयुशमान भारत कार्ड यांसारखी कागदपत्रे व त्यांची झेरॉक्स नेहमीच जवळ बाळगावी लागतात. बहुदा हे सर्व आपण आपल्या खिशातील पाकिटात किंवा बाहेर पडताना जवळ असलेल्या छोट्या बॅगेत (पाऊचमध्ये) ठेवत असतो. कधी आपला गहाळपणा तर कधी पाकीट/पाऊचची चोरी झाल्यानेही कागदपत्रे गहाळ होतात. अशा वेळी ही सर्व कागदपत्रे नव्याने मिळवावी लागतात. त्यासाठी संबंधित ठिकाणी अर्ज करावा लागतो व काही बाबीत पोलीस चौकीत जाऊन तशी तक्रार नोंदवावी लागते व त्या बाबतचे पोलिसांचे सर्टिफिकेट आपल्या अर्जा सोबत जोडावे लागते. या सगळ्यात वेळेचा व पैशाचा अपव्यय होतोच शिवाय मनस्तापही होतो.

मात्र आता आपली ही सर्व डॉक्युमेंट्स आता जवळ बाळगण्याचा गरज नाही शिवाय गरजेनुसार मागणी करताच सबंधितांस डिजिटल स्वरूपात देता येतात आणि हे शक्य झाले आहे डिजिलॉकर या सुविधेमुळे. तथापि याबाबत बहुतेकांना फारशी माहिती नाही आणि म्हणून आज आपण ही माहिती जाणून घेऊ. डिजी लॉकर हा भारत सरकारच्या Ministery oh Elctronics & IT चा डिजिटल कागदपत्रांसाठीचा सुरक्षित क्लाऊड प्लॅटफॉर्म आहे. यामध्ये तुमची महत्त्वाची कागदपत्रे जसे आधार कार्ड,




पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, मार्कशीट, गाडीचे आर सी बुक , इन्श्युरंस पॉलिसी यांसारखी कागदपत्रे एकाच ठिकाणी डिजिटली साठवता येतात आणि गरजेनुसार शेअर करता येतात.

## डीजी लॉकरची वैशिष्ठ्ये

### कायदेशीर मान्यता:

आय टी ॲक्ट २००० नुसार डिजि लॉकर मधील कागदपत्रे मूळ हार्ड कॉपीएवढीच वैध आहेत व ती इश्युइंग अथॉरिटी (उदाः आरटीओ, युडीआय, प्राप्तीकर ऑफीस, संबंधित विद्यापीठ, संबंधित विमा कंपनी) यांच्याकडून थेट व्हेरिफाईड डॉक्युमेंट आपल्या डिजि लॉकरमध्ये डाऊनलोड करून घेता येतात. हे फोटो अपलोड असत नाहीत. त्यामुळे बनावटगिरीचा धोका नसतो.

डीजी लॉकर ही सुविधा कधीही, कुठेही digilocker.gov.in किंवा मोबाइल ॲपवरून लॉगइन करून वापरता येते. **शेअर करणे सोपे:** लिंक किंवा कोडने कोणत्याही सरकारी, खाजगी संस्थेला कागदपत्रे शेअर करता येतात. **फ्री स्टोरेज:** स्वतःची स्कॅन केलेली कागदपत्रेही अपलोड करून ठेवता येतात.

### कसे वापरायचे ?

**साइन अप:** digilocker.gov.in वर जाऊन मोबाइल नंबर + आधार OTP नेअकाउंट बनवा. २ऽ Get Documents ‘‘ मध्ये जाऊन संबंधित विभाग निवडा. उदा. Driving

License साठी तुमचा ड्रायव्हींग लायसंस नंबर टाका. तर आधार कार्डसाठी युआयडी साईट वर जाऊन आधार कार्ड नंबर टाका एकदा पॅन कार्ड, आधार कार्ड किंवा ड्रायव्हींग लायसंस डाऊनलोड झाले, की ते कायम तुमच्या डिजिलॉकर मध्ये राहते

गरज पडेल तेव्हा Share बटणाने ईमेल किंवा लिंक पाठवा.

विशेष म्हणजे डिजि लॉकर सुविधा कार्यान्वित करण्यासाठी आधार नंबर व लिंक्ड मोबाईल हवा. आपले डिजि लॉकर सुरक्षित ठेवण्यासाठी ६ अंकी सिक्युरिटी पिन करावा.

## डीजी लॉकरचे प्रमुख फायदे

आपली वर उल्लेखित कागदपत्रे हरविण्याची गहाळ होण्याची शक्यता असत नाही

डिजि लॉकरमध्ये ठेवलेली कागदपत्रे डिलीट झाली तर कागदपत्र परत मिळवणे सोपे आहे, कारण बहुतके कागदपत्रे तुमच्या अकाऊंटमध्ये साठवलेली नसतात ती गरज पडेल तेव्हा सरकारी डेटाबेसमधून थेट खेचून आणली जातात. चकून एखादे डॉक्युमेंट तुमच्याकडून डीलीट झाले तर ते केवळ तुमच्या अकाऊंटमधून जाते मूळ रेकॉर्ड संबंधित संस्थेकडे सुरक्षित असते व ते आपण परत डाऊनलोड करून घेऊ शकता. विशेष म्हणजे डिजि लॉकर ही सुविधा आपल्या स्मार्टफोन मधील ॲप स्टोअर मधून डिजि लॉकर ॲप डाऊनलोड करून त्याची रजिस्ट्रेशन प्रक्रिया पूर्ण करून अगदी सहजगत्या वापरता येते.

थोडक्यात आता आपल्या मोबाईलमध्ये डिजि लॉकर ॲप डाऊनलोड करून आपली वर उल्लेखिलेली सर्व कागदपत्रे सहजपणे स्टोअर करून ठेवू शकता व गरजेनुसार शेअर करू शकता आता आपली ही कागदपत्रे हरविण्याची खराब होण्याची किंवा फाटण्याची भिती नाही. म्हणून या सुविधेचा आपण आवर्जून वापर करावा. ▪

## "अवतीर्ण"

तुझ्यामुळेच सखे, प्रेमाचा मी वर्ण झालो;
एकदाच भेटलो असे की मी पूर्ण झालो.

सुगंधी मिठीत तुझ्या, भान हरपले काळाचे;
तू कळीचे फुल, पालवीचा मी पर्ण झालो.

बेधुंद तुझ्या वाटेवर, चाललो होतो भणंग;
तुझा परिसस्पर्श झाला, मी सुवर्ण झालो.

अबोला तुझा जेव्हा चिरतो काळजाला;
तुझी हाक ऐकण्यास देहाचा मी कर्ण झालो.

तुझ्या नजरेने जुळतात आयुष्याचे उसवलेले धागे;
जेव्हा जेव्हा कधी, विरहाने मी जीर्ण झालो.

आभाळाची व्याप्ती तुझी, कवेत घेऊ कसे?
तुला सामावून घेण्यासाठी, मी विस्तीर्ण झालो.

विखुरलेले भाव माझे, शब्दांत मांडताना;
तुझ्याच एका ओळीत, मी संकीर्ण झालो.

जन्मोजन्मीची आस अधुरी कशी राहील?
त्याचसाठी तर पुन्हा, मी अवतीर्ण झालो.



**डॉ. दिनेश कमल गिरधर बारी,**
**पोलीस अधीक्षक,**
**नागरी दहशतवाद विरोधी प्रशिक्षण केंद्र,**
**फोर्स वन, मुंबई**




संजीव देवकर

पुणे


# ये रे घना येरे घना न्हाऊ घाल माझ्या मना...

ग्रीष्माच्या असह्य अशा काहिलीनंतर सुखद आणि हवाहवासा गारवा देणारा ऋतू म्हणजे वर्षा. ग्रीष्म ऋतूमुळे जो रखरखाट निर्माण होतो त्यावर आल्हाददायक, मनाला टवटवीत करणाऱ्या पावसाळ्याचे वर्णन करण्याचा मोह मराठी भाषेतील साहित्य निर्मिती करणाऱ्या कवींनाही सोडवला नाही. अनेक कविंच्या प्रतिभेने नटलेला पावसाळा ऐकणाऱ्याला एका नवोन्मेषाची अनुभुती देतो. अशाच काही कविंच्या पावसावर केलेल्या कविता, गाणी यांबद्दलची माहिती सदर लेखात देण्यात आली आहे.




सृजनशील, नवी पालवी फुलणारा 'वर्षाऋतू' हा सर्वांनाच भारावून टाकणारा ऋतू! वैशाख वणव्याचा दाह कमी करत पाऊसधारांच्या रूपाने ओलेचिंब करून हा ऋतू जितका सुखावून टाकतो. तितकाच तो मराठी पाऊसगाणी आणि कवितांच्या माध्यमातून मन प्रफुल्लित करून जातो. अंगाची लाहीलाही व ग्रीष्माची काहिली शमविणारा हा ऋतू रिमझिम पावसाच्या धारा घेऊन येतो. तेव्हा प्रत्येकाचे मन गदिमा अर्थात ग. दि. माडगूळकर यांच्या शब्दात गाऊ लागते

घन घन माला नभी दाटल्या,  
कोसळती धारा,

केकारव करी मोर काननी
उभवून उंच पिसारा.

माणसांप्रमाणेच पशु, पक्षी आणि झाडे देखील वैशाखवणव्याने हवालदिल होतात. अशावेळी कोसळणाऱ्या धारांची वाट पाहत आकाशाला सगळेच विनवणी करतात 'ये रे घना ये रे घना न्हाऊ घाल माझ्या मना.' असा मनमोहक आणि अल्हाददायक वर्षाऋतू आला, की अवीट गोडीच्या संगीतधारांतून कवींच्या शब्दांचा काव्यरूपी पाऊस रसिकांच्या मनात सदैव झिरपत राहातो. अशा विविध काव्यरूपी पावसाचा आनंद घेत आज आपण डोलायला लावणाऱ्या सुरावटींनी चिंब भिजणार आहोत.

खरे तर कवी ग.दि.माडगूळकर यांच्या गीताने प्रत्येकाच्या मनात बालपणापासूनच हा रिमझिम पाऊस झिरपलेला असतो. सोसाट्याचा वारा सुटला, आकाशात ढग जमू लागले आणि वीजेने कडकडाट केला, की बालगोपाळ गदिमांच्या प्रचलित काव्याने आंब्याच्या वनातील मोरालाच विनवणी सुरू होते. विनवणी करताना बालकच नव्हे, तर मोठे ही गाऊ लागतात 'नाच रे मोरा आंब्याच्या बनात, नाच रे मोरा नाच.' बरे एवढे करून ही बच्चे मंडळी थांबत नाहीत, तर पाऊस पडावा म्हणून 'ये रे ये रे पावसा तुला देतो पैसा' असे चक्क पावसालाच अमिष दाखवतात.

मराठी साहित्यात अनेक साहित्यिकांनी पावसाच्या विविध छटांचे वर्णन केलेले आहे. पावसावर मराठीत बालगीते व कवितांची अगदी रेलचेलच आहे. आणि ही परंपरा निरंतर चालूच आहे. बालकांची विनवणी फलरूप झली, की बरसणाऱ्या पावसात मनमुराद भिजण्याचा आनंद आणि ओलेचिंब होण्याची मज्ञा मात्र काही औरच असते नाही का? पावसाने जोर

> खरे तर कवी ग.दि.माडगूळकर यांच्या गीताने प्रत्येकाच्या मनात बालपणापासूनच हा रिमझिम पाऊस झिरपलेला असतो. सोसाट्याचा वारा सुटला, आकाशात ढग जमू लागले आणि वीजेने कडकडाट केला, की बालगोपाळ गदिमांच्या प्रचलित काव्याने आंब्याच्या वनातील मोरालाच विनवणी सुरू होते. विनवणी करताना बालकच नव्हे, तर मोठे ही गाऊ लागतात.

धरला, की मात्र सगळ्या लहान मुलांना घरात डांबले जाते. तेव्हा हीच बालक मंडळी कवयित्री वंदना विटणकर यांच्या काव्याचा आधार घेत आपापल्या आयांना म्हणू लागतात 'ए आई मला पावसात जाऊ दे, एकदाच गं, भिजुनी मला चिंब चिंब होऊ दे.' अशी विनवणी करणाऱ्या नटखट बालगोपाळांच्या आनंदाचा ठेवा म्हणजे गारांचा पाऊस! तो आला रे आला, की लहानग्यांचा आईकडे तगादा सुरू होतो 'टप टप बाहेर काय वाजते ते पाहू, चल गं आई चल गं आई पावसात जाऊ.'

रसिक हो, टप टप बाहेर काय वाजते हे पाऊस गाणे मंगेशकर बहिणींपैकी मीना गायिका मीना खडीकर यांनी श्रीनिवास खळे यांच्या संगीत दिग्दर्शनात गायले आहे. याच निमित्ताने बाल सुलभ इच्छांवर आधारित 'सांग सांग भोलानाथ पाऊस पडेल काय? शाळेभोवती तळे साचून सुट्टी मिळेल काय?' ही रचना येथे आठवली. बालगोपालांसाठी कवी मंगेश पाडगावकरांनी नादमय शब्द गुंफूत लिहिलेल्या या रचनेला मीनाताईने संगीत दिले आहे. पाऊस या पाडगावकरांच्या कवितेत तर पावसाची विविध रूपे बघायला मिळतात. कवी संदीप खरे यांच्या 'अग्गोबाई ढग्गोबाई' या बालगीताचा देखील मनमुराद आनंद मुले सन २००९ पासून लुटत आली आहेत. 'ये रे ये रे पावसा' ते 'अग्गोबाई ढग्गोबाई' हा बालगीतांचा प्रवास वाचकांनी ही नक्कीच अनुभवला असेल.

पाऊस ऋतू हा बालकांप्रमाणेच प्रेमीयुगुलांचा देखील सर्वात जवळचा आणि आवडता ऋतू! आकाशात ढग जमून आले, की तरुणवर्ग कल्पनेच्या तरंगात वाहून जातो. याप्रसंगी त्यांच्या भावविश्वाचे वर्णन करणारे कवी अशोक परांजपेंची 'केतकीच्या बनी तिथे नाचला गं मोर' ही सुरावट आपसूकच ओठांवर येते. पावसात मन जसजसे

भिरभिरू लागते, तसे कवी सौमित्र यांचे प्रेमाच्या हळुवार भावना व्यक्त करणारे 'वाऱ्यावर भिरभिर पारवा, नवा नवा' हे अल्बमगीत तरुणाईच्या हृदयात गारवा पसरविते.

पहिला पाऊस, मातीचा सुंगध आणि गार वातावरण अशावेळी आपल्याला लगेच आठवते कवी मंगेश पाडगावकरांचे 'भेट तुझी माझी स्मरते अजून त्या दिसाची' हे प्रेमीयुगुलांचे भावस्पर्शी गीत. खरे सांगायचे, तर कविवर्य मंगेश पाडगावकरांच्या सगळ्या मुड्समधील कविता आणि गीतांनी रसिकांना भुरळ घातलेली आहे. नव्हे काव्याकडे पाहण्याचा नवा दृष्टीकोनच त्यांनी रसिकांना दिला.

पावसाळ्यात जोडीदार दूर असेल तर नायिकेची विरह भावना आणि मनाची व्याकूळता 'रिमझिम झरती श्रावणधारा धरतीच्या कलशात' या गीतातून गायिका सुमन कल्याणपूर नेमकी व्यक्त करतात. पावसात मासेमारीसाठी समुद्रात गेलेला जोडीदार सुखरूप परतावा या आशयाच्या कवी पी. सावळाराम यांचे 'वादलवारं सुटलं गो, वाऱ्याने तुफान उठलं गो' गीतातून स्वरसम्राज्ञी लता मंगेशकरांनी एका कोळीणीचे भावविश्व नेमके मांडले आहे. पं. हृदयनाथ मंगेशकरांच्या गीताच्या चालीला न्याय देणारा वाद्यमेळ गीताची महती वाढवतो.

मनात प्रणयभाव उमटणारे 'नभ उतरू आलं चिंब थरथरवलं, अशा वलसराती गळा शपथा येती' हे कविवर्य ना.धों.महानोर यांचे स्त्री सुलभ काव्य ओठांवर रेंगाळते. वर्षाऋतूत सृजनाने पल्लवित होणारे मन उमलू लागले, हृदयात नव्याने प्रणयभावना उमटू लागल्या, की प्रेमींना वाटते 'आज कुणी तरी यावे ओळखीचे व्हावे.' बरं एवढ्यावरच तरुणाई थांबत नाही. तर ओळखीतून पावसाळ्या रात्री घडलेल्या भेटीची आणि उत्कट प्रेमाची आठवण एकमेकांच्या मनात कायमची कोरली जाऊ दे. या कल्पनेवरच ते स्वार होतात.

आषाढ दाटून आला, की मनात पाऊस विरह आणि मिलनाची गुंफन घालणारे महाकवी कालिदासांचे महाकाव्य मेघदूत याचा स्मृतिगंध दरवळतो. आषाढातील संततधार आणि मनातील भावभावनांचे वर्णन करणारी 'दाटून मेघांनी आभाळ आलं मन हे बहरले, चिंब पावसानं रानं झालं आबादानी, ऊन तू पाऊस तू, तू ऋतू गारवा अशी काही सुरेल गाणी देखील मनाला वेडावून जातात.

श्रावण हा मनमोहक मास. 'क्षणात येते सरसर शिरवे, क्षणात फिरून ऊन पडे' असा पावसाचा लपंडाव श्रावणात सुरू असतो. श्रावणातील पावसाची उघडझाप सुरू झाली, की 'श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे' असा हा ऋतू हिरवा बहरतो. त्यातच






मग ‘श्रावणात घन निळा बरसला रिमझिम रेशीम धारा, उलगडला झाडांतून अवचित हिरवा मोर पिसारा’ असे रसिकांसमोर निसर्गाचे विलोभनीय चित्र उभे केले जाते. बालकवी फुलराणी या कवितेतून निसर्गाचे विहंगम दर्शन घडविताना लिहितात ‘हिरवे हिरवे गार गालिचे, हरित तृणांच्या मखमलीचे.’

पावसाळ्यात सर्वत्र हिरवळ पसरलेली असते. जणूकाही धरतीने हिरवीगार चादर पांघरली असावी असे भासते. अशा वातावरणात श्रीधर फडकेंच्या संगीतात आशाताई भोसलेंनी गायलेले ‘ऋतू हिरवा ऋतू बरवा पाचूचा मनी रूजवा’ हे मराठी माणसाला खूश करणारे लोकप्रिय गीत गारवा देवून जाते. मंगळागौरी, रक्षाबंधन, नागपंचमी या सणांसाठी सासुरवाशीण माहेरात रमलेली असते. मात्र सणांची रेलचेल संपत येताच पुन्हा तिची सासरला रवानगीची तयारी सुरू होते. तेव्हा सुधीर मोघेंच्या ‘आला आला वारा संगे पावसाच्या धारा, पाठवणी करा सया निघाल्या सासुरा’ ह्या तिच्या सखींनी गायलेल्या रवानगी गीताची आठवण झाली नाही तरच नवल!

वाचक हो! मन प्रसन्न ठेवणाऱ्या अल्हाददायी पावसाळ्यात सर्वच काही मनोहारी असते असे काही नाही. सुखद गारवा, दरवळणारा सुगंध, प्रेमाभोवती फिरणारे प्रणयी शब्द, मंतरलेली रात्र सारे काही असले, तरी पावसाचा अतिरेक नकोसा वाटतो. काहीकाहींसाठी पावसाला दुःखाची किनारही असते. भर पावसात आई गेल्यावर कवी ग्रेस म्हणतात तशी ‘ती गेली तेव्हा पाऊस निनादत होता.’ पाऊस आणि दुःखाची सांगड घालताना पाऊस कधीचा पडतो या काव्यात ग्रेस लिहितात ‘पाऊस कधीचा पडतो, झाडांची हलती पाने, हलकेच जाग मज आली दुःखाच्या मंद सुराने.’

पावसाळ्यात सर्वत्र हिरवळ पसरलेली असते. जणूकाही धरतीने हिरवीगार चादर पांघरली असावी असे भासते. अशा वातावरणात श्रीधर फडकेंच्या संगीतात आशाताई भोसलेंनी गायलेले ‘ऋतू हिरवा ऋतू बरवा पाचूचा मनी रूजवा’ हे मराठी माणसाला खूश करणारे लोकप्रिय गीत गारवा देवून जाते. मंगळागौरी, रक्षाबंधन, नागपंचमी या सणांसाठी सासुरवाशीण माहेरात रमलेली असते.

गीतकार पी. सावळाराम यांची ऊन पाऊस चित्रपटातील ‘रिमझिम पाऊस पडे सारखा, यमुनेलाही पुर चढे, पाणीच पाणी चहूकडे ग बाई, गेला माधव कुणीकडे’ ही सुरावट कृष्णाच्या विरहाने व्याकुळ झालेली राधाची तडप दर्शविते. कवयित्री इंदिरा संतांनी वर्णिलेली ‘नको रे नको रे पावसा असा धिंगाणा अवेळी, घर माझे चंद्रमौळी’ तेव्हा पावसाचा अतिरेक मनाला विषण्ण करतो. यानिमित्ताने मला माझीच एक कविता आठवते ‘दूर कोठेतरी पाऊस होता पडत, मी मात्र एकटीच झोपडीत होते भिजत.’

असो! कसा ही असला तरी पाणी आणि जीवन जगण्यासाठी तरी पाऊस ऋतू हवा असतो. पावसाच्या येण्याने ‘बहरती वेली, फुल अनं पानं, डोलविती झाडे आनंदाने मान.’ असा हा वर्षाऋतू संपता संपता अनेक पावसाळी कविता आणि पाऊसगीतांची मांदियाळी सगळ्याच्या मनात मात्र रूंजी घालतच राहते. नाही का वाचक हो? ■

कथा

# वाटणी



उत्तम सदाकाळ
जुन्नर



किसन निराश मनाने गोठ्यात आला. गोठ्यात त्याचा एकूलता एक बैल बांधला होता. डोळ्यात अश्रू आणि दाटलेल्या कंठाने किसन तुफानशी बोलू लागला,

''तुफान, संपला बाबा आपला सहवास. आजपर्यंत मी तुला काही कमी पडू दिलं नाही. तुझं दुखणं सांभाळलं. तुझी जिवापाड काळजी घेतली, पण आता सारं संपलं. आपल्याच माणसांच्या स्वार्थी अन् कपटी स्वभावामुळे आपली ताटातूट होणार आहे. अरे माझा सख्खा भाऊ माझ्या वाईटावर उठलाय. पण तू मात्र माझ्यासाठी नेहमीच रक्ताचं पाणी केलंस रे तुफान! तू

माझ्यासाठी झिजलास. माझ्यासाठी राबलास. माझी जमीन तू तुझ्या कष्टाच्या घामाने मोत्यासारखी फुलवलीस. पण माझा भाऊ मात्र मला दरिद्री झालेलं पाहण्यासाठी उतावीळ झालाय. माणसांपेक्षा मुकी जनावर चांगली असतात हेच खरं आहे बाबा.'' किसन अश्रू पुसत तुफानशी बोलत होता.

तुफान नावाचा तो खिलारी बैल किसनचा जीव की प्राण होता. घरच्या खिलार गाईचा तो गोऱ्हा किसनने तळहाताच्या फोडाप्रमाणे जपला होता. त्याला लहानाचा मोठा केला होता. तुफान हा ताकत असणारा बैल म्हणून किसनने त्याला तुफान नाव दिले होते.

इतकी वर्षे किसनला साथ देणारा तुफान आता किसनपासून दुरावणार होता. म्हणून किसन नाराज होता. त्याचा तुफान त्याच्यापासून दूर जाणार ही गोष्ट किसनला सहन होत नव्हती. पण परिस्थितीच अशी निर्माण झाली होती, की त्याचाही नाईलाज होता.

कालपासून किसनच्या घरी वाटणी सुरू होती. काल जमिनीची वाटणी झाली होती. घराची वाटणी झाली होती. आता फक्त एकाच गोष्टीवरून वाटणीचं घोडं अडलं होतं. आणि ती गोष्ट म्हणजे किसनचा एकुलता एक बैल 'तुफान'.

किसनचा थोरला भाऊ बाजी तुफानसाठी अडून बसला होता. त्याला तुफान बैल हवा होता. त्यासाठी तो हट्टाला पेटला होता.

गोठ्यात एकच बैल असल्याने त्याची वाटणी दोघांमध्ये कशी

इतकी वर्षे किसनला साथ देणारा तुफान आता किसनपासून दुरावणार होता. म्हणून किसन नाराज होता. त्याचा तुफान त्याच्यापासून दूर जाणार ही गोष्ट किसनला सहन होत नव्हती.

करायची हा मोठा प्रश्न पंचासमोर उभा राहिला होता.

बाजी शहरात राहात असल्याने त्याला शेतीचा काडीमात्र अनुभव नव्हता. गावी राहून तो शेतीही करणार नव्हता. त्यामुळे त्याला बैल कशासाठी हवा आहे हे काही पंचाच्या लक्षात येत नव्हते. या अवघड प्रश्नावर अखेर पंचांनी एक उपाय काढला.

तुफान बैलाची अंदाजे किंमत ठरवून ज्याला बैल हवा त्याने निम्मी रक्कम आपल्या भावाला द्यायची. असा हा साधा सरळ उपाय पंचानी दोन्ही भावांसमोर मांडला. पण बाजीने त्यालाही विरोध केला. त्याला बैल हवा होता. मात्र वाटणीचा हा उपाय काही मान्य नव्हता.

या गोंधळातच कालचा दिवस गेला होता. बैलाची वाटणी करण्यासाठी आज पंच पुन्हा येणार होते. ते येण्याच्या आधी किसन तुफानला भेटायला गोठ्यात आला होता.

मोठा भाऊ आपल्याला त्रास देण्यासाठी मुद्दाम बैल मागतोय हे किसनला समजत होते. भावाला फूस लावायला भावजयीचा हात आहे हेही त्याला माहित होते. पण किसनला काही करता येत नव्हते, की बोलता येत नव्हते. बिचारा जे होईल ते गप्प राहून बघत होता.

सकाळचे दहा वाजले आणि बैलाची वाटणी करायला पंच किसनाच्या अंगणात जमा झाले. किसन नाराज मनाने तुकानानाशेजारी बसला होता.

तुकानाना म्हणजे सर्वात जेष्ठ पंच. त्यांच्या शब्दाच्या पुढे कुणीही जात नसायचे. तुकानानांच्या शब्दाला गावात फार मान होता.

किसनची अवस्था तुकानानांना समजत होती. बाजीचे डावपेचही तुकानानांच्या लक्षात आले होते. यातून किसनला कसे सोडवायचे याचाच तुकानाना विचार करत होते. समोर बसलेला बाजी मात्र गालातल्या गालात हसत होता. अखेर बैलाच्या वाटणीला सुरुवात झाली.

''बाजी, आम्ही सांगितलेला वाटणीचा उपाय तुला मंजूर नाही. मग आता तूच सांग बैलाची वाटणी कशी करायची?'' तुकानानांनी बाजीला विचारले. तसा बाजी उत्तरला,

''नाना, तुफान बैल खरं तर किसनने मला तसाच द्यायला पाहिजे होता. एवढे दिवस तो त्याच्याकडेच होता ना ? ... मग नियमाने तुफान आता माझ्याकडे यायला पाहिजे होता. पण तुम्हा सगळ्या पंचाच्या समान वाटणीच्या मताचा मी आदर करतोय. जर मला तुफान पाहिजे, तर वाटणीच्या नियमाप्रमाणे किसनला काहीतरी मिळायला पाहिजे हेसुद्धा मला मान्य आहे. म्हणून मी तुफानच्या वाटणीचा एक प्रस्ताव तुमच्यापुढं मांडतो. मी तुफान बैल माझ्याकडे

ठेवतो आणि त्याच्या बदल्यात मला मिळालेले विहिरीजवळचे वावर किसनला देतो. बघा पटतंय का?''

बाजीचा प्रस्ताव ऐकून सगळेच चकित झाले. काल निम्मे पैसे द्यायला तयार नसणारा बाजी आज चक्क वावर देण्याची भाषा करत होता. तुकानाना मात्र बाजीच्या प्रस्तावाने सावध झाला होते. त्यांना यामागे काहीतरी डाव असल्याचा संशय येत होता. म्हणून तुकानानांनी मुद्दाम बाजीला म्हटले,

''बाजी, तू हे जे काही आता बोललास ते खरे समजायचे ना आम्ही? नाही म्हणजे इथे एकदा शब्द दिला म्हणजे तो माघारी घेता येत नाही हे ठावूक असेलच तुला..''

यावर बाजी साळसूदपणे उत्तरला,

''नाना, तुम्ही माझ्यावर शंका नका हो घेवू. तुम्ही समजताय तसा मी स्वार्थी नाहीये. मला किसनची काळजी आहे. काहीही झालं तरी शेवटी तो माझा धाकटा भाऊ आहे. आणि माझा शब्द म्हणजे काळ्या दगडावरची रेघ आहे. एकदा दिला म्हणजे दिला. त्यात बदल नाही.''

'' मग ठीक आहे. आम्हाला ही वाटणी मान्य आहे.'' किसनचे मत न ऐकताच तुकानानांनी जाणूनबुजून वाटणीला मान्यता दिली. तसा बाजी पटकन म्हणाला,

''थांबा नाना थांबा! अजून माझं बोलणे पूर्ण नाही झालं. अहो तुफान बैल वाटणीमध्ये माझ्याकडे येतोय हे समजल्यापासून किसन नाराज झालाय हे समजलंय मला. किसनची मला फार काळजी वाटते. म्हणून

**बाजीचे बोलणे ऐकून किसनच्या डोळ्यात आशा पालवली. आपले वावर दिले, तर तुफान बैल आपल्याकडेच राहील या विचाराने किसनला हायसे वाटले.**

मी दुसरा एक पर्याय सांगतो. जर किसनला तुफान बैल हवा असेल, तर त्याने त्याच्या वाट्याचे विहिरीजवळचे वावर मला द्यावे आणि त्याला बैल नको असेल तर मी त्याला माझे वावर देतो. बघा सरळ सोपा पर्याय आहे आणि किसनच्या फायद्याचाही आहे.''

बाजीचे बोलणे ऐकून किसनच्या डोळ्यात आशा पालवली. आपले वावर दिले, तर तुफान बैल आपल्याकडेच राहील या विचाराने किसनला हायसे वाटले. तो काही बोलणार तोच तुकानानांनी त्याला डोळ्याचा इशारा करत गप्प केले. बाजीचा खरा डाव तुकानानांच्या लक्षात आल्यानेच त्यांनी किसनला इशारा करून गप्प बसविले होते.

बाजीचा डाव हाणून पाडण्यासाठी तुकानानांनी मग एक युक्ती केली. त्यांनी किसनचा हात दाबत किसनला म्हटले,

''काय रे किसन, मान्य आहे ना ही वाटणी? माझ्या मते बाजीने एकदम भारी वाटणी केलीय. नाव ठेवायला जागाच नाही. तू तुझा तुफान बैल देऊन टाक बाजीला. आणि तो म्हणतोय तसं विहिरीचं वावर घे तुला. आता इथं पंचासमोर हो म्हण आणि संपवून टाक एकदाची ही भानगड.'' तुकानानांनी सूचकपणे किसनला म्हटले.

तुकानाना बैल आपल्याला घ्यायला न सांगता भावाला द्यायला का सांगत आहेत हे काही किसनला कळेना. पण त्याला तुकानानांच्या शब्दापुढेही जाता येईना. इच्छा नसताना त्याने बैल बाजीला द्यायचे कबूल केले.

किसनने होकार देताच बाजीला आनंद होण्याऐवजी त्याचा चेहरा सरकन उतरला. मग तो उसने आवसान आणत किसनला म्हणाला,

''किसन, पाहिजे तर बैल तुला घे बाबा. तुझं शेतीचं काम अडायला नको.''

बाजीच्या या बोलण्यावर तुकानाना त्याला म्हणाले, ''बाजी, आता वाटणी संपली. तुला बैल द्यायला किसनने होकार दिलाय. आता उगाच फाटे फोडत बसू नकोस. आजपासून बैल तुझा झाला, आणि वावर किसनचं झालं. चला मोडा बरं बैठक.'' असे म्हणत तुकानाना उठले. तसे सगळे पंच वाटणी झाली असे म्हणत उठले, आणि आपापल्या घरी निघून गेले.

बाजी डाव फसल्यागत चेहरा करून बैल घेऊन निघाला. जणू काही त्याला तो बैल बळेच न्यायला लावला होता. किसन मात्र तुकानानांच्या अजब वागण्याने गोंधळला होता. तो विचार करत असतानाच तुकानाना तिथे आले आणि किसनला म्हणाले,

''किसन काळजी करू नकोस.

सगळे तुझ्या मनासारखे होईल.''

''अहो नाना, पण माझा तुफान मला नाही ना मिळाला. मला दादाचे वावर नाही, तर माझा तुफान पाहिजे होता. त्यासाठी मी माझे वावर द्यायला तयार होतो. पण तुम्ही मला गप्प बसवलेत. असं का केलंत?'' किसनने विचारले.

''किसन, हा तर बाजीचा खरा डाव होता. त्याला तुझा बैल नको होता. त्याला हवं होतं तुझं वावर. आणि ते वावर मिळवण्यासाठी त्याने ही चाल खेळली होती. तुला तुफान बैल किती प्यारा आहे हे त्याला माहिती होतं. म्हणून त्याने बैलाच्या वाटणीचा विषय वाढवला. बैलाच्या बदल्यात वावर हडप करण्याचा त्याचा विचार मी ओळखला होता. म्हणूनच मी तुला गप्प केलं होतं.''

''पण माझा तुफान तर गेला ना कायमचा.'' दुःखी होत किसन बोलला.

''तुझा तुफान तुलाच मिळणार. काळजी करू नकोस. मी बघतो काय करायचे ते.'' असे म्हणत तुकानाना किसनला धीर देत तेथून निघून गेले.

इकडे बाजीच्या घरी बाजीची आणि त्याच्या बायकोची खडाजंगी सुरू झाली.

''भावाचे वावर मिळवायला गेलात आणि स्वतःचेच वावर घालवून बसलात. आता हा बैल घेऊन काय करायचं? शहर सोडून इथं शेणमूत काढत बसायचं का?'' बाजीची बायको बिजलीगत बाजीवर कडाडली.

बैलांच्या वाटणीवरून बाजी आणि त्याच्या बायकोचे चांगलेच भांडण जुंपले होते. ते करायला गेले एक आणि झाले होते भलतेच. त्यांनी दुसऱ्यासाठी खड्डा खोदला होता.पण ते स्वतःच त्या खड्ड्यात पडले होते.

दोनतीन दिवस बैलाची उठाठेव करून वैतागलेल्या बाजीने मग रागारागात तुफान बैल एकाला विकून टाकला, आणि मिळतील तेवढे पैसे हाताला लावून शहराचा मार्ग धरला.

बाजीने ज्या माणसाला बैल विकला होता तो माणूस तुकानानांनीच पाठवलेला होता.

बाजीकडून विकत घेतलेला तुफान किसनच्या हवाली करून तुकानानांनी आपला शब्द पाळला.आता किसनला कमी किमतीत बैलही मिळाला होता आणि वावरही फुकट मिळाले होते. बैलाची वाटणी किसनच्या फायद्याची झाली होती.

पण प्रामाणिक किसनाने भावाचे वावर त्याला दिलदारपणे परत केले. मातीत राबणारा शेतकरी किती मोठ्या मनाचा असतो हे त्याने आपल्या मोठ्या भावाला प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले. ■

## आला पाऊस आला

**आला पाऊस आला,**
**धो धो बरसत आला**
**डोंगर शिखरे भिजवित**
**पाऊस आला**

**मुले लेकरे आनंदाने**
**लागलेत नाचू**
**मोर पिसारा फुलवित**
**चमकवती पाचू**
**धरतीने आहे शालू**
**हिरवा नेसला**

**धनधान्याची सुबत्ता**
**आता चिंता झाली दूर**
**प्राणी पक्षी यांचा भरे**
**आनंदाने ऊर**
**पिके डोलती वाऱ्यासंगे**
**दिन समृद्धि आला**

**फळा फुलांना बहर**
**नटेल आता सृष्टी**
**जून पावसाचा खेळ**
**पडेल आता दृष्टि**
**उत्सव सणासुदींचा**
**आला करावयाला**

**आला पाऊस आला**



**दत्तात्रय जोशी**
**पुणे**



श्रद्धा गंधास
सहा.पोलीस निरीक्षक
घोटी पोलीस ठाणे
नाशिक ग्रामीण

# चापल्य

चपळता हा माणसाच्या अंगात असलेला महत्त्वाचा गूण. तत्परता, चपळाई या गूणांच्या साथीने माणूस अनेक अशक्य गोष्टी यशस्वीपणे मिळवू शकतो, पण या गोष्टी नसतील तर वेळीच या गोष्टींचा वापर करणे जमले नाही तर? मग साध्या वाटणाऱ्या गोष्टी पूर्ण करणेही अशक्यप्राय वाटू शकते. काय घडले होते नेमके शरद, शांता आणि मंगला यांच्या बाबतीत? चपळाई दाखवून घोटी पोलिसांनी कसा उलगडा केला गुन्ह्याचा?



शरदला कायम दारूच्या अंमलाखाली बघणे हे त्याला ओळखणाऱ्या लोकांना नवीन नव्हते. त्याची पत्नी शांता हिच्या माहेरी येण्याची गोष्टदेखील आजूबाजूच्या लोकांना आता सवयीची झाली होती. जून महिना सरत आला तरी शांता आपल्या घरी अजून येत नाही याच विचाराने त्याचे डोके सुन्न झाले होते. या विचाराला लांब पळवायचे म्हणून तो कैक दिवस रात्री उशिरापर्यंत घरी येई. तसाच तो २२ जूनलाही उशिरा घरी आला. त्याला पावलेही धड टाकता येत नव्हती. तो घरी आला,



**शीतल गायकवाड**
पोलीस अंमलदार
घोटी पोलीस ठाणे
नाशिक ग्रामीण



**मारुती बोराडे**
पोलीस अंमलदार
घोटी पोलीस ठाणे
नाशिक ग्रामीण



**गोविंद सदगीर**
पोलीस अंमलदार
घोटी पोलीस ठाणे
नाशिक ग्रामीण



**वैशाली भोर**
पोलीस अंमलदार
घोटी पोलीस ठाणे
(कोर्ट पैरवी)

त्या दिवशीही रोजप्रमाणे दरवाजाला कुलूप तसेच होते. शरीरात होती नव्हती, ती सगळी शक्ती एकवटून शरद तिच्या माहेरी जायला निघाला. रात्रीच्या त्या अंधारात दाटीवाटीने जमा झालेले ढग हे त्याच्या उदास मन:स्थितीचे जणूकाही दर्शन घडवत होते. तो भेलकांडत का होईना पण शांताच्या माहेरी येऊन पोहोचला. शांता आपल्या आईला मदत करण्यासाठी म्हणून अंगणात भांडी धूत होती.

''ए शांतेऽऽ.. ए शांते, उठ, चल आपल्या घरी.''

''मी तुम्हाला कितींदा सांगितलं मला न्हाई राहायचं तुमच्यासंगं. तरीबी परत कशाला येता इथं?'' डोळ्यावर आलेली केसांची एक बारकी बट कानामागे करत शांता म्हणाली.

''न्हाई यायचं? न्हाई यायचं म्हणजे? काय माहेरीच राहणार की काय?''

''त्याच्याशी तुमचा काय संबंध? मी कुठेही राहीन. पण तुमच्याबरोबर नाही.''

''काय संबंध? थांब तुला दावतोच आता काय संबध ते.'' असे म्हणत त्याने शांताचे मनगट पकडले. त्यांच्यात शाब्दिक चकमकी झडू लागल्याचे बघून शांताची आई मुलीच्या मदतीसाठी पुढे आली.



**शरीरात होती नव्हती, ती सगळी शक्ती एकवटून शरद तिच्या माहेरी जायला निघाला. रात्रीच्या त्या अंधारात दाटीवाटीने जमा झालेले ढग हे त्याच्या उदास मन:स्थितीचे जणूकाही दर्शन घडवत होते. तो भेलकांडत का होईना पण शांताच्या माहेरी येऊन पोहोचला.**

''हे बघा, जावईबापू, आमच्या शांतीला न्हाई आवडत तुमच्याबरोबर. त्याला ती तरी काय करणार?''

''काय बोलताये तुम्ही? ती नाही तर मग कोण करणार? तिला माझ्याबरोबर यावंच लागंल. मी तिला घेतल्याशिवाय इथून जाणारच नाही मुळी.''

''पण मला न्हाई यायचं तुमच्यासंगं.'' शरदला मध्येच थांबवत शांता म्हणाली.

''म... म्हणजे,.. तू अश्शी न्हाई ऐकायची. थांब. तुला दाखवतोच.'' असे म्हणत तो उठला.

तिथेच बाजूला असलेल्या विळ्याकडे त्याचे लक्ष गेले. उठून त्याने विळा उचलला. त्याने विळा उचललेला बघताच शांता आणि तिच्या आईच्या डोळ्यांसमोर काजवे चमकले.

''जावईबापू, काय करताय हे? आधी तो विळा टाका बरं खालती. माजं ऐका... असा डोक्यात राग घालून काही होणार नाही. हे बघा अशा गोष्टी शांतपणे बसून बोलूनच सुटतात.''

''आता समीजलं व्हय तुमाला? मगा तुम्हीच म्हणत व्हता की तिला न्हाई यायचं माझ्या बरीबर.'' असे म्हणत शांताच्या हातावर विळ्याने वार केला.

''आई गं...'' असह्य वेदनेने शांता विव्हळत होती. तिच्या हातातून रक्ताची धार लागली होती.

''काय केलंत तुम्ही हे? मी बोलत होते ना तुमच्याशी. मग माझ्या पोरीच्या हातावर मारण्याचं काय कारण?'' भांडणात मध्ये पडणाऱ्या मंगलाने–शांताच्या आईने शरदला चिडून प्रश्न केला. शांताचे असह्य वेदनेने विव्हळणे सुरूच होते.

''रडू नको. मी आतून आणते

काहीतरी लावायला. पट्टीपण करते. थांब जरा.'' आपला प्रेमळ हात शांताच्या पाठीवरून फिरवत मंगला म्हणाली.

शरदने आता मध्ये पडणाऱ्या सासूच्या पोटातही विळ्यापासून जरा लांब ठेवलेली कात्री घुसवली.

''आई आई गंऽऽ आ.. आ..''

तोपर्यंत त्यांच्या भांडणाचा आवाज आजूबाजूच्या परिसरात गेला. दोन्ही मायलेकींचे विव्हळणे आर्त ओरडणे ऐकून आजूबाजूच्या घरातील माणसे तिथे जमा व्हायला सुरुवात झाली. लोक जमा व्हायला सुरुवात झाली असल्याचे लक्षात येताच शरदने तिथून पळण्याचा प्रयत्न केला, पण तो प्रयत्न अयशस्वी झाला. जमलेल्या लोकांपैकी काहींनी त्याला अडवून बांधून ठेवले, तर काहींनी घोटी पोलीस ठाण्यात फोन करून घडलेल्या घटनेची माहिती दिली घटनेचे गांभीर्य लक्षात घेताच घोटी पोलीस ठाण्यात सहा. पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत असणाऱ्या श्रद्धा गंधास या पथकासह तातडीने घटनास्थळी रवाना झाल्या. रात्रीची वेळ असल्याने रस्त्यावर तुरळक रहदारी होती. काही वेळातच गंधास मॅडम पथकासह घटनास्थळी दाखल झाल्या. जमलेल्या लोकांना बाजूला होण्याची सूचना करत त्या शांता आणि मंगला यांच्यापाशी गेल्या. मॅडमना बघताच शांता धाय मोकलून रडायला लागली.

''गायकवाड, यांना लगेच रुग्णालयात न्या. आणि ॲम्ब्युलन्सला बोलवून बॉडी पोस्टमॉर्टेमला पाठवा.'' पोलीस अंमलदार शीतल गायकवाड यांना मॅडमनी सूचना केली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळावरून गुन्हा करताना वापरलेली हत्यारे व अन्य महत्त्वाचे भैतिक व जैविक पुरावे पोलिसांनी हस्तगत केले. तसेच सर्व महत्त्वाच्या साक्षीदारांचे जबाब नोंदवले. पोलिसांनी घटनास्थळावरूनच



**तोपर्यंत त्यांच्या भांडणाचा आवाज आजूबाजूच्या परिसरात गेला. दोन्ही मायलेकींचे विव्हळणे आर्त ओरडणे ऐकून आजूबाजूच्या घरातील माणसे तिथे जमा व्हायला सुरुवात झाली. लोक जमा व्हायला सुरुवात झाली असल्याचे लक्षात येताच शरदने तिथून पळण्याचा प्रयत्न केला**

बांधलेल्या अवस्थेतील संशयिताला सोडवून त्याला अटक केली. त्याला घेऊन पोलीस घोटी पोलीस ठाण्यात आले.

''पटकन बोल... का मारलं तू तुझ्या बायकोला आणि तिच्या आईला?''

''मंग अजून काय करणार मी? मी कितींदा बोललो का घरी चल आपल्या असं किती काळ म्हायेरी राहाणार? तर मला म्हणाली 'मला राहायचं न्हाई तुमच्याबरोबर. मी काय तिकडे येणार न्हाई.' तुम्हीच सांगा, माझ्याबरीबर राहायचं नव्हतं तर मंग लग्न कशाला केलं?''

''तिला राहायचं नाही असं तिने सांगितल्यावर तू त्यांच्या जिवावर उठलास?''

''माज्यापुढे दुसरं काही शिल्लकच ठेवलं नाही त्यांनी. मी शांताशी बोलायला गेलो तर तिची आई मधे पडली. म्हणून''

पोलिसांनी सर्व हस्तगत बाबी वैद्यकीय तपासणी न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे पाठवल्या. तसेच मा. न्यायालयात संशयिताच्या विरोधात दोषारोपपत्र दाखल केले.

समोर आलेले सर्व साक्षीपुरावे ग्राह्य धरून मा. न्यायालयाने शरदला भादंवि कलम ३०२ व ३०७ अन्वये दोषी ठरवत आजीवन कारावास आणि प्रत्येकी दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणाचा तपास नाशिक ग्रामीण येथील घोटी पोलीस ठाण्याच्या सहा. पोलीस निरीक्षक श्रद्धा गंधास, पोलीस अंमलदार शीतल गायकवाड, मारुती बोराडे, गोविंद सदगीर व पोलीस अंमलदार वैशाली भोर(कोर्ट पैरवी) यांनी अत्यंत चपळाईने व कौशल्याने पूर्ण केला आहे. ■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***

# मुंबई रेल्वे पोलिसांची संवेदनशीलता व दक्षता

## हरवलेल्या बालकांच्या भवितव्यास देई सुरक्षितता

मुंबईसारखी महानगरे अनेक मुलांना– मोठी स्वप्ने, रोजगार, चित्रपटसृष्टी, जलद पैसा किंवा स्वातंत्र्य– या गोष्टींचे आकर्षण वाटत असल्यामुळे त्यांच्यासाठी आकर्षणाचे केंद्र बनतात. घरातील भांडणे, पालकांचा राग किंवा मारहाण, अभ्यासाचा दबाव, आर्थिक अडचणी अशा परिस्थितीत काही मुले रागाच्या भरात घर सोडतात. परंतु अनेक वेळा ही मुले चुकीच्या लोकांच्या संपर्कात येऊन धोकादायक परिस्थितीत अडकतात. काही प्रकरणांमध्ये अल्पवयीन मुले व मुलींचे अपहरण किंवा फसवणूक करून त्यांचा गैरवापर केला जातो.

घरातून निघून गेलेली अनेक मुले प्रथम रेल्वे स्टेशनवर दिसून येतात, कारण प्रवास सोपा व स्वस्त असतो. गर्दीत ओळख लपवणे सोपे वाटते. शहरात काम किंवा आसरा मिळेल अशी अपेक्षा असते, तसेच त्यांच्या घरापासून सुरू झालेल्या प्रवासाचा शेवट हा रेल्वे स्थानके असल्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, लोकमान्य टिळक टर्मिनस आणि इतर मोठी रेल्वे स्थानके ही देशभरातून येणाऱ्या मुलांची मुख्य केंद्रे आहेत. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणांमध्ये मुंबई रेल्वे पोलिसांची भूमिका फार महत्त्वाची ठरते. गस्त, चौकशी आणि बचाव मोहीम ही त्रीसूत्री रेल्वे पोलिसांकडून सातत्याने राबविली जाते. ऑपरेशन मुस्कान, ऑपरेशन शोध, महिला सुरक्षा पथके, AHTU छापे, निरीक्षण, रेल्वे स्टेशनवर विशेष गस्त, हरवलेल्या मुलांची डिजिटल माहिती शेअर करणे अशी कार्यप्रणाली नियमित राबवली जाते. सदर कामगिरी दरम्यान गेल्या ०५ वर्षांमध्ये एकूण २११७ बालके पालकांच्या ताब्यात सुखरूप देण्यात आली असून एकूण ३४५ महिला व पुरुष त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात मुंबई लोहमार्ग पोलिसांना यश आले आहे.

ऑपरेशन मुस्कान ही महाराष्ट्र पोलीस तसेच देशभरातील पोलीस यंत्रणेद्वारे राबविण्यात येणारी विशेष मोहीम आहे. हरवलेली मुले–मुली, महिलांचा शोध घेणे, बालमजुरी, मानव तस्करी, भीक मागण्यास भाग पाडलेली मुले तसेच रेल्वे स्थानक, बसस्थानके आणि सार्वजनिक ठिकाणी असुरक्षित अवस्थेत आढळणाऱ्या बालकांचे संरक्षण करणे हा या मोहिमेचा

मुख्य उद्देश आहे. ही मोहीम विशेषतः महिला व बाल सुरक्षा विभाग, अँटी ह्युमन ट्रॅफिकिंग युनिट (AHTU), रेल्वे पोलीस, स्थानिक पोलीस ठाणे, बालकल्याण समिती आणि विविध स्वयंसेवी संस्थांच्या समन्वयातून राबवली जाते. या मोहिमेचा मुख्य हेतू म्हणजे हरवलेल्या मुलांना त्यांच्या कुटुंबापर्यंत सुखरूप पोहोचवून त्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा 'मुस्कान' आणणे. जानेवारी ते फेब्रुवारी २०२६ दरम्यान राबविण्यात आलेल्या 'ऑपरेशन मुस्कान–१४' अंतर्गत महाराष्ट्र रेल्वे पोलिसांनी शेकडो मुलांना सुरक्षितरित्या ताब्यात घेतले व अनेक मुलांची त्यांच्या कुटुंबीयांशी पुन्हा भेट घडवून आणली.

ऑपरेशन मुस्कान ही महाराष्ट्र पोलिसांची समाजाप्रती संवेदनशीलता, सामाजिक जबाबदारी आणि मानवतेची जाणीव दर्शवणारी प्रभावी मोहीम आहे. हरवलेल्या प्रत्येक बालकाच्या चेहऱ्यावर पुन्हा हास्य फुलवणे आणि त्यांना सुरक्षित आयुष्य देणे, हेच या मोहिमेचे खरे यश आहे. महाराष्ट्र पोलीस, महिला सुरक्षा पथके, रेल्वे पोलीस व अँटी ह्युमन ट्रॅफिकिंग युनिट यांच्या समन्वयातून ही मोहीम समाजासाठी आशेचा किरण ठरत आहे.

श्री. एम. राकेश कलासागर, पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई, श्रीमती. सुनीता साळुंके–ठाकरे, पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ, लोहमार्ग, मुंबई, व प्रज्ञा जेडगे, पोलीस उप आयुक्त, मध्य परिमंडळ, लोहमार्ग, मुंबई याचे विशेष मार्गदर्शनाखाली विविध मोहिमांचे आयोजन करण्यात आले असून त्यांची फलनिष्पत्ती खालील प्रमाणे आहे.

### ऑपरेशन शोध मोहीम १

दि.१७/०४/२०२५ ते १५/०५/२०२५ या कालावधीत अपर पोलीस महासंचालक महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग यांच्या निर्देशानुसार राज्य स्तरावर ऑपरेशन शोध १ ही मोहीम राबविण्यात आली होती. सदर मोहिमेअंर्तगत सन २०२१ ते ०५/२०२५ पर्यंत रेकॉर्डवरील गुन्ह्यांतील ०२ मुलांचा शोध घेण्यात येऊन अपहरण या सदराखालील ०२ गुन्हे उघडकीस आणण्यात यश मिळाले आहे.

### ऑपरेशन शोध मोहीम -२

दि. ०१ ते १४/११/२०२५ या कालावधीत अपर पोलीस महासंचालक महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग यांच्या निर्देशानुसार १८ वर्षांखालील मुले व मुली (बालके) यांच्यासाठी राज्य स्तरावर ऑपरेशन शोध २ ही मोहीम राबविण्यात आली होती. सदर मोहीमेअंर्तगत सन २०२१ तसेच ०१ जानेवारी ते ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी पर्यंत रेकॉर्डवरील गुन्ह्यांमधील ०१ मुलीचा शोध घेण्यात आला. अपहरण या सदराखालील ०१ गुन्हा उघडकीस आणण्यात यश मिळाले आहे.

### ऑपरेशन मुस्कान - १४

मुस्कान–१४ ही शोध मोहीम दिनांक २०/०१/२०२६ ते २०/०२/२०२६ या कालावधीत राज्य स्तरावर राबविण्याचे सर्व पोलीस घटकांना निर्देश देण्यात आले होते. नमूद पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबईच्या कार्यक्षेत्रात दिनांक २०/०१/२०२६ ते २०/०२/२०२६ या कालावधीत ऑपरेशन मुस्कान–१४ मोहिमेदरम्यान २०१२ ते

| पोलीस ठाणे | गु.र.नं. | दाखल तारीख व वेळ | मोहिमेअंतर्गत मिळून आलेले मुल |
|---|---|---|---|
| कल्याण रेल्वे पोलीस ठाणे | गु.र.नं. १५६/२०१७ भादंवि कलम ३६३ | १८–०४–२०१७ रोजी १७.४९ वाजता | गुरुदिप सतनाम सिंग |
| दादर रेल्वे पोलीस ठाणे | गु.र.नं. १५५२/१८ भादंवि कलम ३६३ | २०–०६–२०१८ रोजी १९.२२ वाजता | सलाउद्दीन अलाउद्दीन खान |
| डोंबिवली रेल्वे पोलीस ठाणे | गु.र.नं. ३८२/२०१९ भादंवि कलम ३६३ | २०–०८–२०२१ रोजी २.४७ वाजता | अंजली तिरुपती शिंदे |

**मुंबई लोहमार्ग आयुक्तालयातील महिला सुरक्षा पथक (निर्भया पथक) सन २०२१ ते २०२६ पर्यंतच्या कामगिरीबाबत**

| सन | २०२१ | २०२२ | २०२३ | २०२४ | २०२५ | २०२६ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पालकांच्या ताब्यात दिलेले बालक (जे जे अउढ) | ५ | ४३ | ३१३ | ६५२ | ९३१ | १७३ | २११७ |
| महिला व पुरुष नातेवाईकांच्या ताब्यात दिले बाबत | १ | १९ | ४३ | १२४ | १३१ | २७ | ३४५ |

**मुंबई लोहमार्ग आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात पालकांशिवाय मिळून आलेली मुले/मुली सन २०२१ ते २०२६ एप्रिलअखेर**

| सन | चुकामुक झालेली व जेजे अट प्रमाणे ताब्यात घेतलेली एकूण बालके | एकूण | | पोलीस ठाण्याने तत्काळ पालकांच्या ताब्यात दिलेली | एकूण | | बालगृहात पाठवलेली | एकूण | | बालगृहातून पालकांच्या ताब्यात दिलेली | एकूण | | बालगृहात शिल्लक असलेली | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | मुले/मुली | मुले | मुली | मुले/मुली | मुले | मुली | मुले/मुली | मुले | मुली | मुले/मुली | मुले | मुली | मुले/मुली |
| २१ | १०४७ | ४९७ | १५४४ | ४३७ | २४० | ६७७ | ६१० | २५७ | ८६७ | ६१० | २५७ | ८६७ | ० | ० | ० |
| २२ | १८१९ | ७४३ | २५६२ | ७८० | ३१५ | १०९५ | १०३९ | ४२८ | १४६७ | १०३७ | ४२८ | १४६५ | २ | ० | २ |
| २३ | १४१४ | ७४९ | २१६३ | ७७८ | ३८२ | ११६० | ६२६ | ३६७ | १००३ | ६३२ | ३६६ | ९९८ | ४ | १ | ५ |
| २४ | ८७९ | ५७२ | १४५१ | ३४० | १८४ | ५२४ | ५३९ | ३८८ | ९२७ | ५३४ | ३७८ | ९१२ | ५ | १० | १५ |
| २५ | २२५१ | १०७७ | ३२२८ | १२९० | ५०९ | १७९९ | ९६१ | ५६८ | १५२९ | ९४५ | ५६० | १५०५ | १६ | ८ | २४ |
| २६ एप्रिल अखेर | ५६३ | ३६३ | ९२६ | ३१६ | १६५ | ४८१ | २४७ | १९८ | ४४५ | १९० | १६२ | ३५२ | ५७ | ३६ | ९३ |
| | ७९७३ | ४००१ | ११९७४ | ३९४१ | १७९५ | ५७३६ | ४०३२ | २२०६ | ६२३८ | ३९४८ | २१५१ | ६०९९ | ८४ | ५५ | १३९ |

२०२६ पावेतो १९ तपासावरील प्रलंबित गुन्ह्यांपैकी खालील ०३ गुन्हे उघडकीस आले आहेत.

**आसनसोल-मुंबई एक्सप्रेसमधून संशयितरीत्या प्रवास करणाऱ्या अल्पवयीन मुलांची सुटका**

**ठाणे रेल्वे पोलिसांची सतर्कता, समन्वय आणि मानवी संवेदनशीलतेचे उत्कृष्ट उदाहरण**

२० एप्रिल २०२६ रोजी आसनसोल-मुंबई एक्सप्रेस (गाडी क्र. १२३६१) मधून काही अल्पवयीन मुले संशयितरीत्या पालकांशिवाय प्रवास करत असल्याची माहिती चाईल्ड हेल्पलाईन या सेवाभावी संस्थेचे सदस्य श्री. नितीन दीक्षित यांनी मुंबई मुस्कान या व्हॉट्सअॅप समूहावर दिली. सदर माहिती



मिळताच रेल्वे पोलीस, महिला सुरक्षा पथक, RPF, MSF तसेच स्वयंसेवी संस्थांमध्ये तत्काळ समन्वय साधण्यात आला.

प्राथमिक माहितीनुसार १७ मुले गाडीतील S-१, S-२ आणि S-३ डब्यांतून प्रवास करत असल्याचे सांगण्यात आले होते. त्यानुसार इटारसी, भोपाळ, औरंगाबाद तसेच कल्याण आणि रेल्वे पोलीस नियंत्रण कक्षांना सतर्क करण्यात आले. विविध स्तरांवर गाडी तपासण्यात आली, मात्र सुरुवातीला संबंधित मुले मिळून आली नाहीत. त्यानंतर चाईल्ड हेल्पलाईनच्या माध्यमातून मिळालेल्या नव्या माहितीनुसार सदर गाडी ठाणे स्टेशनपर्यंतच धावणार असून S-६ डब्यात संशयित मुले असल्याचे समजले.

सहा. पोलीस निरीक्षक माधुरी घाडगे यांच्या उपस्थितीत अनैतिक मानवी वाहतूक शाखा, महिला सुरक्षा पथक, रेल्वे पोलीस, RPF, MSF तसेच चाईल्ड लाईनच्या प्रतिनिधींनी संयुक्त कारवाई करत ठाणे रेल्वे स्थानकावरील फलाट क्रमांक ८ वर आसनसोल एक्सप्रेस अटेण्ड केली.

गाडीची सखोल तपासणी केली असता झारखंड राज्यातील सात अल्पवयीन मुले संशयास्पद परिस्थितीत प्रवास करताना आढळून आली. सर्व मुलांना ताब्यात घेऊन ठाणे रेल्वे पोलीस ठाण्यात आणण्यात आले. त्यानंतर त्यांच्या पालकांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून चौकशी करण्यात आली.

**गाडीची सखोल तपासणी केली असता झारखंड राज्यातील सात अल्पवयीन मुले संशयास्पद परिस्थितीत प्रवास करताना आढळून आली. सर्व मुलांना ताब्यात घेऊन ठाणे रेल्वे पोलीस ठाण्यात आणण्यात आले. त्यानंतर त्यांच्या पालकांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून चौकशी करण्यात आली. चौकशीत काही मुले काही काम शिकण्यासाठी किंवा कामधंद्याच्या शोधात आल्याचे, तर काही फिरण्यासाठी आल्याचे समोर आले.**

चौकशीत काही मुले मुंबईत नातेवाईकांकडे येत असल्याचे, काही काम शिकण्यासाठी किंवा कामधंद्याच्या शोधात आल्याचे, तर काही फिरण्यासाठी आल्याचे समोर आले. विशेष म्हणजे काही अल्पवयीन मुले रोजगाराच्या आशेने मुंबईकडे येत असल्याचे निष्पन्न झाले.

मुलांसोबत प्रवास करणाऱ्या दोन प्रौढ नातेवाईकांचीही चौकशी करण्यात आली. सदर सर्व मुलांना पुढील कायदेशीर व आवश्यक अशा संरक्षणात्मक कार्यवाहीसाठी बाल कल्याण समिती (CWC), उल्हासनगर यांच्या समक्ष हजर करण्यात आले असून त्यांची सुरक्षित व्यवस्था भिवंडी येथे करण्यात आली.

या विशेष मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक मुकुंद देशमुख, महिला सुरक्षा पथक ग्रुप 'C' मधील महिला पोलीस अंमलदार कळंबे, सुर्वे, माने, सुरवाडे, बल्लाळ, मालवणकर, तसेच ठाणे रेल्वे पोलीस ठाण्याचे श्रेणी पोलीस उपनिरीक्षक कदम, पोलीस अंमलदार खांडेकर, महिला पोलीस अंमलदार पल्लवी गोपाळ, RPF चे विकास काळी, MSF चे वैभव आणि चाईल्ड लाईनच्या श्रद्धा नारकर, पूजा नागरे व श्री. विकास गायकवाड यांनी सहभाग घेतला.

या संपूर्ण कारवाईत ठाणे रेल्वे पोलिसांनी दाखविलेली तत्परता, विविध यंत्रणांमधील प्रभावी समन्वय, महिला सुरक्षा पथकाची दक्षता आणि बालसुरक्षेबाबतची

संवेदनशीलता यामुळे संभाव्य मानवी तस्करी किंवा बालशोषणास आळा बसण्यास मोठी मदत झाली.

**२. सतर्क महिला सुरक्षा पथकामुळे अल्पवयीन मुलीची सुखरूप सुटका-**

मध्य रेल्वे परिमंडळातील महिला सुरक्षा पथकाची सतर्कता, संवेदनशीलता आणि तत्परतेमुळे उत्तर प्रदेश येथून घरातून निघून आलेल्या एका अल्पवयीन मुलीची सुखरूप सुटका करण्यात यश आले. या घटनेमुळे मुंबई रेल्वे पोलीस दलाचे सामाजिक उत्तरदायित्व आणि महिलांच्या व बालकांच्या सुरक्षेसाठी असलेली बांधिलकी पुन्हा अधोरेखित झाली.

१० फेब्रुवारी २०२५ रोजी ग्रुप 'A' मध्य परिमंडळातील महिला सुरक्षा पथकातील इंगवले, तरे, माने व साने या अधिकारी व अंमलदारांची दुपारी २.०० ते रात्री ९.०० या वेळेत मध्य परिमंडळात गस्त घालण्याकामी नेमणूक करण्यात आली होती. महिलांची सुरक्षा, अल्पवयीन मुलांचे संरक्षण तसेच गुन्हेगारांवर प्रतिबंध ठेवण्याच्या उद्देशाने हे पथक सतत रेल्वे परिसरात दक्षतेने कार्यरत होते.

संध्याकाळी सुमारे ६.३० वाजण्याच्या दरम्यान हे पथक कल्याण रेल्वे स्थानक परिसरात गस्त घालत असताना स्थानकावरील मध्यवर्ती मोठ्या पुलावर एक अल्पवयीन मुलगी एकटीच रडत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. मुलीची मानसिक अवस्था घाबरलेली असून ती अस्वस्थ दिसत असल्याने महिला सुरक्षा पथकाने तत्काळ तिच्याशी संवाद साधला. नमूद पथकाने अत्यंत संयमाने आणि विश्वासाने तिची विचारपूस केली. त्यानंतर मुलीस सुरक्षित ताब्यात घेऊन कल्याण रेल्वे पोलीस ठाण्यात आणण्यात आले. तेथे ठाणे अंमलदारांसमक्ष तिची अधिक चौकशी करण्यात आली असता, तिने आपले नाव सांगून ती खालीसपूर, जिल्हा फत्तेहपूर, उत्तर प्रदेश येथे वास्तव्यास असे

**मध्य रेल्वे परिमंडळातील महिला सुरक्षा पथकाची सतर्कता, संवेदनशीलता आणि तत्परतेमुळे उत्तर प्रदेश येथून घरातून निघून आलेल्या एका अल्पवयीन मुलीची सुखरूप सुटका करण्यात यश आले. या घटनेमुळे मुंबई रेल्वे पोलीस दलाचे सामाजिक उत्तरदायित्व आणि महिलांच्या व बालकांच्या सुरक्षेसाठी असलेली बांधिलकी पुन्हा अधोरेखित झाली.**

सांगितले. मुलीकडून मिळालेल्या माहितीनुसार तिचे वडील यांच्याशी मोबाईलद्वारे संपर्क साधण्यात आला. त्यावेळी त्यांनी सांगितले, की त्यांची मुलगी दिनांक ४ फेब्रुवारी २०२५ रोजी घरातून कोणालाही काही न सांगता निघून गेली होती. याप्रकरणी खालीसपूर पोलीस ठाणे, फत्तेहपूर, उत्तर प्रदेश येथे गुन्हा रजि. नं. २३/२५, कलम १३७ भारतीय न्याय संहिता (BNS) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. यानंतर संबंधित अल्पवयीन मुलीस बाल न्याय (J.J. Act) कलम ३१(१) अन्वये (संरक्षणात्मक ताब्यात घेऊन पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी कल्याण रेल्वे पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले.) सदर घटनेची आवश्यक नोंद कल्याण रेल्वे पोलीस ठाण्यात करण्यात आली.

महिला सुरक्षा पथकाच्या या प्रशंसनीय कार्यामुळे एका कुटुंबाला त्यांच्या हरवलेल्या मुलीचा सुखरुप शोध लागला आणि रेल्वे पोलीस दलाविषयी नागरिकांचा विश्वास अधिक दृढ झाला.

**३. हार्बर विभाग महिला सुरक्षा पथकाच्या सतर्कतेमुळे परराज्यातील महिला सुरक्षित**

मुंबई रेल्वे परिसरात महिला व बालकांच्या सुरक्षेसाठी कार्यरत असलेल्या गुन्हे शाखा लोहमार्ग मुंबई यांच्या हार्बर विभाग महिला सुरक्षा पथकाने आपल्या सतर्कता, संवेदनशीलता आणि तत्परतेचे उत्कृष्ट उदाहरण दाखवत परराज्यातील महासमुंद पोलीस ठाणे, राज्य छत्तीसगड येथील

मनुष्य मिसिंग नं.१३४/२५ मधील एका हरवलेल्या महिलेचा शोध घेऊन तिला सुरक्षित संरक्षण उपलब्ध करून दिले.

२६ जुलै २०२५ रोजी सकाळी ०७.०० ते १५.०० या वेळेत हार्बर विभाग महिला सुरक्षा पथक ग्रुप 'C' अंतर्गत महिला पोलीस हवालदार कळंबे, सरवदे व सुर्वे हे अधिकारी गुन्हे प्रतिबंध तसेच महिला व बालकांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने लोकमान्य टिळक टर्मिनस परिसरात गस्त घालत होते. दरम्यान, प्लॅटफॉर्म क्रमांक २/३ येथे सुमारे १०.४५ वाजण्याच्या सुमारास एक तरुण महिला एकटी व घाबरलेल्या अवस्थेत बाकड्यावर बसलेली दिसून आली.

महिला सुरक्षा पथकातील महिला पोलीस अंमलदारांनी तत्काळ तिच्याशी संवाद साधून तिला विश्वासात घेतले व पुढील चौकशीसाठी कुर्ला रेल्वे पोलीस ठाणे येथे आणले. विचारपूस दरम्यान संबंधित महिलेने आपले नाव सीमा वसंत यादव, वय १९ वर्षे, रा. पोस्ट महासमुंद, राज्य छत्तीसगड असे सांगितले. तिने दिनांक २२ जुलै २०२५ रोजी कोणालाही न सांगता घरातून मुंबईकडे निघून आल्याची माहिती दिली.

पुढील चौकशीमध्ये तिच्या मोबाईलमधून तिच्या भावाचा संपर्क क्रमांक मिळवून त्यांच्याशी संपर्क साधण्यात आला. तिचे भाऊ मोहन वसंत यादव यांनी सदर महिला ही त्यांची लहान बहीण असून ती २२ जुलै २०२५ पासून बेपत्ता असल्याचे सांगितले. तसेच महासमुंद पोलीस ठाणे, छत्तीसगड येथे मानव मिसिंग क्रमांक १३४/२५ अन्वये तक्रार दाखल करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. यानंतर महासमुंद पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांच्याशी संपर्क साधून संपूर्ण माहिती देण्यात आली.

**पुढील चौकशीमध्ये तिच्या मोबाईलमधून तिच्या भावाचा संपर्क क्रमांक मिळवून त्यांच्याशी संपर्क साधण्यात आला. तिचे भाऊ मोहन वसंत यादव यांनी सदर महिला ही त्यांची लहान बहीण असून ती २२ जुलै २०२५ पासून बेपत्ता असल्याचे सांगितले. तसेच महासमुंद पोलीस ठाणे, छत्तीसगड येथे मानव मिसिंग अन्वये तक्रार दाखल करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.**

महिला सुरक्षा पथकाच्या दक्षता, संवेदनशीलता आणि मानवी दृष्टिकोनामुळे एका परराज्यातील महिलेचे सुरक्षित रक्षण होऊन तिच्या कुटुंबियांना दिलासा मिळाला. अशा प्रकारच्या कार्यातून लोहमार्ग पोलीस दल समाजातील महिला व बालकांच्या सुरक्षेसाठी सातत्याने कटिबद्ध असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

**४. अनैतिक मानवी वाहतूक शाखा व महिला सुरक्षा पथकाची तत्पर कारवाई** - पालकांशिवाय प्रवास करणाऱ्या अल्पवयीन मुलास सुरक्षित संरक्षण

रेल्वे परिसरातील महिला व बालकांच्या सुरक्षेसाठी सातत्याने दक्ष असलेल्या अनैतिक मानवी वाहतूक शाखा, लोहमार्ग मुंबई तसेच महिला सुरक्षा पथक ग्रुप 'A' मध्य परिमंडळ यांनी संयुक्त कारवाई करत परराज्यातील एका अल्पवयीन मुलास सुरक्षित ताब्यात घेऊन त्याच्या संरक्षणाची प्रभावी तजवीज केली.

दिनांक २७ एप्रिल २०२६ या दिवशी सकाळी १०.३० वाजता चाईल्ड हेल्प लाईनचे सदस्य श्री. नितीन दिक्षीत यांनी गाडी क्रमांक १२३६१ मधील जनरल डब्यात दहा अल्पवयीन मुले प्रवास करत असल्याची माहिती दिली.



सदर माहिती मिळताच महिला पोलीस अंमलदार बल्लाळ यांनी इटारसी कंट्रोल, संभाजीनगर कंट्रोल तसेच कल्याण व सीएसएम टी रेल्वे पोलीस ठाण्यांना तातडीने माहिती देऊन संबंधित गाडी अटेण्ड करण्याबाबत कळविले. त्यानंतर दिनांक २८ एप्रिल २०२६ रोजी सहा. पोलीस निरीक्षक माधुरी घाडगे, नेमणूक महिला कक्ष यांनी महिला सुरक्षा पथक ग्रुप 'C' मध्य परिमंडळाशी संपर्क साधून मुंबई मुस्कान या व्हॉट्सअॅप ग्रुपवर प्राप्त झालेल्या संदेशाची माहिती दिली. सदर गाडी तपासणीसाठी अनैतिक मानवी वाहतूक शाखा, महिला सुरक्षा पथक तसेच विविध सेवाभावी संस्थांच्या प्रतिनिधींना समन्वयाने कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले.

कल्याण रेल्वे स्थानकावरील फलाट क्रमांक ५ वर आलेली आसनसोल एक्सप्रेस गाडी तपासण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार दहा मुले आढळून आली नाहीत. मात्र, तपासणीदरम्यान जनरल डब्याजवळ एक अल्पवयीन मुलगा विनापालक संशयित अवस्थेत आढळून आला. त्यास ताब्यात घेऊन कल्याण रेल्वे पोलीस ठाणे येथे आणण्यात आले.

चौकशीअंती संबंधित मुलाने आपले नाव सांगून तो पिपराह, तालुका पोरीचाह, जिल्हा झारखंड येथे राहाणारा असे सांगितले. तो मुंबई येथे फिरण्यासाठी आल्याचे

**कल्याण रेल्वे स्थानकावरील फलाट क्रमांक ५ वर आलेली आसनसोल एक्सप्रेस गाडी तपासण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार दहा मुले आढळून आली नाहीत. मात्र, तपासणीदरम्यान जनरल डब्याजवळ एक अल्पवयीन मुलगा विनापालक संशयित अवस्थेत आढळून आला. त्यास ताब्यात घेऊन कल्याण रेल्वे पोलीस ठाणे येथे आणण्यात आले.**

त्याने नमूद केले. त्याने दिलेल्या संपर्क क्रमांकावरून त्याच्या पालकांशी संपर्क साधून मुलाबाबत माहिती देण्यात आली. मात्र, पालकांना मुंबई येथे येण्यासाठी वेळ लागणार असल्याने संबंधित अल्पवयीन मुलास जे. जे. अॅक्ट कलम ३१(१) अन्वये डिटेन करण्यात आले. त्याच्या पुढील संरक्षण व तजवीजेसाठी कल्याण रेल्वे पोलीस ठाणे येथे रिपोर्ट सादर करण्यात आला.

या कारवाईमध्ये महिला सहा. पोलीस निरीक्षक माधुरी घाडगे, अनैतिक मानवी वाहतूक शाखेतील महिला पोलीस अंमलदार बल्लाळ, मालवणकर तसेच महिला सुरक्षा पथक ग्रुप 'C' मधील कळंबे, सुर्वे, माने व सुरवाडे यांनी सहभाग घेतला. त्याचबरोबर कल्याण रेल्वे पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार पाटील, सरडे, शेटे, शेवाळे, अभंग तसेच सीसीडीटी संस्था व मुंबई स्माईल संस्थेचे प्रतिनिधी यांनीही सहकार्य केले.

या कारवाईतून लोहमार्ग पोलीस दल, महिला सुरक्षा पथक व सेवाभावी संस्थांमधील प्रभावी समन्वय अधोरेखित झाला असून, महिला व बालकांच्या सुरक्षेसाठी रेल्वे पोलीस दल सदैव सतर्क व कटिबद्ध असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. ■

**S.B.Collect**

**छापील/ई-मासिकाची ऑनलाईन वर्गणी भरण्यासाठी भेट द्या:**

**https://www.mahapolice.gov.in/daksha-pay.php**

अथवा

खालील क्युआर कोड मोबाईलमध्ये स्कॅन करा



लेख



कविता पेन्शनवार
नाशिक

# मूल्याधिष्ठित शिक्षण – मानवतेच्या पुनर्निर्मितीची अत्यावश्यक दिशा

भारतीय शिक्षणाला अनेक वर्षांची उच्च अशी परंपरा आहे. भारतात प्राचीन काळी शिक्षण हे जीवनमूल्यांवर आधारित होते. त्याचे वेगळे शिक्षण दिले जात नव्हते. ही मूल्ये, संस्कार एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे जात असत. आता मात्र या सगळ्याचे प्रमाण कमी होताना दिसून येते. ही जीवनमूल्ये आपल्या आयुष्याचा आधार आहेत. त्यामुळे आपल्या व्यक्तीमत्त्वाच्या बांधणीसाठी ती आपल्यात रुजवणे गरजेचे आहे. ही मूल्ये कशी रुजवता येतील अशा अनेक बाबींचा उहापोह सदर लेखात केला आहे.



आजचा काळ विज्ञान–तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होणाऱ्या प्रगतीचा आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल क्रांती, जागतिकीकरण यांसारख्या घटकांनी मानवी जीवन अधिक सुलभ, वेगवान आणि आकर्षक बनवले आहे. परंतु या प्रगतीच्या झगमगाटामागे एक गंभीर वास्तव दडलेले आहे; मानवी मूल्यांची होत चाललेली घसरण. शिक्षणाच्या क्षेत्रातही हीच प्रवृत्ती दिसून येते. गुण, पदव्या आणि नोकरी या गोष्टींना महत्त्व मिळाले, पण प्रामाणिकपणा, जबाबदारी, करुणा, सत्यनिष्ठा यांच्यासारखी मूलभूत मूल्ये दुय्यम ठरली. अशा परिस्थितीत 'मूल्याधिष्ठित शिक्षण' ही केवळ एक शैक्षणिक संकल्पना नसून समाजाच्या पुनर्निर्मितीसाठीची अपरिहार्य गरज बनली आहे.

मूल्याधिष्ठित शिक्षण म्हणजे केवळ माहिती देणे नव्हे, तर माणूस घडवणे होय. शिक्षणाचे अंतिम ध्येय 'चांगला नागरिक' तयार करणे हे असले पाहिजे. परंतु आज शिक्षणाने 'कुशल काम गार' तयार करण्यावर अधिक भर दिला आहे. त्यामुळे ज्ञान आणि कौशल्य असूनही अनेकदा नैतिक अधःपतन दिसून येते. भ्रष्टाचार, हिंसा, असहिष्णुता, स्वार्थीपणा, सामाजिक अन्याय यांसारख्या समस्या याच मूल्यशून्यतेतून उद्भवतात. म्हणूनच मूल्याधिष्ठित शिक्षण ही काळाची हाक आहे.

भारतीय संस्कृतीच्या मुळाशीच मूल्यांची समृद्ध परंपरा आहे. 'सत्यं वद, धर्मं चर', 'वसुधैव कुटुंबकम्', 'अहिंसा परमो धर्मः' यांसारख्या तत्त्वांनी आपल्या समाजाला दिशा दिली. गुरुकुल पद्धतीत शिक्षण हे केवळ विद्या संपादनापुरते मर्यादित नव्हते, तर व्यक्तिमत्त्व विकास, चारित्र्यनिर्मिती आणि सामाजिक जबाबदारी यावर विशेष भर दिला जात होता. आजच्या आधुनिक शिक्षणप्रणालीत हीच बाजू हरवलेली दिसते. त्यामुळे पारंपरिक मूल्यांचा आधुनिक संदर्भात पुनर्विचार करून त्यांचा शिक्षणात समावेश करणे आवश्यक ठरते.

मूल्याधिष्ठित शिक्षणाची गरज का निर्माण झाली आहे? हे समजून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांवर प्रचंड ताण आहे. यश मिळवण्यासाठी कोणतीही साधने वापरण्याची प्रवृत्ती वाढत आहे. उद्दिष्ट साध्य करणे महत्त्वाचे, मार्ग कसा आहे याची पर्वा नाही असा दृष्टिकोन निर्माण होत आहे. अशा मानसिकतेतून आज समाजात अनैतिकतेचे प्रमाण वाढत आहे. मूल्याधिष्ठित शिक्षण विद्यार्थ्यांना योग्य–अयोग्य यांमधील फरक समजावते, नैतिक निर्णय घेण्याची क्षमता विकसित करते आणि जीवनातील संतुलन राखण्यास मदत करते. याशिवाय,

**आजच्या डिजिटल युगात मूल्याधिष्ठित शिक्षणाची गरज आणखी वाढली आहे. सोशल मीडियाच्या प्रभावामुळे माहितीचा पूर आला आहे. पण त्याचबरोबर दिशाभूल, द्वेष, असत्य यांचाही प्रसार होत आहे.**

मूल्याधिष्ठित शिक्षण सामाजिक सलोखा आणि ऐक्य वाढवण्यातही महत्त्वाची भूमिका बजावते. विविध धर्म, भाषा, संस्कृती असलेल्या भारतासारख्या देशात सहिष्णुता, आदर, परस्पर समजूतदारपणा ही मूल्ये अत्यंत आवश्यक आहेत. शिक्षणातून जर ही मूल्ये रुजवली गेली, तर सामाजिक संघर्ष कमी होऊन एकात्मता बळकट होईल.

मूल्याधिष्ठित शिक्षणाचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे भावनिक आणि आध्यात्मिक विकास. केवळ बौद्धिक प्रगती पुरेशी नसते; मन आणि आत्म्याचेही संवर्धन आवश्यक असते. विद्यार्थ्यांना स्वतःच्या भावनांची जाणीव, इतरांच्या भावनांचा आदर, आत्मपरीक्षण आणि आत्मनियंत्रण यांची शिकवण दिली पाहिजे. यामुळे व्यक्ती अधिक संवेदनशील, संतुलित आणि जबाबदार बनते.

आजच्या डिजिटल युगात मूल्याधिष्ठित शिक्षणाची गरज आणखी वाढली आहे. सोशल मीडियाच्या प्रभावामुळे माहितीचा पूर आला आहे. पण त्याचबरोबर दिशाभूल, द्वेष, असत्य यांचाही प्रसार होत आहे. अशा वेळी सारासारविवेक, नैतिकता आणि जबाबदारी या मूल्यांची जाणीव असणे अत्यावश्यक आहे. शिक्षणाने विद्यार्थ्यांना काय विचार करावे यापेक्षा कसे विचार करावे हे शिकवले पाहिजे.

मूल्याधिष्ठित शिक्षणाची अंमलबजावणी कशी करावी, हा प्रश्नही महत्त्वाचा आहे. केवळ पाठ्यपुस्तकांमध्ये मूल्यांचे धडे समाविष्ट करून हे साध्य होणार नाही. शिक्षकांची भूमिकाही येथे अत्यंत महत्त्वाची ठरते. शिक्षक हे केवळ ज्ञानदाते नसून आदर्श व्यक्तिमत्त्व असले पाहिजेत. त्यांच्या वर्तनातून, बोलण्यातून, कृतीतून विद्यार्थ्यांना मूल्यांची प्रेरणा मिळाली पाहिजे. उपदेशापेक्षा आचरण अधिक प्रभावी असते हे येथे विशेषतः लागू होते.

तसेच, शिक्षण पद्धतीत अनुभवाधारित आणि सहभागात्मक उपक्रमांचा समावेश करणे आवश्यक आहे. सामाजिक सेवा, समूहकार्य, नाट्य, चर्चा, चिंतन यांसारख्या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना मूल्यांचा प्रत्यक्ष अनुभव देता येतो. कुटुंब आणि समाज यांचाही सहभाग येथे महत्त्वाचा आहे. मूल्यांचे संस्कार हे केवळ शाळेतच नव्हे, तर घरात आणि समाजातही दिले गेले पाहिजेत.

मूल्याधिष्ठित शिक्षणाचा परिणाम केवळ व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण समाजावर होतो. नैतिकदृष्ट्या सक्षम नागरिक तयार झाल्यास राष्ट्राची प्रगती अधिक स्थिर आणि शाश्वत होते. आर्थिक विकासासोबत सामाजिक न्याय, समानता आणि मानवी सन्मान यांचीही जपणूक होते.

शेवटी, असे म्हणता येईल की मूल्याधिष्ठित शिक्षण ही केवळ एक शैक्षणिक गरज नाही, तर मानवी अस्तित्व टिकून राहाण्यासाठी आवश्यक असलेली जीवनदृष्टी आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबत जर मूल्यांचा आधार नसेल, तर ही प्रगती विनाशकारी ठरू शकते. म्हणूनच आजच्या काळात शिक्षणाने मेंदूसोबत हृदयही घडवले पाहिजे.

मूल्याधिष्ठित शिक्षण हीच ती ज्योत आहे, जी अंधारलेल्या समाजाला प्रकाश देऊ शकते आणि माणूस या संकल्पनेला पुन्हा एकदा अर्थपूर्ण बनवू शकते. मूल्याधिष्ठित शिक्षण काळाची गरज हा केवळ एक शैक्षणिक विषय नसून, तो २१ व्या शतकातील मानवी संस्कृतीच्या अस्तित्वाचा आणि प्रगतीचा अत्यंत संवेदनशील जाहीरनामा आहे. आजचे जग हे तंत्रज्ञानाच्या दृष्टीने प्रचंड प्रगत, भौतिकदृष्ट्या संपन्न आणि माहितीच्या महापूरात पोहणारे जग आहे. परंतु, या चकाचक बाह्य प्रगतीच्या मागे मानवी मूल्यांचा होणारा संकोच आणि आंतरिक पोकळी चिंताजनक आहे. म्हणूनच, मूल्याधिष्ठित शिक्षण ही केवळ एक आदर्शवादी संकल्पना राहिलेली नसून, ती या काळाची सर्वात मोठी अनिवार्य गरज बनली आहे.

**मूल्याधिष्ठित शिक्षण ही केवळ एक शैक्षणिक गरज नाही, तर मानवी अस्तित्व टिकून राहाण्यासाठी आवश्यक असलेली जीवनदृष्टी आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबत जर मूल्यांचा आधार नसेल, तर ही प्रगती विनाशकारी ठरू शकते.**

### पार्श्वभूमी आणि संकल्पनेचा उगम- सा विद्या या विमुक्तये

भारतीय संस्कृतीत शिक्षणाचा मूळ उद्देश केवळ उपजीविकेचे साधन मिळवणे हा कधीच नव्हता. 'सा विद्या या विमुक्तये' (विद्या ती जी बंधनातून मुक्त करते) ही आपली मूळ धारणा आहे. हे बंधन केवळ अज्ञानाचे नव्हते, तर ते स्वार्थ, संकुचितता आणि अनैतिकतेचे देखील होते.

प्राचीन काळी शिक्षणात अक्षरज्ञानापेक्षा जीवनज्ञानाला अधिक महत्त्व होते. ऋषीमुनींच्या आश्रमात मिळणारे शिक्षण हे मानवी मनाला सुसंस्कृत करणारे आणि नैतिकतेचे धडे देणारे होते. आधुनिक काळात आपण शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण केले. विज्ञान-तंत्रज्ञानाची कवाडे खुली केली, पण दुर्दैवाने या प्रक्रियेत शिक्षणाचा आत्मा म्हणजेच मूल्ये कुठेतरी हरवून गेली. आजचे शिक्षण साक्षर बनवत आहे, पण सुसंस्कृत बनवण्यात कमी पडत आहे, हीच या काळाची मुख्य शोकांतिका आहे.

### आधुनिक काळातील विरोधाभास - भौतिक समृद्धी विरुद्ध नैतिक दारिद्र्य

आजच्या समाजाकडे पाहिले, तर एक भयानक विरोधाभास दिसून येतो. आपल्याकडे उत्तुंग इमारती आहेत, पण कौटुंबिक नातेसंबंध ठिसूळ झाले आहेत. माहितीचे महाजाल हाताशी आहे, पण विवेक हरवला आहे. विज्ञानाने माणसाला चंद्रावर पोहोचवले, पण शेजाऱ्याच्या सुखा-दुःखात सामील होण्याचे शहाणपण हिरावून घेतले.

### बौद्धिक सुबत्ता आणि भावनिक दारिद्र्य:

आजचा तरुण प्रचंड बुद्धिमान

आहे. कॉम्प्युटर कोडिंगमध्ये पटाईत आहे. मॅनेजमेंटच्या पदव्यांनी विभूषित आहे. परंतु अपयशाचा एक छोटासा धक्कादेखील तो सहन करू शकत नाही. नैराश्यातून आत्महत्या करणे, व्यसनाधीनतेच्या आहारी जाणे किंवा गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळणे, हे सर्व काय दर्शवते? हे वाढत्या भावनिक आणि नैतिक दारिद्र्याचे लक्षण आहे.

## मूल्याधिष्ठित शिक्षण म्हणजे नेमके काय?

मूल्याधिष्ठित शिक्षण म्हणजे केवळ नैतिक गोष्टींच्या कथा सांगणे नव्हे किंवा परीक्षेसाठी नागरिकशास्त्र अथवा नैतिक मूल्ये या विषयाचा पोपटपंची अभ्यास करणे नव्हे. ही एक निरंतर चालणारी संस्काराची प्रक्रिया आहे.

या शिक्षणाचे मुख्य पैलू खालीलप्रमाणे आहेत: मूल्याचे स्वरूप  त्याचे वैयक्तिक व सामाजिक महत्त्व

प्रामाणिकपणा, आत्मपरीक्षण, संयम, दयाळूपणा आणि कृतज्ञता यासारखी वैयक्तिक मूल्ये. सहिष्णुता, बंधुभाव, न्यायाची चाड, आणि इतरांच्या हक्कांचा आदर यांच्यासारखी सामाजिक मूल्ये. राष्ट्रप्रेम, संविधानाचा आदर, लोकशाही तत्त्वांचे जतन आणि पर्यावरण भान यांसासखी राष्ट्रीय मूल्ये. वसुधैव कुटुम्बकम् (संपूर्ण पृथ्वी हेच माझे घर आहे) ही भावना आणि जागतिक शांतता यांच्यासारखी वैश्विक मूल्ये.

हे शिक्षण माणसाला स्वतःच्या पलीकडे जाऊन समष्टीचा (समाजाचा) विचार करायला शिकवते. ते बुद्धीला विवेकाचे आणि मनाला करुणेचे अधिष्ठान देते. **आजच्या काळात**

**मूल्याधिष्ठित शिक्षण म्हणजे केवळ नैतिक गोष्टींच्या कथा सांगणे नव्हे किंवा परीक्षेसाठी नागरिकशास्त्र अथवा नैतिक मूल्ये या विषयाचा पोपटपंची अभ्यास करणे नव्हे. ही एक निरंतर चालणारी संस्काराची प्रक्रिया आहे.**

## मूल्याधिष्ठित शिक्षणाची गरज का आहे?

आधुनिक जग हे वेगाने बदलत आहे. या बदलत्या प्रवाहात मानवी अस्तित्वाला आकार देण्यासाठी मूल्यांची गरज अत्यंत तीव्र झाली आहे.

### अ) तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ताचे आव्हान

आज आपण कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात जगत आहोत. जी कामे माणूस करायचा, ती आता यंत्रे करत आहेत. अशा वेळी, माणसाकडे असे काय आहे जे यंत्राकडे नाही? याचे उत्तर म्हणजे भावना, संवेदना, विवेक आणि नैतिकता. जर माणसाने आपली ही मूल्येच गमावली, तर यंत्र आणि माणसामध्ये काहीच फरक उरणार नाही. तंत्रज्ञानाचा वापर विध्वंसासाठी करायचा की कल्याणासाठी, हे ठरवणारा विवेक मूल्याधिष्ठित शिक्षणातूनच येतो.

### ब) कौटुंबिक आणि सामाजिक वीण सैल होणे

विभक्त कुटुंब पद्धतीमुळे आजच्या मुलांना आजी–आजोबांच्या संस्कारांची शिदोरी मिळेनाशी झाली आहे. आई–वडील दोघेही नोकरीत व्यस्त असल्यामुळे मुलांचा जास्तीत जास्त वेळ स्क्रीन (मोबाईल/टीव्ही) समोर जातो. डिजिटल विश्वातील आभासी जग त्यांना हिंसेकडे आणि एकाकीपणाकडे ढकलत आहे. या पार्श्वभूमीवर, शाळा आणि महाविद्यालयांवर मूल्यांचे सिंचन करण्याची जबाबदारी कैक पटीने वाढली आहे.

### क)पर्यावरणाच्या वाढत्या संकटाचा काळ

निसर्गाचा अनिर्बंध उपभोग घेण्याच्या मानवी प्रवृत्तीमुळे आज पृथ्वी संकटात आहे. प्रदूषण, हवामान बदल या समस्या म ानवाच्या लोभी वृत्तीचा परिणाम आहेत. निसर्गाबद्दल आदर, कृतज्ञता आणि सहअस्तित्वाची भावना हे मूल्य जर बालपणीच

रुजवले, तरच उद्याची पिढी या पृथ्वीचे रक्षण करू शकेल.

## मूल्याधिष्ठित शिक्षणाची अंमलबजावणी – एक आव्हानात्मक प्रवास

केवळ अभ्यासक्रमात बदल करून किंवा व्याख्याने देऊन मूल्ये रुजवता येत नाहीत. मूल्ये ही शिकवण्याची गोष्ट नसून ती टिपण्याची गोष्ट आहे. यासाठी त्रिसूत्री अत्यंत महत्त्वाची आहे:

## शिक्षकांची भूमिका आणि आदर्श

शिक्षक हा विद्यार्थ्याचा पहिला आदर्श असतो. शिक्षकाचे वागणे आणि बोलणे यात जर तफावत असेल, तर विद्यार्थी मूल्ये आत्मसात करू शकत नाहीत. शिक्षकाने आपल्या आचरणातून प्रामाणिकपणा, वेळ पाळणे आणि समता यांचे धडे दिले पाहिजेत.

## पालकांचे सहकार्य आणि घरातील वातावरण

घर ही मूल्यांची पहिली पाठशाळा आहे. आई–वडील जर घरात एकमेकांचा आदर करत असतील, वृद्धांची सेवा करत असतील, तर मुले तेच शिकतात. भौतिक सुखांच्या मागे धावताना पालकांनी मुलांना वेळ आणि संस्कार देणे गरजेचे आहे.

## अनुभवात्मक शिक्षण

विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांना वृद्धाश्रमात नेणे, अनाथाश्रमातील मुलांसोबत वेळ घालवायला लावणे, वृक्षारोपण करणे, स्वच्छता मोहिमेत सहभागी करून घेणे अशा उपक्रमांमधून मूल्यांचे प्रत्यक्ष दर्शन घडवले पाहिजे. जेव्हा एखादा विद्यार्थी श्रमप्रतिष्ठा

> **विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांना वृद्धाश्रम ात नेणे, अनाथाश्रमातील मुलांसोबत वेळ घालवायला लावणे, वृक्षारोपण करणे, स्वच्छता मोहिमेत सहभागी करून घेणे अशा उपक्रमांमधून मूल्यांचे प्रत्यक्ष दर्शन घडवले पाहिजे.**

स्वतः अनुभवतो, तेव्हा त्याच्या मनातील अहंभाव गळून पडतो.

## साहित्यिक चिंतन –

संत ज्ञानेश्वरांचे पसायदान आणि आधुनिक शिक्षण–

संत ज्ञानेश्वरांनी पसायदानात म्हटले होते,

**जे खळांची व्यंकटी सांडो।**
**तया सत्कर्मी रती वाढो।**
**भुता परस्परे जडो मैत्र जीवांचे।।**

आधुनिक मूल्याधिष्ठित शिक्षणाचे अंतिम ध्येय हेच आहे. प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनातील व्यंकटी (कुटिलता, स्वार्थ) नष्ट होऊन त्याच्यामध्ये सत्कर्माची ज्योत पेटवणे, हेच आजच्या शिक्षणाचे पसायदान असायला हवे.

## सुवर्णयुगाची पहाट

शेवटी, शिक्षण हे केवळ परीक्षा उत्तीर्ण होण्याचे आणि मिळणाऱ्या पदव्यांनी भिंती सजवण्याचे साधन नाही. शिक्षण हे माणसाला माणूस बनवण्याचे कारखाने आहेत. आज जर आपण मूल्याधिष्ठित शिक्षणाकडे दुर्लक्ष केले, तर आपण एक अत्यंत बुद्धिमान पण तितकीच क्रूर, स्वार्थी आणि संवेदनहीन पिढी निर्माण करू. अशी पिढी स्वतःचा आणि जगाचाही विनाश ओढवून घेईल.

काळाची पावले ओळखून आताच जागे होण्याची गरज आहे. जेव्हा आपल्या शिक्षण व्यवस्थेतून बाहेर पडणारा प्रत्येक तरुण हा केवळ एक डॉक्टर, इंजिनिअर किंवा आयटी प्रोफेशनल नसेल, तर तो सर्वप्रथम एक उत्कृष्ट आणि संवेदनशील माणूस असेल, तेव्हाच खऱ्या अर्थाने नव्या सुवर्णयुगाची पहाट होईल. मूल्याधिष्ठित शिक्षण ही आजची गुंतवणूक आहे, ज्याचा परतावा उद्याच्या सुरक्षित, शांत आणि समृद्ध समाजाच्या रूपाने मिळणार आहे. म्हणूनच, मूल्याधिष्ठित शिक्षण ही काळाची गरज नसून ते मानवी संस्कृतीचे जीवनसूक्त आहे. ■



सर्जेराव सानप
पोलीस उप निरीक्षक
सातारा पोलीस ठाणे
छत्रपति संभाजीनगर

# संशयात्मा

एखाद्याच्या डोक्यात संशयाचे भूत शिरले, की ते निघता निघत नाही. याचाच प्रत्यय छत्रपती संभाजीनगरमधील सातारा पोलिसांना जून २०२२ मध्ये आला. ५ जूनच्या सकाळी सातारा पोलीस ठाण्यात एक फोन आला. आलेल्या फोनला तत्परतेने प्रतिसाद देत पोलिसांनी कारवाई केली. अवघ्या २-३ दिवसांमध्ये सातारा पोलीस ठाण्याच्या पथकाने एका व्यक्तीला जेरबंद केले. कोण होती ती व्यक्ती? काय घडले होते त्या व्यक्तिबाबत? कोण होता संशयात्मा?



जून महिन्याची नुकतीच सुरुवात झाली होती. अजूनही वातावरणात उष्णता जाणवत होती. छत्रपती संभाजीनगर मधील सातारा येथे राहणारी सुषमा रोज सकाळी लवकर उठून घरातले, स्वत:चे आवरून कामाला जात असे. ती आणि तिची आई संगिता या दोघी रेल्वे स्टेशनच्या परिसरात असलेल्या एका हॉटेलमध्ये काम करत. ५ तारखेलाही ती अशीच सकाळी लवकर उठली होती. एकीकडे घरातली तिची कामे करताना रेडिओवर सकाळची गाणी सुरू होती. रेडिओवर सुरू असलेल्या तिच्या



**सुरेंद्र मळाळे**
पोलीस निरीक्षक
सातारा पोलीस ठाणे
छत्रपती संभाजीनगर



**सागर साठे**
पोलीस अंमलदार
सातारा पोलीस ठाणे
छत्रपती संभाजीनगर



**अण्णासाहेब सातदिवे**
पोलीस अंमलदार
सातारा पोलीस ठाणे
छत्रपती संभाजीनगर

आवडत्या चित्रपटातील ‘ही नवरी असली’ हे गाणे सुरू झाले. तसा तिच्या हालचालींनाही वेग आला. गाणे पूर्ण होईपर्यंत तिची उरलेली बारीकसारीक कामेही झाली. ती लगबगीने घराच्या बाहेर पडली. जाताजाता आईच्या इथे जाऊन मग दोघींनी एकत्र जायचे असा त्या मायलेकीतला दंडक होता. पण आज मात्र तिला रोजच्यापेक्षा घरातून निघायला उशीर झाला होता. त्यामुळे ती आईच्या घराकडे न जाता दुसऱ्या मार्गाने कामावर पोहोचली. आल्याआल्या ती लगेच कामाला लागली. किचनमधील कामे करण्यात तिचा बराच वेळ गेला होता. सगळी कामे संपवून ती हॉटेलच्या किचनमधून बाहेर आली तरी तिची आई सुमन कामावर आलेली नव्हती. सुमन कामावर आलेली नाही ही गोष्ट एव्हाना हॉटेलच्या मॅनेजर आणि बाकीच्यांच्याही लक्षात आली होती.

‘‘पिंकी, जा बरं आजीकडे जाऊन बघ. ती अजून का आली नाही कामावर ते.’’ आज कधी नव्हे ते तिची मुलगी पिंकी आई सुषमा हिच्याबरोबर आली होती. आईच्या सांगण्यानुसार पिंकी हॉटेलमधून बाहेर पडली आणि थेट आजीच्या घराच्या दिशेने निघाली. थोड्याच वेळात ती आजीच्या



**सुषमानेही खात्री करण्यासाठी खालती फटीतून बघितले. ते बघितल्यावर तिला काहीतरी विचित्र असल्याचा संशय आला. तिने आजूबाजूच्यांना बोलावले. जमलेल्या लोकांपैकी कोणीतरी सातारा पोलीस ठाण्यात फोनद्वारे घडलेला प्रकार कळवला.**

घराजवळ पोहोचली. तिने बघितले तर दरवाजाला मोठे कुलूप होते. तिने आजीच्या घराला कुलूप असल्याचे आईला येऊन सांगितले. आईच्या घराला कुलूप आहे हे समजताच सुष्मा हॉटेलमध्ये सांगून पिंकीला बरोबर घेत तातडीने आईच्या घराच्या दिशेने निघाली. थोड्याच वेळात त्या दोघीही आईच्या घरापाशी आल्या. पिंकीने अजून दरवाजाला कुलूप कसे असे वाटून कुतुहलाने खालती वाकून बघितले. दरवाजाच्या फटीतून तिला आजी झोपलेली असून तिचे जमिनीवरचे दोन पाय दिसले. तिने ही गोष्ट आईला सांगितली.

‘‘आय, आजी ना खालती झोपलीये.’’

‘‘काय? जमिनीवर? बघू...’’

सुषमानेही खात्री करण्यासाठी खालती फटीतून बघितले. ते बघितल्यावर तिला काहीतरी विचित्र असल्याचा संशय आला. तिने आजूबाजूच्यांना बोलावले. जमलेल्या लोकांपैकी कोणीतरी सातारा पोलीस ठाण्यात फोनद्वारे घडलेला प्रकार कळवला. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत सातारा पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत असणारे सर्जेराव सानप हे तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

पोलिसांचा ताफा घटनास्थळी पोहोचेपर्यंत घटनास्थळी बरीच बघ्यांची गर्दी जमा झाली होती. दरवाजाचे कुलूप काढून दरवाजा उघडण्यात आला. समोरचे दृश्य बघून सुषमा धावत आईच्या निष्प्राण देहापाशी जाऊन आईला बिलगली.

‘‘आईऽऽऽ उठ ना गं. आई..’’

आपल्या आईच्या फरशीवर पडलेल्या हाताला जोरजोरात हलवत होती. तिला सुमनपासून लांब करणे पोलिसांना अवघड जात होते. पण साहेबांनी तिला समजावल्यावर ती

बाजूला झाली. साहेबांनी सुमनचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. तत्पूर्वी तिच्या मृतदेहाचा इन्क्वेस्ट पंचनामा करण्यात आला. त्यावेळी तिच्या कपाळावर वरवंटासारख्या जड गोष्टीने वार केल्याचे समोर आले. घटनास्थळाचा सविस्तर पंचनामा पोलिसांनी केला. घटनास्थळावरून दरवाजाला लावलेले कुलूप, गुन्ह्यात वापरलेला वरवंटा, आजूबाजूला पडलेले रक्त, सुषमाचे सावत्र वडील विजय यांचा मोबाईल अशा गोष्टी संकलित केल्या. तसेच महत्त्वाच्या साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यात आले.

साहेबांनी आता सुषमाकडे आपले लक्ष वळवले.

''तुम्हाला काय वाटतं? कोणी केलं असेल?''

''काय सांगणार साहेब? पण माझ्या दादांनी केलेलं असू शकतं.''

''दादा म्हणजे?''

''म्हणजे वडील.''

''कोण? हे विजय??''

''हो साहेब. काल रात्री आईशी त्यांचं भाांडण झालं होतं. यापूर्वी पण त्यांची एकमेकांशी जोरजोरात भांडणं व्हायची. ते आईला नाही नाही ते बोलायचे. ते काल रात्री बाहेर पडले तेव्हाच मला काहीतरी विचित्र वाटलं होतं.''

''बरं... कुठे कुठे जाऊ शकतो तो?''

''ते ना, त्यांच्या गावाला गेले असणार नक्की.''

पोलिसांनी सुषमा हिच्या सांगण्यानुसार संशयित विजय याचा त्याच्या गावी शोध सुरू केला. यात पोलिसांना यश आले. गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार विजयच्या शोधासाठी साहेबांनी छोटी पथके तयार करून त्यांना विजयच्या गावी रवाना केले. गावी तपास करत असताना पोलिसांना विजय गावीच सापडला.



**साहेबांनी तिला समजावल्यावर ती बाजूला झाली. साहेबांनी सुमनचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. तत्पूर्वी तिच्या मृतदेहाचा इन्क्वेस्ट पंचनामा करण्यात आला. त्यावेळी तिच्या कपाळावर वरवंटासाररव्या जड गोष्टीने वार केल्याचे समोर आले.**

त्याला घेऊन पोलीस सातारा पोलीस ठाण्याच्या दिशेने निघाले. थोड्याच वेळात तपासपथक सातारा पोलीस ठाण्याच्या आवारात दाखल झाले. संपूर्ण प्रवासात त्याने खाली घातलेली मान वर केलीच नाही. पूर्ण रस्त्यात तो एकदम गप्प होता.

''बोल. का मारलं तू तुझ्याच बायकोला?''

साहेबांनी विचारलेल्या या प्रश्नावर त्याने खाली घातलेली मान वर करत त्यांच्याकडे शून्य नजरेने बघितले.

''बोल, साहेबांनी काय विचारलं ते कळलं नाही का तुला?'' पोलीस अंमलदार सागर साठे यांनी साहेबांच्या प्रश्नाला दुजोरा देत विचारले.

''मग काय करणार अजून दुसरं? माझ्यापुढे दुसरा कोणता उपायच ठेवला नाही शिल्लक तिनं.''

''म्हणजे?''

''म्हणजे?... बाहेर दुसरा कोणीतरी सापडला होता तिला. म्हणून माझ्याकडे दुर्लक्ष करायची. माझ्यावर जोर करायची. मला हिडीसफिडीस करायची.''

''पण कोणाला तू प्रत्यक्ष बघितलं होतंस का?''

''नाही साहेब, पण कळतं वागण्याबोलण्यावरून. कामाला जातानापण इतका नट्टापट्टा करून जायची. घरी आल्यावर मात्र काही नाही. बसून राहायची फक्त. विचारलेल्या प्रश्नांना धड उत्तर देईल तर शप्पथ.''

''पण जर तू बघितलं नाहीस तर तू असं कसं काय एवढं टोकाचं पाऊल उचलू शकतोस?''

''बघितलं नाही तरी वागण्यावरून कळतं ना साहेब. तिचा माझ्यातला इंटरेस्ट संपल्याचं कळत

होतं की मला. त्या दिवशी पण असंच झालं. मी रात्री घरी आलो, तर घरात खायला प्यायला काही करून ठेवलेलं नव्हतं. दिवसभराच्या कामानं मला भूक लागली होती. म्हणून गेल्यावर मी खायला मागितलं, तर माझ्या अंगावर वसकन खेकसली. एखाद्या कुत्र्यावर ओरडावं तसं. म्हणाली, आता घरात काही शिल्लक नाही द्यायला. 'तुझ्या यारासाठी ठेवलं ना?' असं विचारलं तर असं काही नाही असं बोलली. मग म्हटलं तिचं कोणाशी काय सुरू आहे या गोष्टीचा सोक्षमोक्ष लावायचाच. पण नाही होऊन पडली. मला राग आला. आमच्यात भांडण झालं. माझ्या डोक्याचा पार भुगा केला होता टवळीनं. सरळ स्वयंपाकघरात गेलो आणि कट्ट्यावर ठेवलेला वरवंटा घेऊन हाणला तिच्या डोक्यावर. थोड्या वेळानी भानावर आल्यावर तिला तसंच सोडून बाहेर पडलो. दरवाजाला कुलूप लावलं आणि गावी आलो.''

''थोडा शांत डोक्यानी विचार केला असता तर कळलं असतं कोणाबरोबरही अफेअर नव्हतं त्यांचं. अर्थात तुला आता वेळच वेळ आहे तू काय गमावलं आहेस या सगळ्याचा हिशोब मांडायला.'' एवढे बोलून सानप साहेब तिथून बाहेर पडले.

पोलिसांनी त्याच्याकडून गुन्ह्याच्यावेळी त्याने परिधान केलेले कपडेही हस्तगत केले. संपादित केलेल्या गोष्टी पोलिसांनी वैद्यकीय तपासणी करण्यासाठी न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे पाठवल्या. त्यानंतर पोलिसांनी मा. न्यायालयात आरोपित विजय याच्या विरोधात दोषारोपपत्र दाखल केले.

समोर आलेले सर्व साक्षीपुरावे ग्राह्य धरत मा. न्यायालयाने विजयला दोषी ठरवत भादंवि कलम ३०२ अन्वये आजन्म कारावास आणि पंचवीस हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणाचा तपास सातारा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र मळाळे, पोलीस उपनिरीक्षक सर्जेराव सानप, पोलीस अंमलदार सागर साठे व अण्णासाहेब सातदिवे यांनी अत्यंत शिताफीने आणि कौशल्याने पूर्ण केला आहे.

▪ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***

# श्रद्धांजली

**३० ते ४० वर्षे कर्तव्यनिष्ठापूर्वक सेवा बजावून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले पोलीस अधिकारी अथवा अंमलदार यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबियांना व इतर सेवानिवृत्त पोलिसांना त्यांच्या सेवेची आठवण राहावी आणि त्यांचा सन्मान कायम राखला जावा यासाठी त्यांना सन्मानाने अंतिम निरोप देणे हे महाराष्ट्र पोलीस दलाचे कर्तव्य आहे. त्या अनुषंगाने मे २०२६ दरम्यान निधन झालेल्या महाराष्ट्र पोलीस दलाच्या सेवानिवृत्त अधिकारी/अंमलदार यांना भावपूर्ण श्रद्धांजली.**

| अ. क्र. | फोटो | अधिकारी/अंमलदार यांचे नाव | अधिकारी/अंमलदार यांचे पदनाम | कोणत्या घटकातून निवृत्त झाले | सेवेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. |  | श्री. अनंत बंडाजी सुर्वे | सहा. पोलीस फौजदार | रायगड पोलीस घटक | ३६ वर्षे |
| २. |  | श्री. बन्सीलाल झिंगरूजी शेंडे | सहा. पोलीस उपनिरीक्षक | गोंदिया पोलीस घटक | ३५ वर्षे १० महिने |



कै. रामराव नारायण हाटे

# दिवंगत
# हाटे दांपत्याच्या स्मरणार्थ



कै. लक्ष्मीदेवी राम नारायण हाटे

## बक्षिस योजना

श्री. रमेश रामराव हाटे (Bombay Helpline Consultancy Services India Pvt. Ltd.) व Smt. Laxmidevi Ram Narayan Hate Charitable Trust यांच्याकडून त्यांचे दिवंगत वडील रामराव नारायण हाटे, तत्कालीन पोलीस अधीक्षक, क्राईम ब्रांच २, सीआयडी आणि दिवंगत आई लक्ष्मीदेवी राम नारायण हाटे यांचे स्मरणार्थ दिलेल्या रकमेतून दक्षता मासिकातील सर्वोत्कृष्ट तपासकथा, लेख/कविता/कथा यांच्यासाठी दरमहा बक्षीस योजना सुरू करण्यात आली आहे.

सदर बक्षीस योजनेअंतर्गत माहे जून २०२६ मधील बक्षीसप्राप्त विजेत्यांची नावे खालीलप्रमाणे:

| तपशील | तपासकथा/ लेख/कविता यांचे नाव | विजेत्याचे नाव | रक्कम |
|---|---|---|---|
| सर्वोत्कृष्ट तपासकथा प्रथम क्रमांक | कुऱ्हाडीचा दांडा | श्री. मंगेश चव्हाण तत्का. उपविभागीय पोलीस अधिकारी, सांगली | रु. ७,०००/- |
| सर्वोत्कृष्ट तपासकथा व्दितीय क्रमांक | निन्नी | विद्या जाधव, सहा. पोलीस निरीक्षक, शेगाव पोलीस ठाणे, चंद्रपूर | रु. ५,०००/- |
| सर्वोत्कृष्ट लेख/ कथा/कविता प्रथम क्रमांक | पिंजऱ्यातील पोपट | पंकज पेडणेकर (गंधार) | रु. ३,०००/- |
| सर्वोत्कृष्ट लेख/ कथा/कविता व्दितीय क्रमांक | डिजिटल व्यसन | राज दुधाट | रु. २,०००/- |

# सोशल मुशाफिरी

महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यांमधील पोलीस दलांच्या अधिकृत ट्विटर (आता एक्स) हॅन्डलवर त्या त्या भागातील महत्त्वाच्या घडामोडी, गुन्हे तपास, उपक्रम यांची माहिती देणाऱ्या काही पोस्ट्स.

## मुंबई पोलीस, २५ जून

The only drama your digital life needs is a second act of security.

**सायबरच्या दुनियेत नाट्य नाही तर सुरक्षेचा अतिरिक्त थर गरजेचा असतो.**




## वर्धा पोलीस, १८ जून

**वर्धा पोलीस मुख्यालय येथे रक्तदान शिबीर संपन्न...**



## सातारा पोलीस, २२ जून

स्थानिक गुन्हे शाखा साताराची धडाकेबाज कारवाई... अभिलेखावरील सराईत घरफोडी चोरी करणाऱ्या चोरट्याच्या टोळीस पकडुन त्यांचेकडुन घरफोडी चोरीचे एकुण ६ गुन्हे उघड करत १० तोळे वजानचे सोन्याचे दागीने (चालु बाजार भावा प्रमाणे १५,०९,२००) व चांदीचे दागीने (चालु बाजार भावा प्रमाणे ५१,२७६) हस्तगत




## रत्नागिरी पोलीस, ०६ जून

मा. पोलीस अधीक्षक श्री. नितीन बगाटे (भा.पो.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली रत्नागिरी पोलीस दलाकडून गोवंशाची अवैध खरेदी-विक्री, वाहतूक किंवा कत्तलीसाठी विक्री करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येत आहे. असे कृत्य करणाऱ्यांची गय केली जाणार नाही.

अशा गुन्हेगार व संघटित टोळ्यांविरोधात कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

संशयास्पद हालचाली अथवा गोवंशाच्या अवैध वाहतुकीची माहिती असल्यास डायल ११२ किंवा रत्नसेतु चॅटबॉट ९३७१४१५६१२ वर संपर्क साधा.



## यवतमाळ पोलीस, २६ जून

**६० पीडीत मुलींचा शोध**

**यवतमाळ जिल्हा पोलीस दलाची उल्लेखनीय कामगिरी : ऑपरेशन शोध ला सायबरची साथ**




## नाशिक शहर पोलीस, १५ जून

काल पोलीस आयुक्त व्हॉट्सअ‍ॅप क्रमांकावर प्राप्त झालेल्या आणखी एका टीपच्या आधारे आमच्या पथकाने खातरजमा करून कामटवाडे परिसरात सापळा रचला व ८ ग्रॅम एमडीसह एका आरोपीस ताब्यात घेतले. घटनास्थळी तात्काळ फॉरेन्सिक व्हॅन बोलावून जप्ती, सीलिंग व पुरावे संकलित करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




## सोलापूर पोलीस, २० जून

**शांती इंग्लिश मीडियम स्कूल सोलापूर येथील विद्यार्थ्यांना सायबर क्राईम अवेअरनेस बाबत कार्यशाळा संपन्न.**



# पाककृती



## पोटॅटो ६५

### पोटॅटो ६५

**साहित्य:**

२-३ मध्यम आकाराचे बटाटे

२. चमचे मैदा, कॉर्नफ्लोअर व तांदुळाचे पीठ

१ टीस्पून लाल मिरची पावडर

१ टीस्पून काश्मिरी मिरची पावडर

१ चमचा धणे पावडर

आले लसूण पेस्ट

बारीक चिरलेला लसूण

२-३ उभ्या चिरलेल्या हिरव्या मिरच्या

लाल सुकी मिरची

कांद्याच्या चौकोनी स्लाईस

चौकोनी कापलेली सिमला मिरची

२ चमचे चिली सॉस किंवा गार्लिक चिली सॉस

१ वाटी दही

मीठ

**कृती:**

१. प्रथम एका कढईत पाणी गरम करत ठेवा. त्यात बटाट्याच्या फोडी टाकून ८०% उकडून घ्या.

२. आता एका वाटीमध्ये बटाट्याच्या फोडी घ्या. त्यावर दोन चमचे मैदा, कॉर्नफ्लोअर व तांदुळाचे पीठ घालून मिक्स करून ठेवा.

३. आता एक चमचा लाल मिरची पावडर घ्या आणि त्यात अर्धा चमचा आले लसूण पेस्ट घाला. त्यात साधारण पाऊण कप पाणी मिसळून त्याची पातळसर पेस्ट बनवा.

४. तयार झालेली पेस्ट बटाट्याच्या फोडींवर घाला व व्यवस्थित मिक्स करा जेणेकरून बटाट्याच्या फोडींना संपूर्ण कोटींग होईल.

५. आता कढईत तेल तापवत ठेवा. तेल गरम झाल्यावर त्यात बटाट्याच्या फोडी तळून घ्या.

६. एका छोट्या वाटीमध्ये एक कप दही, एक चमचा कॉर्नफ्लोअर व दोन चमचे चिली सॉस किंवा चिली गार्लिक सॉस एकत्र मिक्स करा.

७. कढईत दोन चमचे तेल घेऊन मंद आचेवर गरम करा. त्यात बारीक



# पनीर कोळीवाडा

चिरलेला लसूण दोन चमचे, थोडासा कढीपत्ता, उभ्या चिरलेल्या दोन ते तीन हिरव्या मिरच्या, एक सुकी लाल मिरची, चौकोनी चिरलेली सिमला मिरची, कांदा, एक चमचा धणेपूड घाला.

८. त्यावर चवीनुसार मीठ घालून त्यावर तयार केलेली दही पेस्ट घाला व चांगल्या प्रकारे साधारण पाच मिनिटे परतून घ्या. गरमगरम खायला घ्या.

## पनीर कोळीवाडा

### साहित्य:

२५० ग्रॅम पनीर (मध्यम आकाराचे तुकडे करून)

६ ते ७ लाल मिरच्या (२ तास गरम पाण्यात भिजवलेल्या)

तेल

१ टीस्पून जिरे

६ ते ८ लसूण पाकळ्या

२ चमचे लिंबाचा रस

१ टीस्पून लाल तिखट (काश्मिरी)

१ टीस्पून जिरे पावडर

१ टीस्पून आमचूर पावडर

१ टीस्पून गरम मसाला

१/२ टीस्पून हळद

१ टीस्पून तीळ

२ टीस्पून काळे मीठ

१ टीस्पून आले लसूण पेस्ट

१ टीस्पून हिरव्या मिरचीची पेस्ट

१/२ कप कॉर्नफ्लोअर

### कृती:

१. कोळीवाड्याची चटणी बनवण्यासाठी भिजवलेल्या लाल मिरच्या, लसूण पाकळ्या, जिरे आणि १ टीस्पून काळे मीठ एका मिक्सरच्या भांड्यात घेऊन त्यावर लिंबू रस आणि चवीनुसार मीठ घालून मऊ पेस्ट करून घ्या. ही चटणी बाउलमध्ये काढून बाजूला ठेवा.

२. भांड्यात १ चमचा तेल घेऊन त्यात लाल तिखट फेटून मिक्स करा. यानंतर जिरेपूड, आमचूर पावडर, गरम मसाला, हळद, तीळ, १ चमचा काळे मीठ, आले लसूण पेस्ट आणि हिरव्या मिरचीची पेस्ट मिक्स करून घ्या. त्यात कॉर्नफ्लोअर, मैदा आणि डाळीचे पीठ घालून मिक्स करा. गरजेनुसार पाणी घालून याचे दाटसर मिश्रण(भजीच्या पिठाप्रमाणे) बनवा, वर चवीनुसार मीठ घालून ढवळा.

३. कढईत तेल गरम करत ठेवा. तेल गरम झाले की तयार मिश्रणात पनीरचे तुकडे घोळवून (पनीरला सर्वबाजूंनी कोटींग करा) मध्यम आचेवर तळून घ्या. तळून झाले की आधी तयार केलेल्या चटणीसोबत गरमागरम सर्व्ह करा.

# शब्दकोडे



**आडवे शब्द**

१. पगार ३. जंगलात राहणारे ६. मुसलमान ७. गोळा होणे ९. नमस्कार ११. विनवण्या १५. पृथ्वी १७. चिखलाची जमीन १८. उपभोग, उपयोग २१. घर उभारणीत वापरलेली तुळई २२. तरफदारी २४. सूर्य २७. नाव ठेवणे २९. आवळ्यापासून तयार केलेला पित्तशामक पदार्थ ३१. नम्र, सुस्वभावी ३२. एक फळभाजी ३३. एक शस्त्र ३४. मत्स्य ३५. जमीन

**उभे शब्द :**

१. आवरण २. डोळे ३. ऑर्किड ४. धोबी ५. गीत ८. एक साप १०. साध्वी स्त्री १२. श्रीमंत १४. लहान मूल, बालक १६. सावट, छाया १७. रोगावर उपचार होण्याची जागा १९. पैसे खर्च करणे २०. नशीब २३. मंद सुगंध २४. समस्त २५. हिरमोड २६. तणाव २८. आमटीत घालायचे व्यंजन ३०. दशानन ३२. ओंजळ

## दक्षताच्या वाचकांसाठी खुशखबर...

दक्षता मासिकाशी वाचकांचा स्नेहबंध असाच टिकून राहावा व जास्तीत जास्त वाचक दक्षता परिवाराशी जोडले जावेत या हेतूने आम्ही काही उपक्रम हाती घेतले आहेत. यापैकीच एक म्हणजे अचूक शब्दकोडे सोडवणाऱ्या तीन स्पर्धकांना विजेते म्हणून घोषित केले जाणार आहे आणि त्यांना रोख पारितोषिकही दिले जाणार आहे. त्यासाठी स्पर्धकांनी मूळ शब्दकोडे अचूक सोडवून त्याचे कात्रण, आपले नाव, अचूक पत्ता, पिन कोड, संपर्क क्रमांक तसेच बँकेचा अकाऊंट नंबर व आयएफएससी कोड या माहितीसह आमच्या दक्षताच्या पत्त्यावर त्या महिन्याच्या पंचवीस तारखेपर्यंत पाठवणे आवश्यक आहे. दर महिन्याला विजेत्यांची निवड केली जाईल व पुढील महिन्यामध्ये विजेत्यांची नावे जाहीर केली जाऊन त्यांचे बँक खात्यात ऑनलाईन बक्षिसाची रक्कम वर्ग करण्यात येईल. यासाठी आपला भरघोस प्रतिसाद अपेक्षित आहे.

**बक्षिसे : पहिले ₹५००/-, दुसरे ₹३००/-, तिसरे ₹२००/-**

# जून २०२६ च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या शब्दकोड्याचे उत्तर व स्पर्धेतील विजेत्यांची नावे

नाव : ______________________________

पत्ता : ______________________________

______________________ मोबाईल : ______________________

अकाऊंट नं : ______________________ आयएफएससी कोड ______________________

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मा | र | ब | त | ■ | नू | त | न | ■ | डा |
| न | ■ | ही | न | ■ | र | ज | ■ | द | वा |
| व | हा | ण | ■ | आ | ■ | वी | ज | ■ | ■ |
| ता | क | ■ | ■ | प | रा | ज | य | ■ | अ |
| ■ | ल | क | ब | ■ | व | ■ | ज | त | न |
| च | णे | ■ | द | ■ | स | व | य | ■ | य |
| रा | ■ | ■ | ल | ता | ■ | पु | का | र | ■ |
| च | मे | ली | ■ | क | ■ | का | र | वा | र |
| र | थी | ■ | शे | त | त | ळे | ■ | ळ | ■ |
| ■ | ■ | जि | रा | व | ण | ■ | व | ■ | भू |



१. रामकृष्ण भगवंत अघोर, सोलापूर

# लाखो वाचक

## ज्याची आतुरतेने वाट पाहतात!

महाराष्ट्र राज्य पोलिसांचे मुखपत्र

# दक्षता

सर्वदूर पोहोचलेले वाचकप्रिय मासिक

नागरिक आणि महाराष्ट्र पोलीस यांच्यातील महत्त्वाचा दुवा असलेले, सर्वोच्च खपाचे, ५१ वर्षांची दर्जेदार परंपरा असलेले मराठी मासिक

- रोमांचकारी सत्यकथा,
- विविध उत्कंठावर्धक सदरे,
- जनता व पोलीस यांच्यातील जिव्हाळा जपणारे वाङ्मय
- रसिक वाचकांच्या पसंतीस उतरेल असे दर्जेदार साहित्य...




**आपली प्रत आजच राखून ठेवा!**

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पत्रव्यवहारासाठी पत्ता:

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय

शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

दूरध्वनी: ०२२-२२८३४५११/२२०४९७०१

mpd.dakshata@mahapolice.gov.in

वर्गणीसाठी दूरध्वनी: ०२२-२२८३४५११

DAKSHATA Marathi Magazine July 2026. RNI Registration No. 21352/1974. Postal Reg.No. MCS/131/2024-26 Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office GPO, Mumbai - 400 001 on 5th and 6th of every month. Date of Publication is 1st of every month.

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय




**प्रेषक :**

**सरसंपादक, दक्षता**

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,

शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,

मुंबई - ४०० ००१

**प्रति,**